म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3006



# पावलापुरता प्रकाश

बा. भ. बोरकर

REFBK-0024038

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| JAN 1984 | 9861 NAL 61 |
| 5 FEB 1984 | 5 FEB 1986 |
| 19 MAR 1985 | 15 OCT 1986 |
| 4 MAR 1984 | 16 JUL 1989 |
| 22 APR 1984 | 26 JUL 1989 |
| 8 AUG 1984 | 12 MAY 1993 |
| 22 AUG 1984 | |
| 23 SEP 1984 | |
| 4 OCT 1984 | |

( क्रु. मा. प. )
५०००–१२–८२

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३००६

३००६
निबंध २४०३८
३१११७

संदर्भ निबंध
३००६

२४०३८
३।११।८३

REFBK-0024038

पावलापुरता प्रकाश

आलोक

पावलापुरता प्रकाश

बा. भ. बोरकर

आलोक प्रकाशन : १

प्रकाशक
रवीन्द्र जोशी
१४७६, बी मंगळवार
कोल्हापूर ४१६००२

मुद्रक
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३० / ३१ शनवार पेठ, पुणे ४११०३०

आवृत्ती पहिली
ऑगस्ट १९८३

© सौ. रुक्मिणीबाई बोरकर

किंमत रु. ३० /-

मुखपृष्ठ / मांडणी
वासंती मुझुमदार

सुहृद बांधव

लक्ष्मीदास बोरकर

यांस

१. ब्रह्मकमळ उमलते तेव्हा / १
२. दुःखाची चव / ४
३. सोनचाफा / ७
४. चित्तरंजन वाटिका / १०
५. कृपावंत निसर्ग / १३
६. आमची मोगर / १६
७. मुलांचे जग / २०
८. पावलापुरता प्रकाश / २४
९. भविष्यनियोजन शास्त्र / २७
१०. बघणे आणि पाहणे / ३०
११. देहान्ताचा हक्क / ३४
१२. दोन मुका / ३७
१३. मला भेटलेला देवमाणूस / ४०
१४. कथा एका चित्र–तपस्व्याची / ४३
१५. संतत्वाचा आगळा नमुना / ४६
१६. नाथांचे पैठण / ५०
१७. कुणकेश्वराची यात्रा / ५५
१८. अभंग / ५९
१९. सुंदर ते ध्यान / ६२
२०. लिहिता हातवळा / ६६
२१. शेषाचा आजार / ७०
२२. परत आलेले पत्र / ७३
२३. शरीर : वर की शाप ? / ७७
२४. जीवनाचा रसास्वाद / ८०
२५. एक स्वप्नरंजन / ८४
२६. यशस्वी नव्हे, मनस्वी / ८७
२७. प्रतिभेची मशागत / ९०
२८. भैरवी न म्हटल्याने / ९४
२९. सत्तरीच्या उंबरठ्यावर / ९७
३०. माझे संकल्प / १०१
३१. एक दिले-मुस्कान / १०४
३२. अमेरिका : काही आठवणी / १०८
३३. वर्कहॉलिक / ११४
३४. न कमावत्या बायकोची कमाई / ११७
३५. बोनसचे दिवस / १२०

अनुक्रम

# पावलापुरता प्रकाश

आलोक प्रकाशन

श्रीनिवास कुलकर्णी
वासंती मुझुमदार
वसंत बापट
बाबा पाटील

ऋणनिर्देश

रात्रीच्या साडेआठांचा सुमार होता. मावळतीला तृतीयेची चंद्रकोर मावळण्याच्या बेतात होती. मार्गशीर्षातल्या मंदगार झुळुका अंगावर सुखद शहारा फुलवीत होत्या. लख्ख निळ्या आकाशात विखुरलेल्या टपोऱ्या चांदण्या सर्वत्र चमचमत होत्या. आणि या प्रसन्न दृश्याचा आस्वाद घेत मी घराच्या व्हराड्यात खुर्ची टाकून बसलेला होतो. त्याच्याशी तन्मय होऊन गेलो होतो.

इतक्यात पावले वाजली आणि मी भानावर आलो. माझे धाकटे जावई जवळ येऊन उत्साहाने मला म्हणाले, "आमच्याकडच्या ब्रह्मकमळिणीचे फूल साडे नवाच्या सुमाराला उमलू लागेल. तेव्हा वेळीच घरी या!" या सुवार्तेने मी विलक्षण सुखावलो आणि घरात सगळ्यांना ती सांगत सुटलो. मुलगी आणि सून अमेरिकेहून आलेली असल्यामुळे नात्यागोत्याची गर्दी होती. सगळी गप्पागोष्टीत चूर होती. मी दिलेली वार्ता कुणीच कानामनावर घेतली नाही. मी थोडासा खट्टू झालो. पण उत्साहाच्या भरात मी ती अप्रिय भावना बाजूला सारली आणि ही वेळ चुकवायची नाही असे ठरवून थोडे खाऊन घेतले. आणि सव्वा-नवालाच शेजारीच असलेल्या मुलीच्या घरी जायला निघालो. सगळी मंडळी आपापल्या रंगात दंग होती. पैकी माझ्या दोन मुली तेवढ्या माझ्याबरोबर निघाल्या.

आम्ही मुलीकडे पोचलो तेव्हा, मुलीकडची सर्वजणे विद्युद्दीपाच्या लख्ख उजेडात ब्रह्मकमळाचे उमलणे न्याहाळीत दारातच, दाराच्या पायथ्याशी बसली होती. आम्हीही तिथेच बसलो. धाकट्या मुलीने उठून समोरची कुंडी हळूच फिरवली आणि फुलाचा मोहरा आम्हांला स्पष्ट दिसेल अशी ती बसवली. हिरव्यागार लांब, बाकदार देठाचे ते नारळाच्या भकलाएवढे पांढरे शुभ्र फूल नुकतेच उमलू पहात होते. त्या फुलाच्या गोलसर पाकळ्या उघडत होत्या. तर पाकळ्यांलगतच्या आतल्या पाकळ्या चांगल्या फाकल्या होत्या. अगदी गवारीच्या शेंगांसारख्या. त्यांची टोके अगदी अणकुचीदार होती. मुलगी मला म्हणाली, "या ब्रह्मकमळीला गणेशचतुर्थील

---

**ब्रह्मकमळ उमलते तेव्हा**

३००६
निबंध २४०३८
३।११।८३

असलेच एक फूल उमलून गेले. त्यानंतर दिवाळीस दोन उमलली. हे दोन्ही उत्सव-प्रसंगं तुम्हांला चुकले म्हणून आज मुद्दामच तुम्हांला, ‘ या, असा निरोप पाठवला.’ “ पण अमक्याच वेळी हे उमलेल हे महेशला कसे काय माहिती ? ” मी पृच्छा केली. यावर मुक्ता म्हणाली, “ हे फूल फक्त रात्रीच उमलते, तेही नऊ-दहाच्या सुमाराला, हे त्यांनी तीनदा आधी पाहिले आहे ना ! ”

मला दोन वर्षांमागची आठवण झाली. याच कुंडीत तेव्हा केवळ एक पान लावलेले मी पाहिले होते. आणि त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण आकाराने त्याने माझे चित्त वेधले होते. ते हिरवेगार पान दीड वीत लांबीचे आणि तीन बोटे रुंदीचे होते. दोन्ही बाजूंना अर्धवर्तुळी कतरण होती. आणि देठाला रुंद असलेले ते पान, टोकाशी निमुळते होत गेलेले होते. मी मुक्ताला तेव्हा विचारले होते, “ हे पान आकर्षक आहे, पण ते एकटुके असे कुंडीत का खोवले आहे ? ” तिने उत्तर दिले होते, “ या पानाची गंमत अशी की, तेच काही दिवसांनी पाळ धरील आणि मग त्याच्या कातऱ्यातून अशीच पाने उगवू लागतील. आणि मग एक दिवस त्यातून फूल उमलेल. दिसायला ते पान दिसले तरी, तिला वेलच म्हटले पाहिजे. तिला ब्रह्मकमळी म्हणतात. ” यावर मी तिला विचारले, “ पण हे पान म्हण, वेल म्हण, तुला सापडले कुठे ? ” ती म्हणाली, “ वांदोऱ्याला. त्यांच्या आजोळच्या बागेत. ”

पानालाच पाने कशी फुटतात हे पहाण्याची मला उत्सुकता होती. एक दिवस याच कुंडीत त्या पानाला अनेक तसलीच पाने आलेली प्रत्यक्ष पाहिली आणि मी हरखून गेलो. त्यातले एक पान आणून मी घरच्या कुंडीत लावले देखील. पण त्याने काही मूळ धरले नाही. झाडा-रोपाविषयी केवळ कुतूहल असून भागत नाही. मुलासारखे त्याला जपावे लागते. त्याचे वेळच्या वेळी कोडकौतुक करावे लागते. जागरूकतेने आणि तत्परतेने त्याची निगा घ्यावी लागते. ती मला न जमल्यामुळे, ते बिचारे पान लावल्याजागी पिवळे पडले आणि मरून गेले.

माझ्या मनात ही खंत खोल कुठे तरी रेंगाळत राहिली होती. त्यामुळे आजचा पुष्पोत्सव म्हणजे पुष्पजन्म मला कपिलाषष्ठीसारखा वाटला. घरी आलेल्या मुलीच्या प्रसूतीची वेळ जवळ आली की, पित्याचे मन जसे हुरहुरू लागते, उत्सुकतेने भरून निघते आणि क्षणाक्षणाला वाढत्या उत्कंठेने अस्वस्थ होते, तशीच माझ्याही मनाची स्थिती आता झालेली होती. मी टक लावून त्या उमललेल्या ब्रह्मकमळाकडे पाहू लागलो. अंमळशाने, घंटेसारखे लोंबणारे ते फूल थरथर कापू लागले आणि मंद लयीत हेलकावे घेऊ लागले. पहिल्यांदा वाटले, वाऱ्याच्या झुळकेमुळे ते असे झुलत असेल. पण तिचा तर लवलेशही नव्हता. वेलीचे पान न् पान अगदी निश्चल होते. मी मुक्ताला म्हणालो, “ इथं कुठंच पान देखील हलत नाही आणि हे फूल तेवढे झुलत आहे हे कसं ? ” यावर ती म्हणाली, “ हीच तर या फुलाची खास गंमत आहे. हे झुलत

झुलतच उमलत असते. हळूहळू त्याच्या झुलण्याची गती वाढत जाईल आणि त्याच्या हेलकाव्यांनी पानांना कंप भरू लागेल. आणि पहाता पहाता नेमके असेच झाले. ते फूल इतक्या मंदगतीने फुलत होते की, त्याचा आकार वाढत चाललेला असूनही तो वाढत असल्याची रतिमात्र जाणीव होत नव्हती.

आता त्याला शहाळ्याच्या वाटीचा आकार आला होता आणि त्याच्या उमल-लेल्या पाकळ्यांना त्याच्या शुभ्र, पातळ मलईची ओलसर कांती लाभली होती. मी मुक्ताला विचारले, "याला वास असतो का ग?" ती म्हणाली, "असतो ना! पण तो तुम्हांला फार जवळून घ्यावा लागेल." मी आडवा पडून नाकाचा शेंडा अगदी त्याच्याजवळ नेला. त्याचा सुवास इतका मंद-मधुर होता की, मला तो फ्रेंच गंधार्का सारखा वाटला.

मी पूर्ववत माझ्या जागेवर बसून पुन्हा त्या फुलावर टक लावली. हळूहळू त्याने आपला पूर्ण आकार घेतला. त्याचे दर्शन प्रसन्न आणि प्रसाददायी होते. अजून असेच निवांत बसून रहावे असे वाटत होते. हे उमलणे पहाता पहाता तास उलटून गेला होता. आता निघायला हवेच होते. मी मुक्ताला विचारले, "अशा फुललेल्या अवस्थेत हे किती तास रहाते?" यावर ती म्हणाली, "हे कोण सांगणार! आम्ही तर त्यावेळी झोपलेले असतो. पहाटे पहातो तेव्हा ते मिटलेले असते."

आम्ही मुक्ताच्या घरच्या मंडळींचा निरोप घेऊन घरची वाट चालू लागलो. आम्हा तिघांवरही मौन पडले होते. मी तर सघन प्रसन्नतेने आत्मनिमग्न झालो होतो. रात्रीच्या निळ्या गहराईत माझ्यातले शुभ्रधवल ब्रह्मकमळ उमलू लागले होते आणि त्याच्या मंद-मधुर परिमलाने मी मंतरल्यागत झालो होतो. घरात शिरण्यापूर्वी सहज आकाशाकडे माझी नजर गेली. तेथेही नक्षत्रमंडित पाकळ्यांचे एक ब्रह्मकमळ उमलू लागले होते!

*

मी स्वभावतःच आनंदी आहे. लहानपणी घरामागची टेकडी हिंडताना, फुले खुडून त्यांच्या देठातला मध चोखण्याचा मला छंद होता. प्रत्येक क्षणातही त्याचा त्याचा मध असतो हेही मला अल्पवयातच समजले आणि त्याचाही मध मी चोखीत राहिलो. झुळझुळणारे झरे, भुरभुरणारी पिसाळी, हिरव्या गर्द झाडीतून गोलांड्या घेणारी चिमणी पाखरे, विमानासारखे हवेत तरंगणारे लालचुटुक चतुर. एकाच झेपेसरशी अचूक मासळी टिपणारा निळाशार खंड्या, चानकातर कोरणारी धीट सावध खार, पानावरचे ऊन, पाण्यावरचे चांदणे, काळोखातला काजवा, मेरेवरून सरकत चालणारी गोगलगाय, पावसातल्या विजा...अशा लहानसहान गोष्टींनीही मला आगळे सुख आणि अपार आनंद होत असे. पण असे असूनही, कसे कोण जाणे त्या वयातही दुःख मला चटकन जाणवत असे. विपर्यास, अवमान, देहदंडन, उपेक्षा आदि वैयक्तिक दुःखे चटकन जाणवली तर त्यात नवल नाही. पण मला विशेष तीव्रतेने जाणवायची ती दुसऱ्यांची दुःखे.

पिकेच्या दिवसांत आमच्या दारावर नाना प्रकारचे भिक्षेकरी येत; विशेषतः ऐन दुपारी थकले भागलेले आणि घामाने निथळत असलेले. मला त्यांची दया यायची. त्यांना मूठभर तांदूळ घालणे हा घरचा शिरस्ता होता. पण एवढ्यात त्यांचे भागणार कसे ? हा विचार मला अस्वस्थ करायचा. मधल्या दिवाणखान्यात तांदळाच्या पोत्यांची थापी असे. शेजारच्या कोटीत नारळांचा साठा असे. वडीलधाऱ्यांचा डोळा चुकवून मी त्यांना जादा तांदूळ आणि एखादा नारळ देत असे. आणि या प्रमादाबद्दल मला क्षमा करावी अशी देवीकडे मनातल्या मनात प्रार्थना करीत असे. भिक्षेकरी दुवा देऊन गेले तरी, त्यांचे उद्या कसे होईल ही चिंता मला सारखी छळत राही. माझ्या सवंगड्यांनी एखादा चतुर पकडून त्याच्या शेपटात सुईदोरा टोचला की, मला अक्षरशः त्याच्या वेदना जाणवत. खिश्चन मुले सरडा दिसला की, त्याला धोंड्याने टिपीत आणि मग त्याला ठेचून मारीत. हे पाहून माझा जीव रडकुंडीला यायचा. बिचाऱ्याला उगीच का मारता असे त्यांना विचारले तर ते सांगत की, त्यांच्या देवाला

ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ

खिळेठोक झाली ती त्याच्या चुकचुकण्यामुळे. म्हणून त्याला ठेचायलाच हवे. अशी दुःखे मी किती पाहिली याला गणती नाही. ती मला अंतर्मुख बनवायची. विचार करायला लावायची.

आयुष्य जगत गेलो तसे, दुःखाचे विविध प्रकार मी स्वतः जसे अनुभवले, तसेच दुसऱ्यांचेही सहानुभावाने जाणले. दुःख स्वतःचे असो किंवा दुसऱ्याचे असो, ते मला चिंतनप्रवण करी. त्यामुळे दुःखाविषयी माझे जे चिंतन, मनन घडत गेले, ते नेहमीच मला उदात्त अशा विषादात घेऊन जाई. हा विषादच जीवनाचा अन्वयार्थ स्पष्ट करीत असतो. तो जसजसा स्पष्ट होत गेला तसतसे मला कळून चुकले की, सुखदुःखाच्या ताण्याबाण्यानेच या जीवनाचे वस्त्र विणले गेले आहे. त्यांचे परस्परांचे एक गूढ असे नाते आहे. ते उमगल्याशिवाय जीवन उमगतच नाही.

जिब्रान म्हणतो की, जो पेला तुम्ही ओठांना लावला आहे, तो भट्टीतून आधी भाजून निघालेला असल्याशिवाय तुमच्या हाती आलेला नाही. आणि ज्या अल-गुजातून तुम्ही सुरेल आणि रसीली गत वाजवीत आहात, ते अष्टछिद्रांच्या यातना सोसूनच तुमच्यापर्यंत आले आहे.

सुख–दुःखे आपण सारेच भोगत असतो; किंबहुना ती नीट न भोगता आपण त्यांच्यापुरते बुडालेलो असतो. पण ज्या अपवादभूत व्यक्तींनी तटस्थ वृत्तीने त्यांचे खरे स्वरूप जाणले, त्यांनी सुखाची दाहकता आणि दुःखाची पावकता फार लवकर ओळखली. गौतमबुद्ध हा अशा विरळ्या जीवनद्रष्ट्यांचा चक्रवर्ती. मानवजातीच्या इतिहासात दुःखाचा शास्त्रशुद्ध विचार पहिल्यांदा त्यानेच केला आणि दुःखाबाबतची चार आर्यसत्ये जगाला प्रदान केली. सर्व दुःखांचा उगम हा तृष्णेत आहे हे पहिले आर्यसत्य. ती असेपर्यंत दुःख रहाणारच हे दुसरे आर्यसत्य. तृष्णा नाहीशी केल्यानेच माणूस दुःखातून सुटेल हे तिसरे आर्यसत्य, आणि तृष्णेतून सुटण्यासाठी त्याने सांगितलेल्या अष्टांगिक मार्गाचा अवलंब हे चौथे आर्यसत्य; हे त्याचे सांगणे आहे. पण ही सारी पढून भागत नाही, तर ती अंगी बाणवून घ्यावी लागतात. आणि त्यासाठी स्वतःच्या अनुभवाशी प्रामाणिक राहून, दुःखाची मीमांसा जागरूकपणे करावी लागते. आपले प्रत्येक दुःख हे केवळ आपल्या एकट्याचे नसून, ते सर्व मनुष्यमात्रांच्या कपाळी लिहिलेले आहे हे एकदाचे कळून चुकले की, आपोआपच स्वतःच्या दुःखाची तीव्रता शिणावत जाते.

एकदा म्हणे, एका बाईचा एकुलता मुलगा पोरवयातच सर्पदंशाने वारला. तिचा आक्रोश ऐकणे अशक्य होऊन कुणीतरी तिला सल्ला दिला की, भगवान बुद्ध गावात आहेत त्यांच्या पायावर मुलाला घाल आणि त्यांची करुणा भाक. त्यांच्या आशीर्वादाने मुलगा जिवंत होईल. आईने हा सल्ला पाळला तेव्हा, परम कारुणिक तथागत तिला म्हणाला, "गावात जा आणि सूर्य मावळण्याच्या आत कुठून तरी

मीठ मोहऱ्या घेऊन ये. त्या त्याच्यावरून ओवाळून टाकताच, तो उठून उभा राहील." त्याचे हे उद्‌गार ऐकून बाईच्या अंगात अवसान आले तेव्हा तथागत तिला म्हणाला, "मात्र एक लक्षात ठेव. ज्या घरात मृत्यू झाला असेल तिथल्या मीठ मोहऱ्या चालणार नाहीत." बाई मीठ-मोहऱ्या मागायला निघाली. जावे तिथे त्या तिला चटकन मिळत. पण या घरात कुणी कधी मेलेले तर नाही ना? असा तिने प्रश्न विचारताच घरची प्रत्येक बाई आपल्या प्रिय व्यक्तीच्या वियोगाची कथा तिला डोळ्यांत टिपे आणून सांगे. अनेक घरे ती अशी हिंडली. ज्यांत मृत्यू घडलाच नाही असे घरच तिला सापडेना. सूर्यास्त होण्याच्या सुमाराला रिक्तहस्त ती बुद्धाकडे आली. स्वतःच्या दुःखाऐवजी जगाच्या करुणेने ती क्लांत आहे हे त्याने लगेच ओळखले. तिला दुःखाचे दर्शन घडले होते.

स्वतःच्या दुःखातून जेव्हा आपल्याला असे जगाच्या दुःखाचे दर्शन घडते आणि त्याच्या विषयीच्या अपार करुणेने आपले मन भरून जाते, तेव्हा आपले दुःखच ज्ञानरूप बनते. मग कळते की, काही दुःखे मनोजन्य असतात, काही स्वभावजन्य असतात, त्यांचा निरास करणे आपल्याला शक्य आहे. ती नाहीशी करण्यासाठी आपण संतोषांनी खपू लागतो पण काही अशी असतात की, ती व्यक्तींच्याच नव्हे तर, समष्टीच्या आवाक्यापलीकडची असतात. कारण ती नियतिकृत असतात. काही तर आध्यात्मिकही असतात. नियतिकृत दुःखांकडे विवेकाने आणि अनासक्तीने पाठ करता येईल, पण आध्यात्मिक दुःखांना सामोरे जाण्यातच आपले आणि मानव-जातीचे कल्याण असते. ती अनिवार्य तर आहेतच, शिवाय ती स्वागतार्हही आहेत.

ज्योतीच्या मध्यभागी एक काळा-निळा गाभा असतो. तिच्या दाहकतेचे, पावकतेचे आणि प्रकाशकतेचे सारे उत्सर्जन तिथूनच होत असते असे विज्ञानाचे सांगणे आहे. आपल्या आत्मज्योतीमधे देखील असाच एक सर्जनशील गाभा आहे याची प्रचीती मी घेतलेली आहे.

जेव्हा जेव्हा तीव्र दुःखाने माझ्यावर प्रहार केला आहे, तेव्हा तेव्हा माझा हा ज्योतिर्गर्भ अधिक कार्यकर झालेला आहे. आणि माझ्या सर्जनशक्तीला, म्हणजे आनंदशक्तीला नवे बळ लाभलेले आहे आणि नवी जागृती प्राप्त झालेली आहे. त्यामुळे सुखाइतकेच मी दुःखाचेही स्वागत करतो आणि चवीने त्याचा आस्वाद घेतो. अन्नातील षड्रसांत कडू हा जसा एक रस आहे, तसेच दुःख हेही आनंद रसाचेच एक रूप आहे. कडुनिंबाला अमृत वृक्ष मानणाऱ्या आपल्या द्रष्ट्या पूर्वजांना हे माहीत होते. अनासक्तीशिवाय खरी रसवत्ता संभवत नाही. ती लाभली की, दुःखही आनंदमय होऊन जाते आणि चवीने ते आस्वादता येते.

सध्या फुलांचा ऋतू अगदी बहरात आहे. उन्हाळा तापू लागला असला तरी, सकाळच्या आल्हादक हवेत गारवा रेंगाळत असतो. पहिला चहा घेऊन होतो तोच, प्रामवाडीचा रखवालदार रामा फुले घेऊन हजर होतो. त्यात पिवळी जर्द सोनचाफ्याची फुले अधिक असतात. त्यातले सर्वांत अधिक घाटदार असे फूल तो खास भेट म्हणून मला देऊन जातो. मी ते घेताने एक-दोनदा हुंगतो आणि मग ते मोगल बादशहाप्रमाणे हलकेच चिमटीतून फिरवीत रहातो. त्याचा दरवळ जसा माझ्या अष्टांगात लहरत जातो, तसाच घरात आलेल्या त्याच्या भावंडांचा दरवळ घरभर पसरलेला असतो. त्या दरवळावर तरंगत तरंगत मी गोव्यात जाऊन पोचतो आणि भोवतालचे पुणे विसरून जातो.

माझ्या दृष्टीपुढे पाणवठ्याजवळचे गावचे हिरवेगार कुळागार असते. पोफळीच्या गर्द काचेरी झावळातून सकाळची रेशमी उन्हे वस्त्रगाळ होऊन जिकडे तिकडे तुकड्या तुकड्यांनी सांडलेली असतात. त्यांचा एक भला मोठा तुकडा केळपानांच्या छत्रीवर पडलेला असतो आणि तिच्यावर सांडलेली सोनचाफी उजळीत असतो. तिथून माझी नजर खाली जमिनीवर येते तोच, पोफळीमधून वहाणाऱ्या हातभर रुंदीच्या निळसर पाटातून अशीच काही सोनचाफी तरंगत जाताना मला दिसतात आणि माझे चित्त हरखून जाते.

या दिवसांत बस म्हाडदोळवरून जाताना या सोनचाफ्यांचा मत्त दर्प, येणाऱ्या जाणाऱ्याला घेरून, भारून टाकतो. चढणारा–उतरणारा असो नसो, ड्रायव्हर बस थांबवतो. त्यांचे पुडे विकणारी मुले गिल्ला करीत असतात. त्यांच्याकडून एक पुडा तो विकत घेतो. त्यातले एक फूल समोरच्या चौकटीतल्या दैवताला वहातो. प्रवाशांचीही पुडे विकत घेण्यासाठी अहमहमिका लागते. मला काही पुडा घ्यायचा नसतो; कारण मी घरून निघालेला असतो. मला फक्त एकच फूल घ्यायचे असते. पण तेवढ्यासाठी मी अख्खा पुडा विकत घेतो. असे माझ्या बाबतीत अनेकदा घडले

---

# सोनचाफा

---

आहे. आमच्या गोव्यातल्या स्त्रियांना तर या सोनचाफ्याचे विलक्षण वेड. त्यांच्या दोन-दोन वेण्या माळूनही त्यांचे समाधान होत नाही. त्यांचे घनगर्द काळेभोर अंबाडे अशा वेण्यांनी पाजळून उठतात. सोनचाफ्याच्या अशा वेण्यांचे ऐश्वर्य दिवजांच्या जत्रेत पहावे. कष्टकरी बाया चैत्र-वैशाखाच्या दोनप्रहराच्या उन्हात दिवजांची झाडे मिरवीत जेव्हा रांगेने देवळात शिरतात, तेव्हा त्यांच्या हातांतल्या ज्योती आणि केसातल्या सोनचाफ्याच्या ज्योती परस्परांशी स्पर्धा करतात असे वाटते.

केव्हा केव्हा म्हाडदोळच्या परिसरात कानावर वा शेंडीत सोनचाफे खोवलेला एकादा रसिक गावडा भेटतो आणि तो एकदम आपले लक्ष वेधून घेतो. तेथून मंगेशीच्या परिसरात आलो की, कारवार-मंगळूरकडची एखादी सारस्वत बाई दिसते. तिने अंबाड्यात एकच सोनचाफे खोवलेले असते. ते कुठे आणि कसे खोवले असता आपले लावण्य खुलून दिसेल, हे जणू या स्त्रियांना उपजतच माहीत असते. त्यांचा हा सहज साधा शृंगार, सौंदर्यवेधी मनाला खुलवून सोडतो.

गोवा हा एक चंपकसमृद्ध प्रदेश आहे. चाफ्याच्या विविध प्रकारांत त्याच्याशी सर करू शकेल असा प्रदेश क्वचित असेल. सोनचाफा, कुडचाफा, हिरवा चाफा, कवठीचांफा, नागचाफा, भुईचाफा आणि शिवलिंग चाफा एवढे चाफ्याचे प्रकार गोव्यातल्या प्रत्येकाला परिचित आहेत. प्रत्येकाला त्याचा खास आकार, रंग आणि गंध आहे. शिवलिंग चाफा हा तसा दुर्मिळ. हा माळला जात नाही. तो शिवाला वाहिला जातो. त्याचा गंध फारच मंद, पण त्याचे शिल्प मोठे आकर्षक असते. मधे पांढुरके शिवलिंग असते आणि त्याच्या भोवती डावलांसारख्या लाल, खोलगट पाकळ्या असतात. पण या सर्व चाफ्यातला राजा सोनचाफाच. आमच्याकडच्या स्त्रियांना त्याचाच सोस अधिक. त्यामुळे सोन्याची सोनचाफी किंवा त्यांची आटी माझ्या लहानपणी प्रत्येक मध्यम वर्गीय स्त्री वापरताना दिसे. ताजी सोनचाफी बारमास मिळू शकत नाहीत. म्हणून त्यांचा स्वर्णालंकार करून आपली हौस भागविण्याची कल्पना गोमंतकीय स्त्रीस सुचली असावी. ही हौस अशीच इतर फुलांच्या बाबतीतही तिने भागवून घेतली आहे. या हौसेच्या पायीच पूर्वी आपल्याकडील स्त्रियांची नावे बहुधा फुलांची असत. माझ्या आईचे माहेरचे नाव होते मोगरे, आणि मावश्यांची होती शेवते, गुलाब, जाई, चांफे अशी. गोव्यातल्या फुलांची चण एकंदरीत छोटी, पण त्यांचा वास उत्कट असतो. वासाच्या उत्कटतेत सोनचाफ्याची सर दुसरे कोणतेच फूल करू शकत नाही. कदाचित त्याचमुळे त्याचाच प्रभाव माझ्यावर अधिक पडत असावा.

घरात सोनचाफ्यांचा सुगंध दरवळला की, मला कोपऱ्यात कुठे तरी उत्तम वानीचा कापा फणस पिकून तयार असल्याचा भास होतो. बाळपणी आजोळी असताना

सकाळघडीला आजी आम्हाला ' माळ्या 'ची असोल्या नारळाएवढी पणसुले खायला द्यायची. चारेला नखाने कातरून ती मावा ओढून काढायची आणि मग उघड्या झालेल्या चारखंडावर सोनचाफ्यासारख्या पिवळ्या धमक गऱ्यांचा रसाळ सरंजाम आपल्या सुवासाने तोंडाला पाणी आणी. तो वास थेट सोनचाफ्यासारखा असायचा. तो माडा फणस केव्हाच मोडून गेला. फणसाची ती जात पुन्हा उपलब्ध झाली तरी, तशा फणसाचे गरे आज मी खाऊन पचवू शकणार नाही. पण त्याचा तो सोनचाफी सुवास माझ्या अष्टांगात भरून राहिला आहे. प्रतिमा आणि जीवन संगीत या माझ्या दोन कवितासंग्रहांमधल्या कालावधीत माझ्या कवितांच्या दोन छोट्या वह्या गायब झाल्या. त्यातल्या एका कवितेतले एक कडवे या वेळी मला एकाएकी आठवले, ते असे—

देह जाहला पिकला फणस
त्यात निथळला गोड सुधारस
घमघमाट ये दाही दिशांस
लोपले क्लेश, तोषला हृदी हृषीकेश ।।

फणसाच्या त्या वासामुळेच मला सोनचाफा इतका प्रिय झाला नसेल ना !

*

पुण्याला वर्षातून एकदा तरी माझी खेप होतेच आणि ती होते बहुधा उन्हाळ्यातच. बारमास गारवा बाळगून असलेले पूर्वीचे पुणे आता राहिलेले नाही. तरी देखील हवेच्या दृष्टीने अजून ते सुखावह आहे. गोवा आंदोलनाच्या संग्रामकालात चौदा वर्षे मी पुण्यात घालवल्यामुळे ते माझ्यात इतके भिनलेले आहे की, ते आता माझ्या मनाचे दुसरे माहेर होऊन बसले आहे. पुण्याला आलो की, मुलीच्या आणि इष्टमित्रांच्या आग्रहामुळे माझा इथला मुक्काम वाढत जातो. संस्थांची निमंत्रणे येत राहतात. त्यामुळे आपल्याला हवी असलेली समर्थनेही मिळून जातात.

पण मी खरा राहतो तो आपल्याच मनाची ओढ भागविण्यासाठी. पूर्वीच्या येथल्या वास्तव्यात मी खूप हिंडत असे. शेतकी कॉलेज, मुळामुठेचा संगम, संभाजी पार्क, कमला नेहरू पार्क, सारसबाग, फर्ग्युसन टेकडी अशा माझ्या आवडत्या स्थळी निश्चिंत मनाने फेरफटका करणे हा माझा मोठाच विरंगुळा असे. पण हल्ली पुण्यात वाहनांची वर्दळ इतकी वाढली आहे की, रस्त्यातून निर्वेध चालणे अशक्य होऊन बसले आहे. रस्ता ओलांडणे इतके धोक्याचे झाले आहे की, एखादी सायकल किंवा रिक्षा केव्हा तुम्हाला धडक देऊन जाईल याचा नेम नसतो. त्यामुळे कवीला आवश्यक असलेले परिभ्रमण या रस्त्यातून शक्यच नाही.

त्यामुळे जेव्हा जेव्हा मी पुण्याला येतो, तेव्हा तेव्हा परिभ्रमणासाठी मी मुलीच्या बिऱ्हाडाशेजारची चित्तरंजन वाटिका पसंत करतो. ती अवघ्या दोन फर्लांगांच्या वाटेवर आहे.

पहिल्यांदा मी तिकडे गेलो तेव्हा. तिच्या नावात अभिप्रेत असलेली रंजकता मला काही जाणवली नाही. काही गोंडेदार गुलमोहर आणि जपानमधील साकुरा सारखी बहरलेली झाडे दिसली पण लक्षवेधी फुले फारशी दिसली नाहीत. वाटिकेत गर्दी आहे ती लहान-मोठ्या वृक्षांची. वाटिकेच्या मुख्य सरळ डांबरी रस्त्याला उजव्या अंगाने तशाच रस्त्यांची तीन महावर्तुळे आहेत. संथ चालीने त्यांची एक प्रदक्षिणा

---

## चित्तरंजन वाटिका

---

आटपायला पंधरा मिनिटे लागतात. अशा तीन प्रदक्षिणा घातल्या की, परिभ्रमणाचा पुरेसा आनंद तर मिळतोच, शिवाय शरीराला तरतरीत वाटेल इतकी सहलही घडते. मग एकाद्या बाकड्यावर बसायचे आणि सर्वांगांनी भोवतालचा आसमंत भोगायचा असा परिपाठ मी चालू केला. सकाळ-संध्याकाळ मी वाटिकेत सहलीला जायचा. वृक्षांच्या दाटीवाटीतून उगवती वा मावळती उन्हे वाट कशी काढतात आणि हुंदडत राहतात हे बघत राहण्यात आगळाच आनंद वाटायचा. गर्द पालवीमुळे न दिसणाऱ्या अनेकविध पक्ष्यांचे श्रुतिसुभग आवाज टिपण्यात विलक्षण गोडी वाटायची. मग त्यांना बघण्याची उत्कंठा लागायची. अशा वेळी साळुंक्यांचा पुंजका उभ्याने उड्या टाकून डोळ्यांपुढून निघून गेला की, किती बरे वाटायचे. संध्याकाळी घरट्याला परतणारी पाखरांची अष्टके पाहिली की, मनात घरच्या आठवणी गडद होऊ लागायच्या. एकदा नेहमीसारखा भोवतालचे ऋतुनाट्य न्याहाळीत बाकावर बसलो असताना, माझ्या खांद्यावर गुलमोहराची केशरी फुले झडू लागली. विस्मयचकित होऊन मी वर पाहिले, मागचा महाकाय गुलमोहर संतोषाने आपला बहर उधळीत होता. मला वाटले, फुलावे तर हे असे आणि बहरता बहरता सुटावे तरही असेच. त्यासरशी माझ्या तोंडून ओळी निघाल्या.

गुलमोहर झडतो माथां
मी सुटत चाललो आता

एका योगायोगाने येथे ही कविता मी लिहून गेलो आणि त्याच क्षणी ही वाटिका जी इतके दिवस मला परकी होती तिचे-माझे निकटचे नाते जमून गेले. त्यानंतर या वाटिकेत वेगवेगळ्या वेळी मिळून मी आणखी तीन कविता लिहिल्या. न लिहिलेल्या कवितांना तर गणतीच नाही.

या वाटिकेशी माझी मैत्री जशी वाढत गेली, तसतशी माझ्या नजरेत न आलेली तिची कितीतरी वैशिष्ट्ये मला दिसत गेली. ठराविक बाकावर काही पेन्शनर म्हातारे, रोज आपल्या जीवनाच्या पोथ्या वाचत, सुखाने कालक्रमणा करत असतात हे लक्षात आले. काही वृक्षांच्या मुळांशी किंवा आडोशाच्या बाकड्यावर प्रेमयुगुले मंद्र सप्तकात आपल्या गुजगोष्टी करत असतात हे पाहून माझे मन निरतिशय कौतुकाने त्यांना आशीर्वाद देऊ लागले. आंतरजातीय विवाहांना उत्तेजन देण्यासाठी नगरपालिकेने मुद्दामच ही सोय केली आहे हे कळल्यावर तर, मनातल्या मनात मी तिला धन्यवाद देऊन टाकले. एकदा रायकर नावाचे गोव्याचे एक गृहस्थ भेटले. वधुवरांची लग्ने परस्पर स्नेहाने आणि संमतीने व्हावी म्हणून त्यांनी एक संस्था काढली आहे. तिला या वाटिकेचा फार चांगला उपयोग होत असतो हे त्यांच्याकडून समजले.

या खेपेला मी या वाटिकेत मुलांची शिबिरे भरलेली पाहिली. त्यांच्या चित्रस्पर्धा पाहिल्या. त्याचप्रमाणे जॉगिंग करणारे तरुण, व्यायाम करणारे वयस्कर, सुमुसुमू चालणाऱ्या स्थूलांगिनी, नेमाने सहल करणारी वृद्ध जोडपीही पाहिली त्यांची-आपली प्रत्यक्ष ओळख नसली तरी, त्यांचे चेहरे आणि हालचाली पाहून किती बरे वाटते ! ही एक प्रकारची निःशब्द पण स्नेहशील बिरादरीच असते. माणसे एकमेकांशी बोलली नाहीत तरी, ती एकमेकांना जाणू इच्छितात. स्नेहाची देवघेव करू इच्छितात. त्यातला एकादा धीटपणाने ओळख करून घेतो. आणि मग स्नेह जमू लागतात. एकामुळे दुसरा, दुसऱ्यामुळे तिसरा अशी स्नेहाची साखळी वाढत जाते.

या वाटिकेत हिंडता हिंडता अशाच क्रमाने अनेक स्नेही मला लाभले आहेत. आणि त्यांच्यामुळे माझे ओसरणीचे जीवन परिपुष्ट झाले आहे. त्यांनी माझा पाहुणचार केला. मीही त्यांना अगत्याने गोव्याला बोलावले.

या वाटिकेने माझ्यातली कविता फुलविली आहे. झाडांशी, फुलांशी आणि माणसांशी मला अधिक जवळून जोडले आहे. पुण्यातल्या बदलत्या जगाची मला ओळख करून दिली आहे. आता माझे गोव्याला परतण्याचे दिवस जवळ येत चालले आहेत. येथून निघेपर्यंत तिचा मिळेल तितका सहवास मी घेणारच आहे.

आणि तरीही जाताना माझ्या मनाचा एक तुकडा या वाटिकेत रेंगाळत राहील.

काल संध्याकाळी नेहमीसारखा मी अर्धा पाऊण तास फेरफटका करून घरी परतलो. आणि व्हरांड्यात खुर्ची टाकून समोरचे दृश्य पाहू लागलो. दिवस पडून बराच वेळ झाला होता आणि काळोखाचे अधिराज्य वाढत चालले होते. पश्चिम क्षितिजावर ज्या मंद लालिम्यातून एक विराट कमल उमललेले होते तेथून दृष्टी सहज वर गेली, तर तिथे बीजेची नाजुक, नितळ चंद्रकोर. वाटले, आकाश शिव-स्वरूपात ध्यानस्थ बसले आहे. धरित्रीवर काळोखाची काळी मखमल पसरलेली होती आणि शुक्राच्या मंद चांदण्यात ती तकाकत होती. इतस्ततः सारी झाडी हिरव्या-काळ्या वर्णात गाढावली होती. आणि मंतरल्यागत मुकाट आणि निश्चल होती. डाव्या अंगाला असलेल्या इमारतींचा पुंजका एकाकार होऊन त्याला काळ्या-कभिन्न किल्ल्याचे रूप आले होते. मधूनच आग्वादची दांडी उजळून उठे आणि तिचा झोत चित्त चकित करून जाई.

या साऱ्या चित्राने मी असा काही भारून निघालो की, विलक्षण अंतर्मुख झालो. माझे लक्ष माझ्या श्वासक्रियेवर केंद्रित झाले. श्वासाची ये-जा ते न्याहाळू लागले. तिचा मागोवा घेऊ लागले. आणि ही प्रक्रिया चालली असताना माझे अंतःकरण अपूर्व अशा माधुर्यातिशयाने भरून निघाले. हा असा अनुभव मला अगदी नवाच होता. निसर्गाशी तादात्म्य पावता पावता आपण असे आत्मस्थित कसे झालो याचा माझा मलाच अचंबा वाटला. मनात आले, ही स्थिती सहजसाध्य व्हावी म्हणूनच; आपले ऋषिमुनी वनातले वास्तव्य पसंत करीत असावे.

मला आलेल्या या अपूर्व अनुभवामुळे मी माझ्या निसर्ग प्रत्ययाच्या आठवणी चाळू लागलो. एकाएकी माझ्या तरुणपणातला एक अविस्मरणीय प्रसंग मला आठवला. मी तेव्हा मडगावला रहात होतो. उन्हे उतरू लागली होती. सूर्य अजून अस्ताला जायचा होता. अशा वेळी मी आणि माझे कविमित्र कारे गावातल्या टेकडीवर साहित्यचर्चा करीत बसलो होतो. बोलता बोलता माझी नजर आकाशा-

---

तल्या ढगाकडे गेली. हे ढग किती रंगांचे आणि किती आकारांचे होते म्हणून सांगू! पण त्यांत छोट्या छोट्या गोलांची शिखरे बनलेल्या ढगांनीच माझे अधिक लक्ष वेधले. त्यांतले काही निळसर होते, तर काही गुलाबी होते. त्यांत आईसक्रीमचा गोडवा, खाळपणा आणि शैत्य ही तिन्ही सुंदर रीतीने एकवटली होती. त्यांच्याकडे पाहाता पाहाता मी अपूर्व सौंदर्यानंदाने असा काही बहरून निघालो की, अक्षरशः माझ्या डोळ्यांतून सुखासवे ओघळू लागली. कान्यांनी चमकून मला विचारले, "काय झाले?" शब्दांनी अंतःशांतीचा भंग करणे मला रुचेना. मी फक्त ढगांकडे अंगुलिनिर्देश केला. तो क्षण, ते दृश्य, ते सुख अजून माझ्या मनात ताजे आहे.

त्या सुखस्थितीची मनाने उजळणी करीत असतानाच, मला तिसरा प्रसंग आटवला. त्या वेळी मी हणजूणला एका इंग्रजी शाळेचा मुख्याध्यापक होतो. माझ्या रहात्या घरापासून समुद्रकिनारा अवघ्या दोन फर्लांग अंतरावर होता. जांभ्या खडकाच्या दाटीवाटीत होणारा तिथल्या फेसाळ लाटांचा खळखळाट पहात राहण्यात अवर्णनीय आनंद असे. तिथले सूर्यास्त मी सहसा चुकवीत नसे. पंधरवड्यातून एकाद्या शनिवारी मी पायीच पऱ्हा गावी जायचो. तेथे माझे मेहुणे आणि मित्र गुंडोपंत आमोणकर रहात असत. त्यांच्या सहवासाच्या आणि विशेषतः त्यांच्याकडच्या चर्चांच्या ओढीने मी ही तासादीडतासाची पायपीट संतोषाने करायचा. त्यांच्याकडे पोचेपर्यंत दोन छोट्या टेकड्या ओलांडाव्या लागत. पण वाटेतला सारा परिसर इतका देखणा होता की, तो पाहता पाहता आपण केव्हा मुक्कामाला पोचलो हे लक्षातही येत नसे.

एकदा अशा या वाटेने चाललो असताना, मी एक टेकडी ओलांडून दुसऱ्या टेकडीच्या माथ्यावर पोचला. नवंबर-डिसेंबरचे दिवस असावे. सूर्य अस्ताला चालला होता. तकतकीत पानांची छोटी-मोठी काजूची झाडे उतरत्या उन्हात मोठी विलोभनीय दिसत होती. चालता चालता माझे लक्ष एका उघड्या-वागड्या बालकाकडे गेले. ते उन्हात एकटेच बसले होते. मावळत्या उन्हात त्याचे भुरभुरणारे कोवळे जावळ पेटल्यागत वाटत होते. आणि त्याची सावळी कांती तांबूस कांतीने झळाळत होती. त्याचे टक मावळत्या सूर्याकडे लागले होते. पण माझी चाहूल लागताच त्याने विस्मयाने माझ्याकडे पाहिले आणि ते इतके छान हसले की, भोवतालचा सारा परिसर त्याच्या निरागस हास्याने बहरून निघाला असे मला वाटले. अपार वात्सल्याने माझे अंतःकरण काठोकाठ भरून निघाले.

पण दुसऱ्याच क्षणाला मला त्या बालकाविषयी काळजी वाटली. त्याची आई जवळपास नाही कशी? हे मूल या टेकडीच्या माथ्यावर असे एकटे कसे? आणि हे असे एकटेच असले तर, त्याला सोडून जायचे कसे? गोंधळून मी आजूबाजूला पाहू

लागलो. आणि एखाद्या माणसाची चाहूल लागते का याचा अंदाज घेऊ लागलो. तोच खट् खट् असा आवाज झाला. त्याच्या अनुरोधाने मी चालून गेलो. पाहतो तर, एक बाई काजूच्या झाडाच्या वाळक्या डहाळ्या कोयत्याने तोडीत होती. मी तिला म्हणालो, "बाई, मुलाला असे लांब एकटे ठेवू नका." ती तशीच माझ्याबरोबर आली आणि मुलाला घेऊन गेली. माझ्या मनावरचे ओझे उतरले आणि प्रफुल्ल अंतःकरणाने मी टेकडी उतरलो. अगदी हवेत तरंगल्यागत इतका मी आनंदातिशयाने फुलारलो होतो. निसर्गाच्या विशिष्ट सौंदर्य संयोजनेत मला हा जो प्रत्यय आला तो केवळ सौंदर्यानुभव नव्हता, तर एक आगळा धर्मानुभवच होता. माझ्या मनात आले, कोणाही मुलाला पहाताच असे भाव माझ्या मनात असे उचंबळत राहिले तर, माझ्या सुखाला सीमा रहाणार नाही.

मी गोव्यासारख्या परम सुंदर निसर्गभूमीत जन्माला आलो हे माझे एक अहोभाग्य आणि तिचे सौंदर्य चटकन टिपण्याची मला दृष्टी लाभली हे त्याहीपेक्षा अधिक मोठे अहोभाग्य. त्याच्यात वारंवार रमत, तादात्म्य पावत राहिल्यामुळे विविध दिव्यभाव माझ्यात नेहमीच उमाळत राहिले. त्यामुळे माझ्यातले खळमळ अनायास वाहून गेले आणि प्रत्येक वेळी मी शुचिर्भूत आणि फुलासारखा हलका होऊन निघालो. पूजा-अर्चा, कौल, प्रसाद, व्रते, वैकल्ये, ध्यान-योगादी साधना असल्या कोणत्याही गोष्टी न करता केवळ निसर्गतादात्म्यामुळे परम चैतन्याचा संजीवक संस्पर्श मला सतत मिळत आलेला आहे. त्यातून लाभणाऱ्या अमृतसेवनामुळे माझ्यातल्या सर्व तृष्णा आपोआपच शमल्या आहेत. आणि नित्य नवा दीस आनंदाचा, असा साक्षात्कार मी रोज घेत असतो.

निसर्गाने परिवेष्टित करून, ईश्वराने आपल्यावर केवढी कृपावृष्टी केली आहे हे जाणवले की, अपार कृतज्ञतेने माझे डोळे एकदम पाणावून निवतात.

*

आमच्याकडची मोगर अजून तुम्ही पाहिलेली नाही. जेव्हा पहाल, तेव्हा तिच्यावर खूष होऊन जाल. ती अंगलटीनं सडपातळ आहे. वर्णाने पांढरीशुभ्र आहे. फक्त तिचे डोके, पाठीवरचे दोन चट्टे आणि शेपटी एवढीच काय ती शेवाळी रंगाची आहेत. या तुरळक शेवाळी रंगामुळे तिची एकंदर शुभ्रता अधिकच उठून दिसते. अंग चाटून स्वच्छ करताना अजून कधी मी तिला पाहिलेले नाही. पण तिच्या अंगाला सॅटीनची चमक आहे. माझी सर्वांत धाकटी, एक वर्षाची नात जेव्हा आमच्याकडे येते, तेव्हा ती हटकून तिच्या अंगाला भीतभीत हात लावते आणि गुदगुल्या झाल्यासारखी आनंदून हसत रहाते.

मोगर देखणी तर आहेच. पण तिचा खास विशेष हा की, आपल्या कोणत्याही पवित्र्यात वा आविर्भावात ती विलक्षण आकर्षक आणि खानदानी दिसते. पूर्व-जन्मातली ती खचितच राजपुतानी राजकन्या असावी. बसलेली असताना असो, उठताना असो, किंवा अंगाला आळोखे-पिळोखे देताना असो, तिच्या प्रत्येक देहाकृतीला चित्राकृतीची सौंदर्यकळा प्राप्त होते. हिच्याच एकाद्या पुराणजननीला पाहूनच योगासनांची कल्पना पहिल्या योगमहर्षीला सुचली असावी !

मोगर मूळची गावभवानी. आमच्या वाडीतल्या सगळ्याच घरी घरची होऊन ती वावरलेली आहे. सगळ्यांनाच ती हवीहवीशी वाटते. तिच्या वर्णावरून असेल किंवा स्वभावावरून असेल, कुणीतरी तिला मोगर नाव ठेवले. आणि तेच आता वाडीत रूढ झाले आहे. माझ्या आईचे माहेरचे नाव हेच असल्यामुळे मला ते विशेषच प्रिय वाटले.

आमच्याकडे तिचा वावर सुरू झाला तेव्हा, तिच्या एकंदर लक्षणावरून ती पहिलटकरीण असल्याचे आमच्या ध्यानी आले. पहिल्या गर्भारपणाचे आगळे सौंदर्य घेऊन ती आमच्याकडे आली होती. माझ्या पत्नीला, खरे सांगायचे तर, मांजरे आवडत नाहीत, पण आपल्या नाजुक स्थितीमुळे मोगरने तिच्या स्त्रीसुलभ करुणेला स्पर्श

---

**आमची मोगर**

केला. त्यात तशा स्थितीतही झुरळे, पाली ती अचूक टिपायची. त्यामुळे तिच्यावर ती एकदम प्रसन्न झाली.

मला मांजर लांबून पहायला आवडते. त्याला निर्मितिप्रक्रियेचे प्रतीक मानून मी एक चांगली कविताही त्याच्यावर लिहिलेली आहे. पण त्याने भलती सलगी केलेली मला आवडत नाही. त्याचा स्पर्श लुसलुशित असतो. पण त्याने पोटऱ्यांशी अंग घासलेले मला चालत नाही. अंथरुणात झोपणे, लेखनाच्या खुर्चीत पहुडणे, अंगाला हलकेच हात लावून काही तरी सांगत रहाणे, या त्याच्या खोडी मला सहसा रुचत नाहीत. त्यामुळे आरंभापासूनच मी मोगरला चार हात दूरच ठेवली.

पण एक दिवस जेवणाच्या टेबलाखाली मला एक हिरवेकंच चिमणे पाखरू मरून पडलेले सापडले. मी हिला म्हटले, " हे पाखरू इथे असे मरून कसे पडले ? "

तर ही म्हणाली, " हा आपल्या मोगरचाच पराक्रम असणार. ती ह्या गोद्रेजवर टपून बसते. आणि पारवे, पाखरे अचूक टिपते. "

" काय ? या सव्वा–पुरुष उंचीच्या कपाटावर ती उडी घेते ? "

" हो ना ! शिवाय एकाच झेपेत शिकार साधते. पण ती ती खात मात्र नाही. "

खिडकीत बसलेल्या मोगरकडे मी पाहिले. आपण जणू या गावचीच नाही अशा साळसूदपणे ती बसलेली होती.

उकाडा असला की, स्वयंपाकघरातल्या शीतल फरशीवर लोळण्याची आणि एरवी गाद्यागिर्द्यांवर पहुडण्याची तिला सवय आहे. माझ्या लेखनाच्या फिरत्या खुर्चीवर लव्यांच्या मानरीची बसकण आहे. वर मुलायम कातडी उशी आहे आणि तिच्यावर वाघाच्या छाव्याचे उबदार कातडे आहे. एकदा सहलीहून परतल्यावर तिला मी या माझ्या खुर्चीत पहुडलेली पाहिली.

आवाजाला किंचित धार आणून, पण तो न चढवता मी तिला म्हणालो, " हे बघ मोगर, मला या माझ्या खुर्चीत कुणी बसलेले खपत नाही. आणि तू तर चक्क तिच्यावर पहुडली आहेस. "

एवढे मी बोललो मात्र, शहाण्या मुलीप्रमाणे पटकन उडी टाकून ती शेजारच्या स्वयंपाकघरात दिसेनाशी झाली. त्यानंतर अजून पुन्हा त्या खुर्चीत मी तिला पाहिलेले नाही.

एकदा मी जेवायला बसलेलो असताना अर्भकाच्यासारखे आपले कोवळे पंजे माझ्या पायांना लावीत मोगर मला काही तरी सांगू पाहात होती. तेव्हा मी जरा

चढ्या आवाजात हिला म्हणालो, " मोगरला नेहमी आपल्या आधी वाढत जा. जेवताना कुणी अंगाला हात लावलेला मला खपत नाही. " मोगर उमजली आणि बाजूला झाली. तेव्हापासून मला हात लावण्याचे तिने सोडून दिले. हिच्याशी मात्र तिची असली लगट नेहमीची होऊन बसली आहे. हिला सगळी भाषा समजते.

आमच्याकडे आल्यापासून तिचे गावभवानीपण सुटले. कधी कंटाळा आला तर, शेजारीच रहाणाऱ्या माझ्या मुलीकडे ती जायची. सुटीत मला सपत्निक पुण्या-मुंबईला जावे लागले. मुलगीही मुलांना घेऊन आपल्या गावी गेली. आम्ही परत आलो तेव्हा, देखण्या पिलांना घेऊन ती आमच्याकडे आली. नवखी होती. बोका पिलांना खाऊन टाकील म्हणून धास्तावलेली होती. पिलांचे कोपरे सारखी बदलायची. कधी आमच्याकडे, तर कधी मुलीकडे. पिले थोडी मोठी होताच, शेपटी हलवीत ती त्यांना तासन्‌तास खेळवायची. ती लेंड्या टाकायची. त्यांना कंटाळून हिने तिची दोन्ही पिले आपल्या मैत्रिणींना देऊन टाकली. रात्र झाली की, त्यांच्या आठवणीने मोगर आर्त आवाजाने त्यांना हाका घालायची. सारखी आत–बाहेर करायची. तिच्या या आर्त हाकांनी माझे काळीज पिळवटून जायचे.

काही दिवसांनी ती त्यांना विसरली असावी. दोन बोके तिच्या मागावर असत. एक होता काळाकुट्ट आणि घाऱ्या डोळ्यांचा. येताना लांडग्याच्या पावलांनी यायचा. दुसरा होता चांगला गुब्रदुल, शेवाळी रंगाचा. कुणालाच ती सलगीत घेत नव्हती. ती राजकन्येच्या ऐटीत उन्हात पहुडलेली असायची. आणि हे दोघेही बोके अंतर सांभाळून तासन्‌तास तिच्याकडे टक लावून बसलेले असत. एकदा ते असेच बसलेले असताना ही मला म्हणाली, " आपल्या मोगरकडे दोन्ही बोके कसे डोळ्यांत जीव आणून पहात बसले आहेत ते एकदा पहा तरी, ती मात्र त्यांच्याकडे ढुंकूनही पहात नाही. "

" पुरुष जातीचा लंपटपणा पहात बसण्यात मला रस नाही, " असे म्हणून मी माझे वाचन चालूच ठेवले. केव्हा तरी त्यांतल्या एकावर ती प्रसन्न होईल हे मी जाणून होतो. आणि झालेही तसेच. मोगर गाभण राहिली. या खेपेला तिला चांगलेच पोट आलेले होते. काही दिवस गेले. ही आपल्या परीने तिचे डोहाळे पुरवीत होती. तिच्यासाठी खास मासळी घेत होती. ती अंगाने जड होऊन मदालस पावलांनी फिरू लागलेली पाहिल्यावर मीही तिच्या बाबतीत थोडा नरम झालो. एके दिवशी संध्याकाळी ती विलक्षण आर्त स्वर काढू लागली. हिच्या पायांना अंग घाशीत हिला काही तरी सांगू लागली. मी ओळखले. मी हिला म्हटले, " तिची व्यायची वेळ झालेली दिसते. " लगेच स्वयंपाकघरातल्या. शिंक्याखालची जागा हिने मोकळी केली आणि तिला लुसलुशीत बिछायत घालून दिली.

आता तिला चार पिले झाली आहेत. पंधरा दिवस होऊन गेले. पण तिने त्यांना जागची कधी हलवली नाहीत. त्यांच्या अंगावरचे चट्टे शेवाळी आहेत आता ती रांगू लागली आहेत. चौघेही तिला सारखी लुचत असतात, म्हणून ही तिला अगत्याने खाऊ-पिऊ घालते. मी चेष्टेने तिला म्हणतो, “ आता काही दिवस तिला नेमाने आटवल देत जा. ”

पण मनात मात्र ठरवले आहे की, यांतले एकही पोर कुणाला द्यायचे नाही. अधून मधून पतवंडांप्रमाणे त्यांना अंगावर खेळवायचे.

घरात मुले-नातवंडे असतात. त्यांचे असे खास आगळे वेगळे जग असते. त्यात नाना गमती असतात आणि त्या विलक्षण चित्तवेधक आणि आनंददायी असतात हे आपल्या गावीही नसते. आपण त्यांच्यावर माया करतो. त्यांना जेवू-खाऊ घालतो. त्यांचे कोडकौतुकही करतो. पण त्यांच्या जगात मोकळेपणाने वावरायला जे मन लागते, तेच आपण गमावून बसलेले असतो. त्यामुळे आनंदाचा फार मोठा ठेवा आपण घालवला आहे याचे भानही आपल्याला नसते. त्यामुळे त्यांना आपण खऱ्या अर्थाने ओळखू शकत नाही. त्यांचा विश्वास जोडू शकत नाही आणि त्यांचे स्नेही आणि वाटाडे बनू शकत नाही.

मी विशीत आलो तेव्हाच, माझ्या वडिलांनी आपले वडिलकीचे अधिकार माझ्याकडे सोपवले. माझ्या पाचही भावंडांना मी अपत्यवत मानले. पुढे मला मुले झाली. त्यांचाही प्रतिपाळ मी यथासांग केला. पण मला पहिले नातवंड होईपर्यंत माझ्यात खरेखुरे वात्सल्य आवलेच नाही. माझी थोरली मुलगी प्रसूत व्हायची होती. पण हॉस्पिटलात जाण्याचा मला धीर होईना. मी माझ्या पुण्याच्या बिऱ्हाडी एकटाच राहिलो. पण तिच्या प्रसूतिवेदनांच्या केवळ कल्पनेने मी इतका हैराण झालो की, घराला कुलूप लावून वेड्यासारखा हॉस्पिटलच्या दिशेने पळत सुटलो. वाटेत कुणी तरी मला ओळखून, आपली गाडी थांबवली आणि मला हॉस्पिटलकडे सोडले. मी आत गेलो तेव्हाच, नवजात नातवाला घेऊन आयाने त्याला माझ्या पुढे केले आणि आनंदातिशयाने माझे डोळे ठिबकू लागले. वात्सल्याचा पहिला सुखोद्रेक मला उत्कटतेने जागवला तो तेव्हा. त्यानेच मला प्रातिभ अशी नवी दृष्टी दिली आणि मला मुलांच्या जगात प्रवेश मिळवून दिला. या पहिल्या नातवाचे आम्ही नाव ठेवले शैलेश. तो मोठा झाला तेव्हा, शाळेतून नेहमी उशिरा यायचा आणि आई-आजीची बोलणी खायचा. पण उलट उत्तरे द्यायचा नाही. मी एकदा त्याला विश्वासात घेऊन विचारले, "तू नेहमी आई-आजीची बोलणी का खातोस? शाळेतून उशिरा का येतोस? तू खोटे बोलणार नाहीस याची मला खात्री आहे.

**मुलांचे जग**

खचित तुझे म्हणून काही कारण असलेच पाहिजे." माझ्या या बोलण्याने तो सुखावला आणि मला म्हणाला, "माझ्या वर्गातला एक मुलगा फार गरीब आहे. शाळेपासून त्याचे घर फार दूर आहे. बससाठी लागणारा आणा त्याच्याजवळ नसतो; म्हणून मी माझा आणा त्याला देतो आणि स्वतः चालत घरी येतो." त्याच्या या उत्तरासरशी मला गहिवरून आले. पण गहिवर आवरून मी त्याला विचारले, "पण तू चालत येतोस तसा तोही चालत गेला तर?" यावर त्याने उत्तर दिले, "तो अगदीच दुबळा आहे. एवढी चाल त्याला झेपणार नाही." त्याच्या या उत्तराने मला त्याचा मोठा अभिमान वाटला. मी त्याची पाठ थोपटली आणि घरात ही गोष्ट सांगून समजावले की, यापुढे त्याला रागे भरायचे नाही.

शानी चार वर्षांचा होता. त्याच्या आजीने दिवेलागणीला इतर मुलांबरोबर त्याला देव्हाऱ्यापुढे उभे केले आणि देवाला हात जोडायला सांगितले. तो म्हणाला, "माझी आणि देवाची ओळख नाही." ती म्हणाली, "मी ती करून देते. देव आपल्याला सर्व काही देतो, संकटाला पावतो." तोच त्याने प्रतिप्रश्न केला, "पण आजी, तो आकाशात रहातो. कुणीच त्याला पाहू शकत नाही, असे तूच मला सांगितले होते ना?" ती म्हणाली, "हो ना!" "मग ज्याला कुणीच पाहिलेले नाही त्याची मूर्ती कशी केली?" शानीच्या प्रश्नाने आजी बिचारी अवाकच झाली.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी शानीच्या आजोबांचे वर्षश्राद्ध आले. पाने वाढून होईस्तो दुपारचे अडीच वाजले. भुकेने हैराण झालेल्या शानीने चुलत्यांना विचारले, "भाईकाका, पाने तर वाढून झाली. आता जेवायला काय हरकत?" भाईकाका म्हणाले, "आजोबांनी पहिला घास घेतला की, आपण जेवायला लागायचे"
"काय! देवाघरी गेलेले आजोबा येथे जेवायला येतील?"

"हो, ते छोटेसे पान दिसते ना! ते आजोबांचे."

"एवढ्या मोठ्या आजोबांना एवढे छोटे पान का?"

"आजोबा येतील ते कावळ्याच्या रूपाने येतील."

"लोकांचे देवाघरी गेलेले आजोबाही असेच येतात?"

"हो ना!"

"मग येतील ते आपलेच हे कसे ओळखायचे?" शानीच्या या प्रश्नाने भाईकाका निरुत्तर झाले. वाटेल त्या थापांनी मुलांना आपण बनवू शकतो असा आपला समज असतो. पण काही मुले आपल्या बुद्धिमत्तेने आपल्याला अशी चकवतात.

माझे एक स्नेही वर्टी नावाच्या एका मित्राकडे गेले होते. घरच्या चिमुरड्या मुलीने त्यांचे स्वागत केले.

ती म्हणाली, " बाबा बाहेरगावी गेले आहेत. आई आंघोळ करते आहे. तिला कोण आलंय म्हणून सांगू ? " तो म्हणाला, " मी दयानंद बांदोडकर आलो आहे म्हणून सांग. " ती आत गेली आणि परत येऊन म्हणाली, " आई अमळशाने येईल. तिने मला तुमच्याशी बोलत बसायला सांगितले आहे. " एवढे बोलून ती त्यांच्या समोरच्या खुर्चीत बसली. मुलगी चांगली चुणचुणित असल्याचे पाहून पाहुण्यांनी विचारले, ' नाव काय तुझे ? " तिने शांतपणाने उत्तर दिले, " माझे नाव शशिकला काकोडकर. " " किती खोटे बोलतेस ? मी शशिकलेला ओळखत नाही की काय ? " यावर ती मिस्किलपणाने म्हणाली, " मग आपण बांदोडकर असे सांगताना तुम्ही मात्र खरे बोललात ! हो ना ? मी त्यांच्या फ्युनरलला गेले होते बरं ! " तिच्या या उत्तराने माझा तो स्नेही चाटच पडला.

मनीषा नावाची माझी एक नात आहे. तिचे कोकणीचे भाषाज्ञान आश्चर्यकारक आहे. शब्दाचा चुकीचा वापर केला किंवा त्याऐवजी परभाषेतला शब्द वापरला की, लगेच ती बोलणाऱ्याची चूक त्याच्या पदरात टाकते. एकदा तिची आजी तिला म्हणाली, " हा चहाचा कप कमलाक ठेवला असे तिला सांग. " यावर तिने विचारले, " कमलाक का, कमलाक गे ? " कारण आपल्याला सांभाळायला ठेवलेल्या कमल या मुलीने चहा घेतल्याचे तिला माहीत होते. अजून चहा घेतला नव्हता तो ' कमला ' मोलकरणीने. या वरच्या उच्चाराच्या यथोचित आघाताने हा फरक तिने किती छान दाखवून दिला होता. बुको ही तिचीच छोटी बहीण. एकदा मी नेलेले सफरचंद तिच्या आईने कापले आणि दोघींनाही त्याची एकेक शीर दिली. एक खाऊन संपल्यावर बुको आईकडे दुसरी मागायला आली. अर्धे कापलेल्या सफरचंदाशीच सुरी होती. त्या सुरीनेच तिने ते कापले होते. बुकोने तिला विचारले, " ही सुरी याच सफरचंदाच्या उष्ट्याची ना ? " मुलांचा शब्दसंग्रह अपुरा असला तरी, आपला आशय ती अशी अर्थालंकाराने सांगतात.

एकदा एका स्नेह्याबरोबर मी त्याच्या मित्राकडे गेलो होतो. त्यांचा आठेक वर्षांचा मुलगा उगीच दिवाणखान्यात रेंगाळत होता. आमच्या गप्पा चालल्या होत्या. इतक्यात एक उमदा तरुण दिवाणखान्यातून आतल्या खोलीत गेला. त्याचा पोषाख, ऐट, केसांची स्टाइल...सारे काही अस्सल अमेरिकन होते. ते सारे त्या मुलाच्या डोळ्यात चांगलेच भरले. त्याने आपल्या बापाला विचारले, " हे असले लांब केस मी ठेवू का ? " त्यावर त्याच्या पित्याने म्हटले, " आधी त्याच्यासारखा बी. ए. हो आणि मग ठेव तसले केस. " यावर तो मुलगा म्हणाला " खुळेच आहात ! " " खुळा कशावरून ? " लगेच त्याने उत्तर दिले, " मी बी. ए. होईपर्यंत केसांची ही स्टायल रहाणार आहे होय ? " त्याच्या या प्रश्नाने आम्ही तिघेही जागच्या जागी स्तंभित झालो.

शानीचा भाऊ महेश, परवाच एक कागाळी घेऊन वडिलांकडे आला. तेव्हा ते त्याला म्हणाले, " हे बघ, आपल्या सवंगड्याशी एकदम एकेरीवर येऊ नये. गोडी-गुलाबीने घ्यावे. गांधी आपल्याला काय सांगत आले ? "

महेश म्हणाला, " तो आनी एक गांधी..." त्याला पुढे म्हणायचे होते... " मुलखा वेगळेच सांगतात ! " त्याच्या उपहासगर्भ स्वरावरून ते स्पष्ट होते. पित्याने त्याला दटावणीच्या स्वरात विचारले, " तो एक गांधी ? " महेशने लगेच नरम स्वरात विचारले, " गांधी एकच न्हाय तर ! " एकाएकी स्वर पालटून, शब्दांचे अर्थ त्याने केवढ्या हिकमतीने पालटले हे लक्षात येताच त्याच्या वडिलांना खुदकन हसू फुटले. आणि त्यांचा राग कुठल्या कुठे वितळून गेला.

परवाच मी माझ्या मुलीकडे पणजीला गेलो होतो. तिच्या दोन्ही मुलांना पाडगावकरांच्या बालगीतांची आणि वात्रटिकांची विलक्षण ओढ. माझ्याबरोबर पाडगांवकर आलेले पाहून मुलीने तसल्या कविता म्हणण्याचा त्यांना आग्रह केला.

त्यातले एक गाणे होते, ' लाडी गो लाडी, गोड माझी दाढी.' ते ऐकून झाल्यावर संदीप म्हणाला, ' लाडी गो लाडी, सोड तुझी साडी ' आणि आम्ही सर्व हसत सुटलो. त्यांनी वात्रटिका म्हटली, ' एक होती गाय, तिचा आपल्याच शेणात पडला पाय. '

ती ऐकल्यावर समीर म्हणाला,

" एक होता बैल

त्याने चड्डी केली सैल "

पुन्हा हशा पिकला.

अशी ही मुले आणि असे हे त्यांचे जग ! त्यात रमावे तितके थोडेच !

*

गांधीजी म्हणत, पावला पुरती वाट दिसली तरी, ती मला पुरेशी आहे. त्यांचे हे लहानसे वाक्य दिसायला तसे अगदी साधे आहे. तरी त्यात जीवनाचा फार मोठा गर्भितार्थ आहे. पावलापुरता प्रकाश प्रत्येकाच्या डोळ्यात असतो. तेवढ्या भांडवलावर माणूस निष्ठेने चालत राहिला तर, तो आयुष्यात केवढाही पल्ला गाठू शकतो. पण तसे करण्याऐवजी, दूरवरची वाट दिसेपर्यंत मी पुढचे पाऊल टाकणार नाही असे तो म्हणाला तर त्याचा प्रवासच खुंटेल.

रानातून जात असताना कधी कधी वाट सरण्याआधीच दिवस पडतो. काळोख वाढू लागतो. डोळ्यांपुढचे दिसेनासे होते. पण धीर न गमावता आपण डोळे ताणीत राहिलो तर, पावलापुरते आपल्याला दिसत जाते. आमचा गोवामुक्तीचा संग्राम चालू असताना रानातच रात्र व्हावी आणि वर्षानुवर्षे ती संपता संपू नये अशी परिस्थिती आली. तव्हा [illegible] होऊ पाहणाऱ्या माझ्यातल्या माणसाला माझ्यातला कवी म्हणाला होता, ' रात्र ही सरेल कधी खंत नको प्राणा. '

'पावला-नखांगणीक नेत्र' चालताना हे आश्वासन घेत मी अंधारात चालत राहिलो.

कवी पुढे सांगत होता--

' कधितरी ही सरुनि रात्र खचित उजाडेल.
स्वर्णजली जग युग हे उजळुनी निवेल.
विरळा परि कोणि धन्य बघुनि उदय-वेणा. '

आणि शेवटी एका थोर सत्याचा इशारा देत होता—

' सोहळा असा मिळो, मिळो न वा कधीही.
चालण्यातला प्रकाश पाहण्यात नाही.
तिमिरातुन ज्योतिकडे हाच तुझा बाणा. '

---

**पावलापुरता प्रकाश**

---

या वाण्याचे भान ठेवून माणूस जेव्हा चालत रहातो, तेव्हा याच्या डोळ्यातला प्रकाश वाढत जातो, त्याच्या पावलांची नखेच डोळे होऊन वागू लागतात. हा अनुभव कुणाला नाही ? चालता चालता डोळ्यापासून नखापर्यंत आपल्यातून जो प्रकाश ओसंडत असतो तो कुठला ? याचे उत्तर सोहिरोबांनी फार सुंदर दिले आहे. आपल्या एका पदात ते म्हणतात--

दोरिच्या सापा भिउनि भवा
भेट नाही जिवा शिवा
अंतरिचा ज्ञान दिवा ।
मालवू नको रे ।

आपल्या अंतर्यामी ज्ञानाचा जो अखंड दीप आहे त्याचाच हा उजेड. जी[illegible] हा नंदादीप निरंतर जागता ठेवायचा असतो. त्याच्या वातीवरची [illegible] जागरूकतेने वेळच्या वेळी झाडायची असते. आणि श्रद्धेचे तेल सातत्याने द्यायचे असते. आणि एवढे काम आपण निष्ठेने आणि ध्यान करीत राहिलो तर, त्याच्या प्रकाशात मग हा संसार हा केवळ दोरीचा साप आहे, खरा साप नव्हे हे आपल्याला लगोलग उमजते. आणि शिवाला पाठमोरा असलेला जीव चटकन त्याला सामोरा होतो. आणि त्याच्या उराउरी भेटीने कृतार्थ होतो. हा या कडव्यातला सोहिरोबांचा अभिप्राय आहे.

आपण गांधी, सोहिरोबा नसू. पण ज्या अंतःप्रकाशात ते आपली वाट चोखाळीत गेले, तोच अंतःप्रकाश सर्वांच्या ठिकाणी अंतर्हित आहे. हे एक फार मोठे आश्वासन ते आपल्याला देऊन राहिले आहेत. सोहिरोबांच्या साधनेचा आलेख आपल्या जवळ नाही. पण गांधीजींच्या आत्मवृत्तातून आणि त्यांच्याविषयीच्या अनेक आठवणींतून यांच्या साधनेचा मागोवा आपल्याला उपलब्ध आहे. त्याची कास धरून, आपल्याला आपली वाट चालणे सहज शक्य आहे. जो आत्मस्वरूप ज्ञानाचा उजेड आपल्या ठिकाणी आहे. त्याच्या बळावर घातलेला, प्रत्येक पावलासरशी सत्याची, सुंदराची, मांगल्याची आणि प्रीतीची जी जी प्रचीती आपल्याला येईल, तिच्या प्रकाशात आपल्याला झेपेल तितके चिंतन आपण करीत राहिलो तर, आपण आपल्याला उलगडत जाऊ.

स्वतःच्या अशा उलगड्यात ब्रह्मांडाचा उलगडाही होत जातो असेच आपले जाणते सांगत आले आहेत. आजच्या जमान्यात आपण आपल्या भौतिक गरजा सारख्या वाढवीत आहोत. त्या पुरवण्यासाठी कष्ट उपसतो आहोत, मागे वाघ लागल्यासारखे धावत आहोत आणि थकून झोपेच्या आहारी जात आहोत. पण सर्व

गरजांत आत्मदर्शनाची गरज ही अधिक मौलिक आणि अधिक महत्त्वाची गरज आहे याचे मान ठेवले नाही तर, भरल्या पोटीही आपण उपाशीच राहू हे सत्य विसरून चालणार नाही.

म्हणून पावलापुरत्या प्रकाशात का होईना, चालण्याची आणि त्यात रमण्याची सवय आपल्याला ठेवायची आहे. आणि 'अभिप्रावोचि अभिप्रायाते विये' या अनुभवाचा आल्हाद घ्यायचा आहे.

*

या लेखाचा हा मथळा पाहूनच तुम्ही धसका घेतला असेल. मीही एकदा तो घेतला होता. पण त्याचा खरा अर्थ इतका साधा सोपा आहे की, आपल्या खेड्यांतील अशिक्षित बायका देखील या शास्त्रात भलत्याच पारंगत आहेत हे सहज तुमच्या लक्षात येईल. हा शब्द पहिल्यांदाच माझ्या कानावर आला, तेव्हा मी चांगलाच गडबडलो होतो.

माझे एक स्नेही प्राचार्य होते. उत्तम खेळाडू होते आणि नवनव्या संस्था आणि समित्या उभ्या करण्यात त्यांना भलताच रस होता. प्रत्येक भेटीत ते कसला तरी नवा संकल्प घेऊन माझ्याकडे येत आणि त्यात माझे सहकार्य मागत. एकदा ते असेच माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, "आम्ही फ्यूचरॉलॉजीची तरतूद आतापासूनच केली जावी म्हणून एक समिती स्थापन करीत आहोत आणि तिच्यात तुमचा समावेश करू इच्छित आहोत. त्याबाबत तुमची संमती हवी आहे." त्यावर मी म्हणालो, "आजवर अनेक लॉजीजसंबंधाने मी वाचले–ऐकले आहे. पण ही लॉजी काही आगळीच दिसते. मला तर तिचा मुळीच पत्ता नाही. तेव्हा तिच्या बाबतीत मी काय करू शकणार?"

माझ्या या शंकेच्या निरसनार्थ ते म्हणाले, "ती समजायला तशी फार सोपी आहे. आपले सर्व धंदे-उद्योग पेट्रोलवर आणि निरनिराळ्या खनिजांवर चालतात. त्या सर्वांचा जगातला साठा केव्हातरी संपणार आहे. जेव्हा ही परिस्थिती उद्भवेल, तेव्हा तिला तोंड देता यावे म्हणून आतापासूनच आपण तयारीला लागायला नको का? ही तयारी किंवा तरतूद करायची असेल तर, एकाच उपलब्ध वस्तूचे विविध उपयोग करण्याचे कौशल्य आपण अंगवळणी पाडून घ्यायला शिकले पाहिजे."

"म्हणजे तुमच्या या फ्यूचरॉलॉजीचा अर्थ भविष्य नियोजनाचे शास्त्र, थोड्याच जिनसांपासून अनेक गरजा भागवण्याची विद्या. असाच ना?" मी विचारले.

"अगदी बरोबर." प्राचार्यसाहेब म्हणाले.

---

## भविष्यनियोजन शास्त्र

---

" तर मग तुमच्या या संकल्पित समितीवर माझ्याऐवजी तुम्ही माझ्या पत्नीला का घेत नाही ? या विद्येत ती विलक्षण पारंगत आहे. "

माझ्या या म्हणण्यावर ते उद्गारले, " कशी काय ? "

" सैंपाकघरात उलथणे असते त्याचा उपयोग भाकरी, पोळी वा दोसा उलथण्यासाठी असतो असा आपला माझा समज, पण माझी पत्नी त्याचा तेवढाच उपयोग करून थांबत नाही. त्याच्या दांड्याने ती कोणत्याही डब्याचे झाकण सहज उघडते. कपात घातलेली साखर चमच्यापेक्षा सुद्धा अधिक लवकर खिरवते. अंगणात रोपे लावताना जेवढ्यास तेवढी उकरते आणि दुसऱ्या बाजूच्या धारेने सावणभाराचे हव्या त्या मापाचे तुकडे नेमकेपणाने कापून घेते. कोणत्याही वस्तूचे असे नाना उपयोग करून घेण्याचे तिचे कौशल्य असाधारण आहे. त्यामुळे समितीवर येण्याचा तिचा अधिकार निश्चितच माझ्यापेक्षा अधिक आहे. " माझ्या या उत्तराने प्राचार्यसाहेब निरुत्तर झाले. त्यांनी कौशल्याने मुख्य विषय बदलला.

पेट्रोलचा आणि अन्य खनिजांचा साठा जर मर्यादित आहे, तर तो जपून वापरावा हा सरळ साधा मार्ग. उद्योगधंदे केवळ त्यांच्यावर अवलंबून ठेवू नयेत हा शहाणपणा. जी द्रव्ये कधीच संपू शकत नाहीत, त्यांच्यावर मुख्य भिस्त ठेवायची. आपले वाडवडील हे करीत आले. पूर्वी रांधपाची भांडी मातीची असत. फुटली तर दुसरी सहज बनवता येत; कारण मातीचा कधीच तोटा नसतो. डाव असत ते करटीला बांबूचा दांडा लावून केलेले असत. ताटांचे काम पत्रावळींनी आणि केळींच्या पानांनी भागत असे. फणसाच्या पानांच्या खोलग्या चमच्यापेक्षाही अधिक सोयीस्कर असत. दगड पोखरून केलेल्या दगड्यातली आमटी केवढी रुचकर व्हायची. अशा दगडांची ताटे मी कधी पाहिली नव्हती. पण गांधीजींना अशा ताटातून आणि दगडी चमच्यांनी जेवताना मी पाहिले आहे. झोपायला लव्याच्या मानच्या किंवा गवती चटया असत. त्यांचा स्पर्श किती मुलायम असे !

सापाच्या कातीइतक्या तलम चटया मी मदुरेला पाहिल्या आहेत. जुन्या धोतरलुगड्यांपासून सुंदर गोधड्या तयार केल्या जात. त्यांच्यावरची किरा-मोरांची शिवण किती रेखीव असे ! त्यांचा स्पर्श जितका सुखद, तितकाच उबदारही असायचा. कपडे शिवून झाल्यावर कापडाचे जे कपटे रहात त्याचे गब्रे किंवा कपियाळी शिवली जात. अंगणात भाजीपाल्याचा वाफा असे, तसाच औषधी वनस्पतींचा एखादा वाफा हटकून असायचा. त्यांचा वापर वडिलधाऱ्या स्त्रियांना माहीत असे. आजीच्या सांगशीत जुनी पाळेमुळे कितीतरी असत. आणि ती उगाळून घेतल्याने लहानसहान आजार चटकन बरे होत. आजच्यासारखी ऊठसूट डॉक्टरकडे खेटे घालण्याची आणि पदरमोड करण्याची गरज नव्हती. घर लहान असले तरी, पाहुण्यारावळ्यांना

पथारी पसरायला मुबलक जागा असे. आज ती फर्निचरने इतकी अडवली आहे की, पाहुण्यांची अडचण होऊ लागली आहे. रहाणी साधी असल्यामुळे, पाहुणा जड वाटत नसे. आपल्याबरोबर तो दोन घास संतोषाने खाईल असा विश्वास होता. पाश्चात्यांच्या घटोत्कचविद्येला आपण भाळलो आणि त्याचमुळे उत्पन्न वाढले असताही आपण पेचात आलो आहोत. गरजा कमी करून सुखाने कसे वागावे हे चालत आलेले वळण सोडून, गरजा वाढवण्याचे नवे तत्त्वज्ञान आम्ही पत्करले. या तत्त्वज्ञानापायी पाश्चात्यांची सारी सभ्यता आज धोक्यात आली आहे. उच्च राहणीच्य नादी लागून गरजा वाढवीत रहायाचे, त्यांना हवा असलेला कच्चा माल हस्तगत करण्यासाठी तो उत्पन्न करणारे देश अंकित करायचे, त्यासाठी शस्त्रबळ आणि सैन्यबळ वाढवायचे आणि त्यातून युद्ध आणि विद्ध्वंस उत्पन्न करायचे. अशी ही अनर्थ परंपरा आहे.

युद्धे आणि तज्जन्य विध्द्वंस ही टाळायची असतील तर, प्रत्येक मनुष्यमात्राला आपल्या गरजा कमी करण्याचे महत्त्व पटायला हवे. भूमीतून स्वभावतः जे प्रसवते आणि आपण श्रम करीत राहिलो तर ज्या निर्मितीला कधी खंड पडू शकत नाही, त्याच्यावरच आपल्या मुख्य गरजांची मदार ठेवायला हवी. उत्पादनवस्तूंचा कच्चा माल देखील, खरे कधी संपणार नाही असाच असला पाहिजे आणि जो केव्हा तरी संपणार आहे तो सामुदायिक कार्यासाठीच आणि तोही हात राखून वापरला पाहिजे. समाजाला संपन्नता लाभावी, पण व्यक्तीने साधेपणाने राहावे. व्यक्ती अशी साध्या रहाणीने राहाते तेव्हाच, समाज आणि देश संपन्न होत असतात. हुकूमशाही सक्तीने व्यक्तीला ती पत्करायला लावते. लोकशाहीत नागरिकांच्या संस्कारितेमुळे हे व्हायला पाहिजे.

लहानपणी भजनात–' पोटापुरते देई । मागणे लई नाही । लई नाही ' हा अभंग मी पुष्कळ ऐकला होता आणि आळवलाही होता. त्याचे मर्म तेव्हा लक्षात आले नव्हते. गांधीजींनी त्या अभंगाचा अर्थ राष्ट्रीय पातळीवर लावून दाखवला. तो आता जागतिक पातळीवर लावून दाखवण्याची गरज उत्पन्न झाली आहे.

भविष्याचे नियोजन करायचे असेल तर, आपण वर्तमानाचे नियोजन कसोशीने केले पाहिजे आणि कटाक्षाने ते पार पाडले पाहिजे. ते नियोजन सर्व प्रकारचे उत्पादन सतत वाढवण्यात आणि त्यांतले गरजेपुरतेच आपण घेण्यात आहे.

म्हणूनच जी कोंड्याचा मांडा करते, मग ती माझी पत्नी असो किंवा तुमच्या कुणाची, तीच जगाच्या भविष्याची संरक्षक देवता आहे.

*

बघणे आणि पाहणे हे शब्द कोशात समानार्थक असले तरी, या दोन क्रियांत प्रत्यक्षात जमीन-अस्मानाइतके महदंतर आहे. डोळे असलेले आपण सगळेच भोवतालचे जग बघत असतो. पण तेही आपण नीट बघत नसतो. हल्लीच्या हेलन केलर या ख्यातनाम अंध समाजसेविकेचा एक सुंदर ललित निबंध माझ्या वाचनात आला. आपणाला तीन दिवस दृष्टिलाभ झाला तर, आपण काय पाहू याचे सुरेख वर्णन तिने केले आहे. कथनाच्या ओघात ती आपला एक अनुभव सांगते. तो मोठा लक्षणीय आहे. ती आपल्या पाच स्नेह्यांना विचारते, 'तुमच्या पत्नीच्या डोळ्यांच्या बाहुल्यांचा रंग कोणता आहे ?' प्रश्न किती साधा, पण त्यातल्या कुणालाच त्याचे नीट उत्तर देता येत नाही. यावरून आपल्यातील भल्याभल्यांचे बघणे देखील किती अपुरे असते हे सहज लक्षात यावे.

डोळेच नव्हेत तर, आपली सारीच ज्ञानेंद्रिये आपण बोथट करून टाकलेली असतात. सैनिकाने जशी आपली शस्त्रे तेज परजून ठेवायची असतात, तशीच आपण आपली ज्ञानेंद्रिये धारदार ठेवायची असतात याचे भानच आपण हरवून बसलो आहोत.

आपले बघणे हे जिथे अर्धवट, तिथे पाहणे आपल्याला कसे जमायचे ? पाहणे याचा खरा अर्थ आहे उजाडणे, प्रकाशणे. आपण बघत असलेल्या वस्तूंचे चिरस्वरूप एकाएकी आपल्यापुढे प्रगट होणे म्हणजे पाहणे. पाहण्याच्या क्रियेत हे असे दर्शन अभिप्रेत असते. असे ज्याला पहाता येते, त्यालाच आपल्याकडे द्रष्टा असे म्हटले जाते.

या द्रष्टेपणाचा आणि पुस्तकी पांडित्याचा अर्थाअर्थी काही संबंध नाही. कुरळची रचना करणारा तिरुवल्लर हा अनपढ कोष्टी होता. भक्तीची सूक्ते गाणारी जनी ही अशिक्षित दासी होती. आदिकवी वाल्मीकी हा वाटमारी करणारा एक कोळी होता. अभ्रांतमति व्यास हा धीवर कन्येचा कानीन मुलगा होता. अशी उदाहरणे असंख्य

---

**बघणे आणि पाहणे**

---

देता येतील. जन्मजात प्रतिभेने ज्यांना हे द्रष्टेपण लाभले, त्यांची दिगंतकीर्ती नावे आपल्याला ऐकून माहीत आहेत. पण जे प्रेमशक्तीच्या उत्कटतेमुळे प्रेममय बनले आहेत, वाऱ्यासारखे विमुक्त आहेत, पाण्यासारखे प्रवाही आहेत, आकाशासारखे निर्लेप आहेत, धरित्रीसारखे सोशीक आणि समंजस आहेत त्यांनाही हे द्रष्टेपण लाभलेले आपण पहातो. त्यांचे नाव झालेले असेलच असे नाही. आपल्या भाग्याने त्यांचा दर्शनलाभ आपल्याला होतो. आणि त्यामुळे लौकिकातून अंतर्यामीच्या अलौकिकात प्रवेश करणे आपल्याला सुलभ होते. कुणाला हे द्रष्टेपण प्रतिभेने लाभते. कुणाला प्रेमोत्कटतेने लाभते, तर कुणाला उत्कट प्रतीतीने लाभते असे मला आढळून आले आहे.

पुण्यात माझे वास्तव्य असताना, एका योगायोगाने मला या गोष्टीची प्रचीती आली. सूर्य माध्यान्ही आलेला होता. बाहेर वैशाखाचे पोळणारे ऊन रगरणत होते. टर्किश टॉवेल कमरेला गुंडाळून मी स्नानाला जाण्याच्या बेतात होतो. [illegible] पातळ बांध्याचा एक उंच म्हातारा आमच्या दाराशी आला [illegible] मला म्हणाला, " थोडं पाणी देता का हो ? " त्याच्या अंगातून [illegible]मस्तक घामाच्या धारा निथळत होत्या. त्यांना मी म्हणालो, " पाटील[illegible] या ना. आरामात बसा या खुर्चीवर. " सौभाग्यवतीला हाक मारून [illegible] साखर पाणी मागवले. हातपाय धुण्यासाठी तांब्याही दिला. हातपाय आणि तोंड धुऊन-पुसून घेतल्यावर म्हातारबुवा प्रसन्न झाले. साखरपाणी घेतल्यावर माझे आभार मानून ते माझा निरोप घेऊ लागले. तेव्हा मी त्यांना म्हणालो, " बाहेर ऊन कसे रगरणते आहे. जेवण तयार आहे. मी पाच मिनिटात माझी अंघोळ उरकतो. आपण जेवायला बसू. मग थोडा आराम करा आणि उन्हे उतरू लागली की जा. "

त्यावर ते म्हणाले, " कोर्टात कित्येक दिवस चाललेल्या माझ्या खटल्याचा निकाल आज माझ्या बाजूनं झाला आहे. घरात लहान-थोर अशी साठ माणसे आहेत. मी घरी पोचल्याशिवाय ती जेवणार नाहीत, तेव्हा मला गेलेच पाहिजे. " त्यांच्या या उत्तराने मी निरुत्तर झालो. मी आग्रह धरला नाही. पण या म्हातारबुवाच्या गृह-निष्ठेनं माझ्यावर चांगलाच प्रभाव टाकला होता. त्यांची पाठमोरी आकृती पहात मी दारात उभा होतो. फाटक ओलांडून ते रस्त्यात चार पावले चाललेही होते. पण त्यांच्या मनात काय आले कोण जाणे. ते परत फिरले आणि माझ्याजवळ येऊन मला म्हणाले, " बाजारात लाख रुपये मोजूनही जी वस्तू मिळू शकणार नाही ती मला तुम्हाला द्यायची आहे. तेवढ्याचसाठी मी असा परत फिरलो. हे रेशनचे दिवस. साखर दिसायला कठीण, तरी तुम्ही ओळखपाळख नसताना मला साखरपाणी दिलेत. मी अनुभवाने तुम्हाला सांगतो की, प्रत्येकाच्या अंतःकरणात ईश्वराने एक जोडकुपी ठेवलेली आहे. एकीतून स्रवते अमृत तर दुसरीतून झिरपते विष. जो

विष घेत रहातो, त्याच्या अमृताचेही विष बनते आणि जो अमृत घेत असतो, त्याच्यातल्या विषाचेही अमृत बनते. अशी या जोडकुपीची मेख आहे. तुम्ही जे अमृत वाटता आहात तसेच ते वाटीत रहा. देव तुमचे भले करील. ”

त्यांच्या या उद्‌गारांनी मी अवाक झालो आणि तेवढ्यात ते म्हातारबुवा दृष्टीआड झाले देखील. त्यांच्या या उद्‌गारांनी मला फार अंतर्मुख बनवले. त्यांचे नाव-गाव मी विचारले नव्हते. पण तो प्रचीतीने द्रष्टेपण मिळवलेला एक थोर पुरुष होता याविषयी मला रतिमात्र शंका नाही.

अशाच एका द्रष्ट्या खेडुतासंबंधीचे एक पुस्तक हल्लीच सहज माझ्या हाती आले. मेक्सिकोतल्या एका खेड्यातला हा एक अनपढ माणूस. हा एक वैदू आहे. आणि त्याला झाडपाल्याची पुष्कळशी गुणकारी औषधे व त्यांचे उपयोग चांगले ठाऊक असल्याचे वर्तमान एका सुविद्य अमेरिकनाला समजते. त्याच्याकडून ही माहिती मिळवावी म्हणून तो त्याची गाठ घेतो आणि चार वर्षे त्याचा शिष्य होऊन त्याच्याकडची वनस्प[illegible] तो मिळवीत रहातो. तो वस्तुतः आलेला असतो, त्याच्याकडची ही विद्या मिळवण्यासाठी. पण अल्पावधीतच त्याच्या लक्षात येते की, तो केवळ वैदू नाही, तर एक असाधारण द्रष्टा आहे. आपण मिळवायला आलो त्या विद्येपेक्षा त्याच्याकडचे हे द्रष्टेपण कितीतरी अधिक मोलाचे आहे. ते मिळविण्याची त्याला अपार उत्कंठा लागून रहाते. पण ते मिळवण्यासाठी त्याने लावून दिलेली शिस्त आपण पाळीत राहिलो आणि तो सांगत असलेले तत्त्वज्ञान अंगवळणी पाडून घेऊ लागलो, तर आपल्या अस्मितेचाच लोप होईल अशी त्याला भीती वाटते. आणि ती टिकावी म्हणून तो त्याला सोडून जातो.

पण गेल्यावर त्याला कशातच चैन वाटेनासे होते. निरुपाय होऊन परत तो त्या वैदूकडे येतो. जाताना त्याने त्याला रोकलेले नसते आणि आणि...आता परत आल्यावर त्याचे पूर्वीसारखेच मोकळ्या मनाने त्याने स्वागत केलेले असते. तो आपल्या परीने मखलाशी करीत असताना तो वैदू त्याला म्हणतो, “ तुमची अडचण ही आहे की, तुम्ही स्वतःला फार महत्त्वाचे समजता, त्यामुळे तुम्ही स्वाभाविकतेने वावरू शकत नाही. नेहमी अवघडलेले, स्वतःलाच भारभूत झालेले आणि आढ्यताखोर असता. हलके आणि प्रवाही असे तुम्हाला रहाताच येत नाही. स्वतःला जो विश्वाचा केंद्रबिंदू मानतो त्याच्या आत्मशक्तीचे नाजुक धागे आपल्यातच मिटून रहातात. त्यामुळे जे जग ते धागे मोकळे सोडल्याने त्यांच्या स्पर्शातून सहज उमगू शकते, त्याला तो पारखा होतो. ”

आपल्या गुरूचे हे म्हणणे त्याला पटलेले असते, तरीही त्याला आपल्या अस्मितेचा मोह सुटत नाही. पुढे जेव्हा उभयतांचा ऋणानुबंध गडद होत जातो, तेव्हा

त्याचा गुरु एकदा त्याला म्हणतो, "तुम्ही जोपर्यंत तुमच्या अहंतेला कवटाळून आहात, तोपर्यंत हवे असलेले द्रष्टेपण मिळवायला तुम्हाला सतत लढा द्यावा लागेल, क्षणोक्षणी मृत्यूशी सामना करावा लागेल. मला तसले काही करावे लागले नाही. एका साध्याच प्रसंगाने ते मला प्राप्त झाले." शिष्याच्या आग्रहामुळे तो प्रसंग सांगताना तो म्हणाला, "एकदा नेहमीप्रमाणे मी रानावनातून भटकत असताना एक सिहीण माझ्या मागे लागली. जिवाच्या आकांताने मी पळत राहिलो; पण ती माझा पिच्छा कसाच सोडीना. आता मरण काही चुकत नाही अशी खात्री होताच, जवळच दिसलेल्या भल्यामोठ्या खडकांच्या राशीवर मी चढलो आणि तिच्या शिखरावरून खालच्या झडप घालण्याच्या पवित्र्यात उभ्या असलेल्या सिंहिणीकडे पाहू लागलो. मृत्यू प्रत्यक्ष समोर पाहिल्यामुळे असेल, माझ्या मनात अपार करुणा जागी झाली. तिने भरलेल्या दृष्टीने मी त्या सिहिणीला कुरवाळीत राहिलो. आणि काय चमत्कार सांगावा! जोजवल्याप्रमाणे ती हळूहळू झोपी गेली! आणि समाधान पावून मी तेथून घरी परतलो. या प्रसंगाने माझी मृत्यूची भीती मावळली ती कायमची, मी विश्वमय झालो असे जे तेव्हा वाटले, तेव्हापासून तो भावच आज माझा स्थायीभाव बनला आहे."

हा प्रसंग वाचताना मला माझ्याच एका कवितेचे ध्रुवपद आठवले--

जीवन त्यांना कळले हो

मीपण ज्यांचे पक्व फळापरि

सहजपणाने गळले हो

मला वाटते, द्रष्टेपण अनेक मार्गांनी येत असेल. पण त्याक्षणी पहाणाऱ्याचे मीपण गळलेले असावे लागते. दर्शनाचा उगम आहे तो अहंपणाच्या विलोपनात.

*

यंदाच्या या पुण्याच्या मुक्कामात कानावर आलेल्या एका बातमीने मी फार अंतर्मुख झालो. मंडलीक नावाच्या एका सुविद्य आणि वयोवृद्ध गृहस्थांना वाटले की, आपण आता खूप वृद्ध झालो आहो, थकलो आहो, जीवनात आपल्याला रस उरलेला नाही. आपण केवळ अन्नाला काळ आणि भूमीला भार झालो आहोत. सेवा देण्याचे त्राण अंगात राहिलेले नाही आणि ती घेतल्याशिवाय जगणे यापुढे आपल्याला अशक्य आहे. अशा परिस्थितीत आपले जीवन आपल्याच हाताने संपवणे सर्वतोपरी इष्ट आणि धर्म्य आहे. पण त्यांची अडचण ही होती की, तसे ते संपवणे हा प्रचलित कायद्यानुसार गुन्हा ठरतो. सुबुद्ध नागरिक या नात्याने त्यांना तो करायचा नव्हता, म्हणून राष्ट्राच्या धुरिणांना आणि शास्त्र्यांना ते लिहीत राहिले की, आपल्यासारख्या परिस्थितीतल्या इच्छुकांना आपले जीवन संपविण्याचा अधिकार आपल्या राष्ट्रीय संविधानाने मानवी हक्क म्हणून मान्य करावा.

पण त्यांच्या या तळमळीच्या विनंतीची दखल राष्ट्राच्या श्रेष्ठींनी घेतली नाही. ते कंटाळून गेले आणि शेवटी एक दिवस कसल्यातरी प्राणघातक गोळ्या घेऊन त्यांनी आपली इहलोकीची यात्रा संपवली. या वार्तेने पुण्यातला विचारवंत वर्ग निश्चितच अस्वस्थ झाला असेल. पण मंडलिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर त्यांच्याकडून एकादी जाहीर चर्चा झाल्याचे काही माझ्या ऐकिवात नाही. प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेता ती व्हायला हवी होती.

हिंदू धर्मशास्त्रात माणसाला आपला देहान्त घडवून आणण्याचा अधिकार आहे की नाही आणि असल्यास तो कोणत्या परिस्थितीत मंजूर आहे हे मला माहीत नाही. पण हिंदू लोकमानसांत या मानवी हक्काला मान्यता असल्याची प्रत्यंतरे आपल्या पारंपरिक साहित्यात विपुल सापडतात. आपल्याकडे स्त्रीचा सती जाण्याचा हक्क सर्वमान्य होता. एवढेच नव्हे तर, पतीबरोबर सहगमन केल्यानंतर ती पूजनीय ठरे. तिची देवळेसुद्धा होत. क्षत्रियाची कर्तव्ये आपल्याकडून नीट पार पडू शकत

---

## देहान्ताचा हक्क

---

नाहीत असे दिसून आल्यानंतर, परीक्षितीकडे राज्य सोपवून पांडवांनी द्रौपदीसह गिर्यारोहण केले ते देहविसर्जन करण्यासाठीच. धृतराष्ट्र, गांधारी आणि कुंती यांनी पेटलेल्या अरण्यात स्वेच्छेने प्रवेश केलेला आहे. शरपंजरी पडलेल्या भीष्म पितामहाने तर, इष्ट मुहूर्त पाहून इच्छामरण पत्करलेले आहे रामलक्ष्मणादिकांनी आपले अवतारकार्य संपल्याचे उमगताच शरयू नदीत देहविसर्जन केलेले आहे. श्रीकृष्णाने प्रत्यक्ष देहविसर्जन केलेले नाही, पण मृत्यूचे पूर्वसूचन त्या योगेश्वराला लाभलेले होते. आणि त्याची वाट पहात तो अरण्यात एका वृक्षाखाली बसलेला होता. तेथे मर्मस्थान असलेल्या त्यांच्या अंगठ्याला बाण लागून त्यांचे प्राणोत्क्रमण झाले हे आपल्याला माहीत आहे.

साधुसंतांच्या निर्याणाच्या ज्या कथा आपल्याला उपलब्ध आहेत, त्यांत त्यांनी स्वेच्छया आपले जीवन संपवल्याच्या कथा थोडयोडक्या नाहीत. कुणी समाधी लावून आपल्या ब्रह्मरंध्रावाटे आपले अंतिम प्रयाण केले आहे, तर कुणी योगशक्तीच्या बळावर आपला देह पंचतत्वांत विलीन करून घेतला आहे. कुणी प्रायोपवेशन करून देहत्याग केला आहे, तर कुणी जलसमाधी किंवा जिवंत स्थलसमाधी घेतली आहे. ज्ञानदेवांनी घेतलेली संजीवन समाधी हा अशा समाधीतला उच्चांक समजला जातो. अशी समाधी घेतल्याबद्दल आपल्या समाजात त्यांना कुणी दोष लावल्याचे आढळत नाही. उलट त्याबद्दल आपल्या समाजात ते पूजनीयच ठरलेले दिसतात. स्वेच्छेने जीवन संपवण्याचा हा अधिकार जैन आणि बौद्ध यांनाही मान्य आणि आदरणीय वाटत होता असाच आजवरच्या भारतीय इतिहासाचा निर्वाळा आहे.

जो आत्महत्या करतो तो अंधतमात जातो, असे विधान कुठल्या तरी उपनिषदात वाचल्याचे मला स्मरते. मनुष्यजन्म हा अत्यंत दुर्लभ आहे. तो सार्थकी लावल्याशिवाय त्याचा अंत घडवून आणणे हे एक महापातक आहे. तो देणाऱ्या ईश्वराशी द्रोह आहे हा जो या विधानाचा मथितार्थ, तो कुणालाही पटण्यासारखाच आहे. पण याचि देही याचि डोळा जीवन सार्थकी लावून जे कृतार्थ झाले, तृप्त झाले, जगताला आशीर्वादस्वरूप झाले, त्यांना या जगाचा निरोप घेण्याचा अधिकार आहे हेही पटण्यासारखे आहे. भारतीय लोकमानसाची त्याला मंजुरी आहे.

ती जशी त्यांना आहे, तशीच ती रोगजर्जर, जराजर्जर आणि विकलांगांनाही असायला हवी. जिजीविषा जीवमात्रातली आणि विशेषतः मनुष्यमात्रातली एक बलवत्तर प्रेरणा आहे. त्याचमुळे प्रत्येक माणूस दुःख, दैन्य, दारिद्र्य, व्याधी, जरा आणि मनोभंग ह्या सर्वांना तोंड देऊन जीवनाला घट्ट चिकटून असतो. या दुर्दम्य सहजप्रेरणेवर तिलांजली द्यायला एकादा मनुष्य जेव्हा तयार होतो, तेव्हा त्याला जगणे सर्वथैव अशक्य झालेले आहे हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. तो जीवनाला

असा पाटमोरा व्हायला त्याचे वैयक्तिक दुःख पराकोटीला गेले असेल किंवा त्याचे सामाजिक दुःख तितकेच उत्कट असेल. मला या वेळी झ्वायग पतिपत्नींची आत्महत्या आठवते. 'जुनी जीवनमूल्ये उद्ध्वस्त होत आहेत. ती पुन्हा उभी करण्याइतकी आपल्यात उभारी नाही. आणि हे मूल्यपतन सोसण्याचे आपल्यात त्राण नाही,' असे मरण्यापूर्वी त्यांनी लिहून ठेवले होते. आपल्याकडच्या सानेगुरुजींची आत्महत्याही याच सदरात मोडते. आचार्य धर्मानंद कोसंबींना आपली जिजीविषाच संपली आहे आणि पाणी देखील आपल्याला पचत नाही असे आढळून आले तेव्हा, धीरोदात्त-निरशन करीत त्यांनी मृत्यूचे स्वागत केले.

कारणे कोणतीही असोत, इहलोकीचे जीवन असह्य होऊन त्याचा निरोप घेण्याची धारणा पक्की झाल्यावर त्याच्यावर जगण्याची सक्ती करणे ही मला तरी निर्दयताच वाटते. भारतीय लोकमानसाचा कलही असाच दिसतो हे लक्षात घेता, आत्महत्येला गुन्हा मानणारा कायदा आपल्या देशातून त्वरित रद्द होणे हेच मला उचित वाटते.

जन्माला येणे आपल्या हातचे नाही, पण ज्याला तो दुःसह झाला असेल त्याला तो संपवण्याचा अधिकार तरी असलाच पाहिजे.

*

एका दैनिकातली पहिल्याच पानावरची बातमी वाचली आणि एकदम थरकून गेलो. अमेरिकेतली लोकस्थिती पाहून कारुण्यमाऊली मदर तेरेझांनी उद्गार काढले होते :

‘ येथे अनेक लोक असे आहेत की, जे कुणालाच नको आहेत. कुणालाच त्यांची काळजी नसते, कुणाचेकडून त्यांना मायाममता मिळत नाही. त्यांच्या मनाची ही उपासमार भारतातल्या अन्नाच्या उपासमारीपेक्षा कितीतरी अधिक भयानक आहे. मदर तेरेझांनी आपल्या या उद्गारांनी जगाच्या दुःखावर नेमके बोट ठेवले आहे. आजच्या जगाने विज्ञानात थोड्याच वर्षांत अफाट प्रगती केली आहे. आपण चंद्रावर जाऊन आलो आहोत, अंतराळात भ्रमण करणारे उपग्रह आपण अवकाशात पाठवू शकतो अशा बढाया आपण हमेशा मारत असतो. पण अन्नाची भूक आणि मनाची भूक ह्या ज्या आपल्या पहिल्या दोन स्वाभाविक भुका आहेत, त्या मात्र आपण अजून मिटवू शकलेलो नाही. अर्ध्याहून अधिक जग आज अन्नाच्या उपासमारीने गांजले आहे. आणि त्याच्या उरलेल्या भागात सर्व लौकिक समृद्धी असूनही ते स्नेहाच्या उपासमारीने हवालदिल झाले आहेत.

मदर तेरेझांनी ज्या प्रखर सत्याचा उच्चार केला आहे ते तसे काही नवीन नाही. डोळे, कान आणि मन मोकळे ठेवून, आपल्यातील ज्यांनी ज्यांनी थोडे फार जग पाहिले आहे त्यांना त्यांना हे दाहक सत्य जाणवल्याशिवाय राहिलेले नाही.

मी फारसे जग पाहिलेले नसले तरी, उभा भारतवर्ष मी हिंडलो आहे. सिलोनचा फेरफटका मी केलेला आहे. दोनदा झालेल्या अमेरिकेच्या वारीत एकंदर नऊ महिने मी तेथे आणि थोडा कॅनडात राहिलो आहे. भारतात आणि सिलोनमध्ये मी जशी अन्नाची हृदयविदारक उपासमार पाहिली, त्याचप्रमाणे कॅनडा आणि अमेरिका या समृद्ध देशांत भावनांची आणि स्नेहसौहार्दाची उपासमार पहिली.

---

## दोन भुका

अमेरिकेच्या माझ्या पहिल्या दौऱ्यात, मी माझ्या भाच्याला भेटण्यासाठी टायलर या विद्यापीठीय शहरी गेलो होतो. तो तिथे प्राध्यापक होता. त्याच्यामुळे तेथील विद्यापीठाच्या मुख्य डीनशी माझा परिचय झाला. अल्पावधीतच परिचयाचे स्नेहात रूपांतर झाले. त्यांच्या आग्रहामुळे मी आठवडाभर तिकडे थांबलो. निघण्याच्या आधल्या दिवशी विद्यापीठातर्फे त्यांनी माझ्या सत्कार सोहळ्याचे आयोजन केले. तेथे दिलखुलास अशी प्रश्नोत्तरी झाली. निमंत्रितांत प्राध्यापकवर्ग होता, तसेच साहित्यिक आणि कलाकारही होते. त्यांच्यातला एक कथालेखक भारतीय जीवनाशी चांगलाच परिचित होता. माझी उत्तरे त्याला आवडली होती. प्रश्नोत्तरीनंतर मद्यास्वाद घेत आम्ही बसलो असताना तो मला म्हणाला, " आमच्या विद्यापीठात काव्याचे प्राध्यापक म्हणून वर्ष दोन वर्षे तुम्ही राहू शकलात तर, आम्हांला फार आनंद वाटेल." त्यावर मी त्यांना म्हणालो, " विद्यापीठाचा प्राध्यापक होण्यासाठी ज्या पदव्या लागतात त्या माझ्याकडे नाहीत आणि इंग्रजी ही काही माझी भाषा नाही."

मुख्य डीन विल् टर्नी आमच्या शेजारीच बसले होते. ते म्हणाले, " तुमच्या प्रतिभेत सर्व पदव्या येऊन जातील आणि इंग्रजीबद्दल म्हणाल तर, तुमचे इंग्रजी इथल्या कुणाही सुविद्य गृहस्थाच्या इतकेच चांगले आहे." मी पुढे केलेल्या अडचणींचा असा अनपेक्षितपणे परिहार झाल्यामुळे, आलेली नोकरी नाकारायला मला कारणच उरले नाही. अमेरिकेतले निःस्नेहजीवन मला फार लवकर जाणवले होते आणि केव्हा एकदा भारताला परततो असे मला झाले होते. तेव्हा मी त्यांना म्हणालो, " हा मोठा वैभवशाली देश आहे. येथे सर्व सुखसोयी सहज उपलब्ध आहेत. पण इथले दीर्घ वास्तव्य मला मानवणार नाही." यावर चकित होऊन त्यांनी विचारले, " का ? "

मी म्हणालो, " गरिबीची म्हणून जशी दुःखे असतात, तशीच श्रीमंतीचीही असतात. गरिबीच्या दुःखांवर स्वकीयांच्या स्नेहाचा उतारा असतो. त्यामुळे ती सोसता येतात. श्रीमंतीत नेमका तोच आपण गमावून बसतो. आणि एकाकीपणाने ग्रासल्यामुळे सभोवताली गर्दी करणारी सर्व सुखे आपली चव हरवून बसतात." यावर त्या दोघांपैकी कुणीच बोलले नाही. त्यांनी विषय बदलला. पण माझ्या म्हणण्यातले तथ्य त्यांना जाणवले असावे.

रोप आपल्या खऱ्या जोमाने वाढायचे असेल तर, त्याला अवश्य ते ऊन आणि जरुरीपुरते खत-पाणी आलटून पालटून पण सातत्याने मिळत राहिले पाहिजे. माणूस हेही ईश्वराचे असेच एक रोप आहे. दारिद्र्याचे ऊन अती झाले तर ते करपते; आणि समृद्धीचे खतपाणी फार झाले तर ते कुजून जाते. आज देशोदेशी संपत्तीची जी विषम वाटणी चालते तिच्यामुळे अर्धीअधिक मनुष्यजात करपून जात आहे, तर उरलेली कुजून जात आहे. जग हिंडलेल्या कुणाच्याही हे चटकन लक्षात यावे.

वस्तुतः आज जगात विविध स्वरूपाची जी संपत्ती पैदा होत आहे तिचे वितरण विवेकाने करता आले तर, येथे सर्वार्थांनी सुखाचा आणि पुरुषार्थाचा स्वर्ग उभा करणे सहज शक्य आहे. विज्ञानाने माणसाला सहस्र हस्त दिले. पण त्याचे हृदय मात्र दिवसेंदिवस आक्रसत चाललेले दिसते. ते निष्प्रभ बनत चालले आहे आणि त्याचमुळे ते धास्तावलेलेही आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, राष्ट्रे एकमेकाकडे संशयाने पाहतात, एकमेकांना संभाव्य शत्रू मानतात. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र आपल्या उत्पन्नाचा केवढा तरी भाग सैन्यसज्जतेवर आणि शस्त्रास्त्र संचयावर खर्च करीत असते. सर्व दृष्टींनी जी प्रथम श्रेणीची राष्ट्रे आहेत, ती एवढयावर न थांबता आपली शक्ती, युक्ती आणि संपत्ती यांची बारेमाप उधळण करून अवकाश काबीज करण्याच्या नादी लागलेली आहेत. ज्यांना भीती आणि लोभ यांनी असे ग्रासले आहे ती जगत्कल्याण काय साधणार ? शीतयुद्ध किंवा प्रत्यक्ष युद्ध यांच्याच दिशेने त्यांची वाटचाल होत राहणार. म्हणून तर गांधीजी जीव तोडून सांगत होते की, भोगाला आळा घाला, संपत्ती जास्तीत जास्त पैदा करा, पण तिचा जरुरी-पुरताच उपयोग करा. आणि उरलेली लोककारणाला लावा. उदय सर्वांचाच झाला पाहिजे आणि असा सर्वोदय व्हायचा असेल तर, त्याचा प्रारंभ अंत्योदयानेच होऊ शकतो. त्यांनी सांगितलेले हे सूत्र व्यक्तिमात्राला जितके लागू, तितकेच ते लहान-मोठ्या राष्ट्रांनाही लागू आहे. गांधीजी धन द्या असे सांगताना त्याबरोबर तुमचे मन द्या हे आवर्जून सांगत.

मदर तेरेझा परवा बोलल्या तेव्हा, त्यांच्या कनवाळू उद्गारांतून मला गांधीजींचाच आवाज ऐकू आला. जगाच्या सर्वच उद्धारकर्त्यांचा आवाज अंतिमार्थाने एकच असतो.

डोळ्यांवर, कानांवर आणि मनावर झापडे लावून चालत असताना असा आर्त आवाज जेव्हा एकाएकी आपल्याला जाग आणतो, तेव्हा आपण सावध होतो. ही लाभलेली सावधानता हरवू नये यासाठी आपण आपल्यापरीने जागरूक राहिले पाहिजे. आपण जगाचे दुःख वारू शकत नाही, म्हणून जवळच्याचेही दुःख आपण हलके करू नये काय ? सगळे जग कवेत घेण्याइतके आपण समर्थ नसू. पण, ज्या जवळच्याला आपण स्नेहसौहार्द देऊ शकतो, ते दिल्याने एका परीने आपण जगालाच जवळ करीत असतो नाही का ? झाडाला जाणारे पाणी वाटेतल्या गवताला जीवन दिल्याशिवाय पुढे जात नसते. म्हणून भुकेल्याला अन्न देणे आणि स्नेहाला भुकेल्याला स्नेह देणे यापरती धन्यता आणखी कोणती असू शकते ?

जग केव्हा सुधारणार असेल ते असो. आपण आपल्या वाटेत येणाऱ्या या दोन भुका शक्यतोवर मिटवीत जाऊ.

फादरची आणि माझी पहिली भेट झाली ती मडगावला. आजच्या विद्यानिकेतनात, म्हणजेच चाळीस वर्षांपूर्वीच्या सारस्वतब्राह्मणसमाजात. ‘ नई तालीम ’ या विषयावर आचार्य काकासाहेब कालेलकरांचे व्याख्यान होते आणि फादर अध्यक्ष होते. मी तेव्हा तिशीच्या उंबरठ्याशी होतो. आणि फादरनी पस्तिशी ओलांडलेली असेल. ते गोरेपान आणि देखणे होते. हनुवटीपुरती त्यांना छोटीशी दाढी होती. काकासाहेब गांधीदर्शनाचे एक थोर भाष्यकार. त्यांचा शिक्षणशास्त्रातला अधिकार फार मोठा. नई तालीमचे तर ते शिल्पकारच. त्यांचे भाषण, श्रोत्यांना विषय सर्वस्वी नवा असूनही विलक्षण रंगले.

समारोपाचे भाषण करायला फादर उठले. त्यावेळी फादरांच्या भाषणाचा प्रभाव पडणे फार कठीण होते. पण त्यांच्या पहिल्याच वाक्याने मी थरारून निघालो. ते म्हणाले होते, “ My master was a carpenter ” भगवान ख्रिस्ताला जीवनदर्शन झाले ते त्याच्या सुतारकामातून, हा त्यांच्या प्रतिपादनातला मुख्य सिद्धांत होता. मला तर त्यांचे ते अविस्मरणीय भाषण ऐकत असताना, येशू ख्रिस्त असाच दिसत असावा असे सारखे वाटत होते. बोलताना ते लॅटिन, फ्रेंच, इटालियन अशा अनेक भाषांतली अवतरणे देत होते. मला त्याचे विशेष नवल वाटले नाही. पण त्यांचे संस्कृत अवतरणांतले सुस्पष्ट उच्चारण पाहून मी थक्कच झालो. त्यांच्या भाषणातील सगळी विचारधारा त्यांच्या राष्ट्रभक्तीवर स्वच्छ प्रकाश टाकणारी होती. त्यांच्या या प्रथम दर्शनानेच माझे त्यांच्यावर मन जडले. त्यांचे मी अभिनंदन केले तेव्हा, काकासाहेबांनी कवी म्हणून माझा त्यांना परिचय करून दिला.

या परिचयाचे स्नेहात रूपांतर व्हायला फारसा वेळ लागला नाही. ते अधून मधून बोरीला माझ्याकडे येऊ लागले. माझे वडील सोवळ्या-ओवळ्याचा कटाक्ष फार पाळीत, पण फादरची त्यांच्यावर देखील अशी मोहिनी पडली की, मी त्यांना पंक्तीला घेऊन जेवलो तरी त्याबद्दल त्यांनी अवाक्षरही काढले नाही.

---

**मला भेटलेला देवमाणूस**

---

ज्या लॉयोला हायस्कूलात ते शिकवीत, तिथे एकदा ते मला घेऊन गेले. जाऊन पाहातो तर, ख्रिश्चन मुले वेदातल्या प्रार्थना तालासुरावर म्हणत असलेली! मला हा अनुभव विलक्षण धक्का देणारा होता. संध्याकाळी मोती डोंगरावर आम्ही फिरायला निघालो. तेव्हा मी त्यांना म्हटले, "तुमचे प्रिंसिपॉल तुम्ही सुरू केलेली ही प्रथा कशी काय चालू देतात?" यावर त्यांनी विचारले, "त्यांनी तिला हरकत काय म्हणून घ्यावी? वेदवाङ्मय काय किंवा हिंदूधर्म काय, हा आम्हा भारतीय ख्रिस्त्यांचा जुना करार आहे. भगवान ख्रिस्ताने स्पष्टच सांगितले आहे, "मी तुमची परंपरा उखडायला आलेलो नाही, तर तिला नवा फुलोरा आणायला आलो आहे. मी लवकरच आमच्या धर्मशास्त्राची शेवटची पदवी मिळवण्यासाठी रोमला जाणार आहे. हिंदुधर्म हा आमचा जुना करार आहे या सिद्धांताचे प्रतिपादन करणारा प्रबंध मला या पदवीसाठी सादर करावयाचा आहे. तुम्हाला हायस्कुलातले माझे कार्य मी आज दाखवले ते माझी जागा तुम्ही घ्यावी आणि ते पुढे चालवावे म्हणूनच!"

मी हे सारे ऐकून थक्कच झालो. सहज कुतूहलाने मी त्यांना विचारले, "ख्रिस्तीकरण म्हणजे पाश्चात्यीकरण असे समीकरणच गोमंतकीय ख्रिश्चनांत चालते. असे असून तुम्हीच तेवढे अस्सल भारतीय कसे निघालात?" तेव्हा ते मला म्हणाले, "मीही तशाच वातावरणात वाढलो. घरात आम्ही इंग्रजी बोलत असू. कोकणी ही नोकरांची भाषा असा आमचा समज करून देण्यात आलेला होता. पण माझे भाग्य थोर म्हणूनच, माझ्या बाबतीत हा चमत्कार घडला. आम्ही गोव्याचे असलो तरी, वाढलो पुण्यात. दारावर वारकरी येत आणि एकतारीवर अभंग आळवून जात. मी लहानच होतो, पण ते अभंग माझे चित्त वेधून घेत. एकदा एका वारकऱ्याला मी विचारले, "तुम्ही कुठून आलात?" तो म्हणाला, "पंढरपूरहून" कशी कोण जाणे, पंढरपूर या शब्दाची माझ्यावर विलक्षण मोहिनी पडली. मला आठवते, सतत तीन दिवस तोच एक शब्द सारखा मी घोळवीत होतो. त्याचमुळे हिंदू परंपरा समजून घेण्याची मला ओढ लागली आणि दुरावलेले भारतीयत्व मला प्राप्त झाले.

फादर रोमला गेले आणि मडगावला त्यांच्या जागी मी रुजू झालो. पुढच्या सात वर्षांत त्यांची माझी गाठभेट झाली नाही. पण १९४६ साली जेव्हा गोव्याचा मुक्तिसंग्राम सुरू होऊन त्याच्या प्रचार कार्यासाठी मला मुंबईला जावे लागले, तेव्हा एक दिवस आय. सी. एस. लाडांकडे त्यांच्या बंधूचा आणि माझा परिचय घडला. त्यांच्याकडे फादरची चौकशी केल्यावर कळले की, डॉक्टर ऑफ डिव्हीनिटी ही शेवटची धर्मपदवी त्यांना मिळाली असून, त्यांचा प्रबंध व्हॅटिकनला मान्य झाला आहे आणि आता ते बरोजलेनमधील सेंट सेबॅस्टियन हायस्कूलचे प्रिन्सिपॉल आहेत.

मी म्हणालो, "तर मग मला त्यांचे लवकरात लवकर अभिनंदन केले पाहिजे." लाडांनी लगेच आपली गाडी काढली आणि आम्ही त्यांच्या हायस्कूलवर त्यांना भेटायला गेलो. मी नोकरी सोडून या संग्रामात पडलो आहे हे त्यांना कळलेले होते. पण त्यासंबंधी काहीही चौकशी न करता त्यांनी मला कोकणीत विचारले, "आरे, पुण तुजो ग्रास कसो चल्ला?" मी म्हटले, "ती काळजी ईश्वराला!" यावर ते म्हणाले, "तोच तुम्हाला हे विचारत आहे असे समजा."

माझी स्थिती तेव्हा पडलो तर माती लागणार नाही अशी होती. लगेच आपल्या शाळेत त्यांनी मला हिंदी शिक्षकाची नोकरी दिली. आणि काही शिकवण्या देण्याची व्यवस्था केली. फुरसतीच्या वेळात राष्ट्रनिर्माणाच्या गोष्टीच आमच्यात चालावयाच्या.

गोव्यातला खिस्ती समाज आपल्या मूळ परंपरेतून उखडला गेला आहे. त्याला तिच्यात सुस्थिर केल्याशिवाय गोवा खऱ्या अर्थाने मुक्त होणार नाही हा विचार माझ्यात पुरता भिंबवला तो त्यांनीच. नाव, वेष, पूजापद्धती, मंदिरस्थापत्य, रीतीभाती, भाषा आणि साहित्य या सर्वच बाबतींत तो संपूर्णता भारतीय बनावा यासाठी आपण कंबर कसली पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. आम्हीं दोघेही एकमेकांना आपापल्या कामात साहाय्य करू लागलो.

फादर पलपिटवरून सुद्धा हीच विचारसरणी प्रतिपादू लागले. त्यांच्या या विचारसरणीला व्हॅटिकनची मंजुरी होती. पण भारतातली त्यांची धर्मसत्ता तिला प्रतिकूल होती. नाना परींनी त्यांचा छळ सुरू झाला. ते डगमगले नाहीत. व्हॅटिकनमधले भारताचे प्रतिनिधी म्हणून त्यांना पाठविण्याला पंडित नेहरूंनी संमती दिली. पण त्यांच्या वरिष्ठांनी परवानगी नाकारल्यामुळे ही जागा त्यांनी पत्करली नाही. शेवटी खिस्ती धर्मसत्ताच गोव्यातील स्वातंत्र्याच्या आड येते, अशी जेव्हा त्यांची खात्री झाली, तेव्हा गोव्याच्या राजकीय परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी स्वीकारले. आणि गोव्याच्या राजकीय स्वातंत्र्याची जाहीरपणे मागणी केली. त्यामुळे भारतातल्या खिस्ती धर्मसत्तेने त्यांच्याशी वैरच मांडले. त्यांना जवळ जवळ वाळीतच टाकले. खिस्ती मंदिरात प्रवचने करायलाही त्यांच्यावर बंदी घालण्यात आली. त्या अज्ञातवासातच त्यांचे पुढे निधन झाले. ज्यांच्यासाठी त्यांनी जीव आटवला आणि छळवाद सोसला ते त्यांचे धर्मबांधवही त्यांना विसरले. ते सांगत होते ते त्यांच्या हयातीत कुणी मानले नाही. पण कालांतराने गोव्यातला सुविद्य खिस्ती समाज त्यांनी आखून दिलेल्या दिशेने आज चालत असलेला दिसत आहे. या देवमाणसाचे संपूर्ण नाव— फादर एच. ओ. मॅस्कारेनस्. आज पहाटे एकाएकी त्यांची फार तीव्रतेने आठवण झाली.

❋

माझे वडील चित्रकला शिकलेले नव्हते. पण चित्रकलेचे त्यांना विलक्षण वेड होते. फावल्या वेळात घराच्या भिंतीवर भल्यामोठ्या आकारात रविवर्म्याच्या चित्रांच्या प्रतिकृती चितारणे हा त्यांचा आवडता छंद होता. त्यांचे हे चित्रकाम चालू असताना मी ते तासनतास बघत बसलेला असायचा. पुसट रंगातून ही चित्रे हळूहळू कशी जिवंत होऊन उठतात हे पहाण्यात अद्‌भुत आनंद असे.

कामानिमित्त वडील घराबाहेर पडले आणि त्यांना परतायला सहज तीन-चार तास लागतील याची खात्री असली की, फडताळातली त्यांची पेटी मी उघडायचा आणि त्यातल्या रंगांच्या पुड्या उचलून समोर मांडून ठेवायचा. हिरव्या रंगाची पुडी उघडताच, त्यातून हिरवीकंच अरण्ये, आमराया आणि कुळागरे माझ्या नजरेपुढे उभी होत. निळ्या रंगाची पुडी उघडली की, उधाणलेला समुद्र किंवा निरभ्र निळे आकाश माझ्यासमोर विस्तारले जाई. तांबड्या रंगाची पुडी उघडली की, अक्राळविक्राळ जबड्याचे ताम्रमुखी राक्षस डरकाळ्या फोडीत, माझ्या अंगावर काटा उभा करीत. चांदवर्खी पुडी उघडली की, तलम परांच्या शुभ्र परी मला भुरळ घालू लागत. आणि सोनवर्खी पुडी उघडली की, सुवर्णाचे मुकुट आणि कवचकुंडले घातलेले चिरतरुण देव माझ्या दृष्टीपुढे गर्दी करीत.

पण अशा या आनंदात निमग्न असताना, एखादे वेळी वडिलांची चमचमीत चपराक पाठीत बसायची. त्यावेळी त्यातले कुणीच मला पावत नसत. आणि तरीही त्या बालवयात मनातल्या मनात चित्रे काढीत रहाण्याची माझी उत्कंठा रतिमात्र कमी होत नसे. पुढे चित्रे प्रत्यक्षात काढू लागलो. त्याचे कौतुकही होऊ लागले. धारवाडला असताना चित्रकलेच्या पहिल्या दोन ग्रेडी पासही झालो. पण तोपर्यंत कवितेने मला इतके पछाडले की, चित्रकलेची ओढ सतत तारवळतच उरली.

मी फार चित्रे काढली नाहीत. पण माझ्या उपजत चित्रासक्तीमुळे, हे चित्रमय जगत मी नेहमीच फार आस्थेने आणि बारकाईने पहात राहिलो. सृष्टिकर्ता विधाता

**कथा एका चित्र-तपस्व्याची**

सर्वच बाबतीत कलाविदांचा शिरोमणी आहे हे मी जाणतो. पण मला तो जास्त भावलेला आहे तो अव्वल दर्जाचा चित्रकार म्हणूनच.

मी कवी झालो याचा आनंद मला जरूर आहे, पण मला पुनर्जन्म असला आणि तो निवडण्याचे मला स्वातंत्र्य असले तर, चित्रकार होणेच मी अधिक पसंत करीन. माझ्या या धारणेमुळे चित्रकार माझ्याकडे आणि मी त्यांच्याकडे सहजच ओढला जातो. आजवर अनेक नामवंत चित्रकारांनी माझी छवी अनेक प्रकारांनी, रेखाटली आहे.

गेल्याच आठवड्यातली गोष्ट, 'मॅजेस्टिक गप्पा'तली माझी प्रगट मुलाखत आटोपल्यावर माझे जुने चित्रकार स्नेही तांबटकर मला भेटले आणि मला म्हणाले, "तुमचा पोर्ट्रेट, काढावा असे गेल्या दोन वर्षांपासून माझ्या मनात सारखे घोळते आहे. खिरोद्याहून काही कामासाठी मी इथे आलो आहे. आपण सिटिंग देऊ शकलात तर माझी इच्छा पुरी होईल." मी त्यांना होकार दिला.

दुसऱ्या दिवशी ते आले तेव्हा, भारतातल्या लेण्यांच्या गोष्टी निघाल्या. ती बाराशे आहेत, आणि त्यातली बहुतेक त्यांनी पाहिली आहेत हे त्यांच्याच तोंडून समजले. अजंठ्याची लेणी ही तर त्यांची काशीच. त्यांच्या या चित्रकाशीच्या वाऱ्या त्यांनी कित्येकदा केल्या आहेत. ती तीनदा पाहिलेली असल्यामुळे तिथल्या लेण्यांबद्दलच्या आमच्या संभाषणाला लगेच रंग भरला. त्या संभाषणाच्या ओघात एका चित्र तपस्व्याची एक रोमहर्षक सत्यकथा त्यांनी सांगितली. ती जितकी चित्तवेधक होती, तितकीच चिंतनशीलतेला प्रदीप्त करणारी होती.

जेव्हा अजंठ्याच्या लेण्यांचा शोध लागला, तेव्हा भारतात कंपनी सरकारचे राज्य होते. इंग्रज राज्यकर्त्यांतले तेव्हाचे जे पट्टीचे चित्रसमीक्षक होते त्यांच्या दृष्टीने, या लेण्यांतली चित्रे हा चित्रसृष्टीतला एक अद्‌भुत चमत्कारच होता. म्हणून त्यांच्या सल्ल्याने कंपनी सरकारने ठरवले की, एखाद्या अव्वल दर्जाच्या चित्रकाराकडून त्यांच्या प्रतिकृती तयार करून घ्याव्या आणि लंडन शहरात त्यांचे प्रदर्शन भरवावे. आपला हा मनोदय सिद्धीस नेण्यासाठी, मेजर रॉबर्ट गिल् हाच सर्वश्रेष्ठ चित्रकार आहे असे पाहून कंपनी सरकारने त्याची या कामावर योजना केली. वस्तुतः ही माहिती तांबटकरांना नव्हती. पण अजंठ्याच्या परिसरात हिंडत असताना, तिथल्या आदिवासींच्या तोंडून या गिल्साहेबांच्या काही आख्यायिका त्यांच्या कानावर आल्या. त्यांच्यातल्याच पारू नावाच्या एका मुलीशी लग्न करून या साहेबाने तिच्या बरोबर सोळा वर्षे संसार केला आणि ती वारल्यावर गावात तिची समाधीही बांधली अशी माहिती त्यांना मिळाली. या साहेबाबद्दल तिथल्या आदिवासी लोकांना फार आदर असल्याचेही त्यांना आढळून आले. अर्थात, त्यांच्याविषयीचे विशेष कुतूहल

जागे होऊन ते त्यांच्या चरित्राचा छडा लावीत गेले. भुसावळच्या सेमिनरीत त्यांना त्याची कबर आढळली. अजंठ्याच्या वास्तव्यात लेण्यातल्या पस्तीस चित्रांच्या प्रतिकृती त्यांनी लंडनमध्ये पाठविल्याचा उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांतून त्यांना मिळाला. त्या आणि सोळा वर्षांच्या काळांत त्यांनी काढलेल्या अन्य चित्रांचे एक भव्य प्रदर्शन गिल् साहेबाने लंडनमध्ये भरवले होते. आणि त्यामुळे अजंठ्याच्या चित्रकलेचा पाश्चात्त्य चित्ररसिकांना पहिला सुखद परिचय घडला हीही माहिती त्यांना उपलब्ध झाली. आणि दुर्दैवाची गोष्ट ही की, प्रदर्शन पहायला लोकांची गर्दी वाढत असताच एक दिवस अग्निनारायणाने त्याचा स्वाहाकार केला. हेही त्यांना समजले. आपले सारे जीवितकार्य असे अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडले असता, हा चित्र-तपस्वी भारतात का परतला, पारूशी लग्न करायला ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचा विरोध असताना त्याने ते का केले, ती मेल्यानंतर देखील तो मरेपर्यंत भारतातच का राहिला, या एकाकी कालावधीत तो काय करीत होता हे सर्व प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. आणि जी माहिती उपलब्ध झालेली आहे तीही, नेमकी त्यांच्या मृत्यूला एक शतक उलटले आहे तेव्हाच. ही सारी कथा ऐकून मी तांबटकरांना म्हणालो, "या विषयावर एखादे दीर्घकाव्य, नाटक किंवा कादंबरी सहज लिहिता येईल." यावर ते म्हणाले, "आज आपल्या लेखकांकडून असे प्रयत्न चालू आहेत. कलाकाराचे जीवन विफल आणि विस्मृत झाल्यासारखे दिसले तरी, ते जगाला खतपाणी होत असते हे केवढे समाधान!"

*

आल्बुकर्क नावाचे माझे एक स्नेही आहेत. आयुष्यात ते अनेक देश हिंडले. तेथे त्यांनी नावलौकिक आणि विपुल पैसा मिळवला. आणि त्यांचे वैय्यर्थ्य पटल्यावर सर्व लौकिक तृष्णांचा आणि संसाराचा त्याग करून त्यांनी अध्यात्माचा, म्हणजेच जीवन रहस्य उलगडण्याचा छंद घेतला. सध्या पर्वरीच्या आपल्या घरात ते एकटेच असतात. ते पहिल्यांदा मला भेटले तेव्हा, जे. कृष्णमूर्तींनी त्यांना झपाटले होते. एकदा तर, त्यांची प्रवचने ऐकण्यासाठी ते स्वित्झर्लंडला जाऊन आले. येताना त्यांनी त्यांच्या प्रवचनांच्या टेप्सही आणल्या आणि त्या मला ऐकवल्या. अधून मधून ते मला भेटून जात. आणि सवड असली तर, माझ्याशी आत्मचर्चा करीत.

अडीच वर्षांमागे ते दौऱ्यावरून परतल्यावर मला भेटायला आले, तेव्हा त्यांना एका नव्या कृष्णमूर्तींनी झपाटल्याचे मला आढळून आले. हे कृष्णमूर्ती एकेकाळी जे. कृष्णमूर्तींचे निकटवर्ती होते. आणि त्यांचे दर्शन मानणारे होते. पण पुढे त्यांच्यात मौलिक मतभेद सुरू झाले आणि त्याची परिणती या कृष्णमूर्तींनी स्वतंत्र मार्ग चोखाळण्यात झाली. हे कृष्णमूर्ती यू. जी. कृष्णमूर्ती किंवा केवळ यू. जी. म्हणून ओळखले जातात. जे. कृष्णमूर्तीइतके ते भारतात विख्यात नाहीत. पण युरोप-अमेरिकेत त्यांचा बोलबाला फार आहे. मला ही सर्व माहिती आल्बुकर्कच्या तोंडूनच मिळाली, मी त्यांना म्हटले, "त्यांचे एखादे पुस्तक मला वाचायला मिळेल का?" त्यावर ते मला म्हणाले, "यू. जी. पुस्तके लिहीत नाहीत. प्रवचने करीत नाहीत. कुणी एखादा प्रश्न छेडला तर, आपल्या परीने ते उत्तरे देतात. पण दुसऱ्यांच्या उपदेशाने कुणी शहाणा होऊ शकतो यावर त्यांचा विश्वास नाही. पण त्यांच्या एका चहात्याने त्यांच्या ध्वनिमुद्रित उत्तरांचे संकलन करून एक सायक्लोस्टायल पुस्तिका प्रसृत केली आहे. तिची एक प्रत मजजवळ आहे. ती मी तुम्हाला आणून देईन." कबूल केल्याप्रमाणे ते तशी प्रत मजकडे घेऊन आले. पुस्तिकेचे नाव होते, साक्षात्काराचे रहस्य. अर्थात ते दिलेले होते संपादकाने, यू. जी. नी नव्हे. मी मुखपृष्ठ

---

उलटताच पुढील शब्दांनी माझे लक्ष वेधून घेतले. त्याच्या खाली यू. जी. अशी लपेटदार सही होती. ते शब्द असे--

' माझ्या शब्दांना तुम्ही शिकवण म्हणणार असाल तर, म्हणा बापडे! पण त्यांना कॉपीराइट नाही. ते उद्धृत करायला, वाटायला, त्याचे स्पष्टीकरण वा विपर्यास करायला, त्याच्या अर्थाचा अनर्थ करायला, वा त्यांचा गैरवापर करायला तुम्हांला पूर्ण मोकळीक आहे. एवढेच नव्हे तर, त्यांच्या निर्मितीवर तुम्हांला स्वतःचा हक्कही सांगता येईल. त्यासाठी माझ्या संमतीची किंवा अन्य कुणाच्या परवानगीची गरज नाही. '

पुस्तिकेच्या प्रारंभीचे यू. जीं. चे हे उद्‌गार वाचून मी चांगलाच चमकलो. अनुभूतीचे शब्द ती नसलेल्यांच्या हाती गेले की, त्याची काय वाताहात होते याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. ही प्रक्रिया अटळ आहे हे ते जाणतात. आणि या वस्तुस्थितीचा मोकळ्या मनाने स्वीकार करतात. जीवनरहस्य सांगणाऱ्या आपल्या शब्दांचाही त्यांना लोभ नाही. त्यांच्यावर कुणी आपला हक्क सांगितला तर त्यालाही त्यांची हरकत नाही. माझ्या जेव्हा हे लक्षात आले, तेव्हा संतत्वाचा हा एक आगळा नमुना आहे हे मला उत्कटतेने जाणवले. मी त्यांची पुस्तिका अधिक आस्थेने वाचू लागलो.

यू. जीं. ना आत्मसाक्षात्कार वयाच्या एकुणपन्नासाव्या वर्षी झाला. त्या निमित्ताने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी या पुस्तिकेत दिली आहेत. आत्मसाक्षात्कार, ब्राह्मी स्थिती असे प्रयोग करून सहजस्थितीभोवती भ्रमांचे वलय निर्माण करणे त्यांना पसंत नाही. अहंता हा नुसता भ्रम आहे, तिला वास्तवात अस्तित्वच नाही याची एकदा साक्ष पटली की, माणूस आपल्या सहजस्थितीत स्थिर होतो असे ते सांगतात. मला कबीराचे ' सहज समाध भली ' हे गीत आठवले. आणि मनात आले, अशा पुरुषाला आपण केव्हा तरी भेटले पाहिजे.

गेल्या वर्षभरात आल्बुकर्कची आणि माझी गाठभेट नव्हती. ते परदेशी गेलेले अशा समजात मी होतो. पण आठ दिवसांमागे अकस्मात ते माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, " यू. जीं. चा मुक्काम सध्या दोनापावलाला आहे. तुमची त्यांची भेट व्हावी अशी माझी इच्छा आहे. मी गाडी घेऊन तुम्हांला न्यायला येईन. " मी त्यांना चटकन होकार दिला.

ते आले तेव्हा, सूर्य मावळू लागला होता. आम्ही मुक्कामाला पोचताच यूजींनी स्वतःच आमचे स्वागत केले. आणि आम्हांला घेऊन ते वर गच्चीवर गेले. त्यांच्या बरोबरच्या मंडळींनी खुर्च्यांचे कोंडाळे तयार केले. आम्ही बसून घेतले. मागोमाग

यू. जी आले आणि माझ्या शेजारच्या खुर्चीत बसले. जवळच त्यांचा एक अंतेवासी टेपरेकॉर्डर लावून बसला. आमचा परिचय तर आधीच होऊन गेला होता.

यू. जी. मध्यम उंचीचे आहेत. गोरे आणि उमद्या चेहऱ्याचे आहेत. सफेत सुती लेंगा आणि रेशमी कुडता असा त्यांचा अगदी साधा वेष होता. केस भरगच्च होते. त्यांना कुठे कुठे काळाचा पांढरा कुंचला लागला होता. त्यांचे वय आज त्रेसष्ट आहे पण त्यांच्या उमदेपणामुळे वयाच्या मानाने ते पुष्कळच तरुण वाटतात. त्यांच्या वागण्यावरून हा माणूस आपल्यातलाच आहे, खूप परिचित आहे, असेच वाटत होते. त्यामुळे प्रथमपरिचयातील संकोचाला तिथे अवसरच राहिला नाही.

पहिला प्रश्न आल्बुकर्कनीच छेडला. तो होता केवळ यू. जीं. ना. बोलके करण्यासाठी.

त्यांच्या बोलण्याच्या रोखावरून माझ्या लक्षात आले की, त्यांना कोणत्याच तत्त्वप्रणालीचा पुरस्कार करावयाचा नाही. विविध धर्मप्रेषितांनी ज्या विविध तत्त्वप्रणाली जीव टाकून जगात प्रसृत केल्या, त्यांच्यामुळेच जग आज कलहाने ग्रासले गेले आहे आणि विध्वंसाच्या कड्याशी येऊन ठेपले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. प्रत्येक व्यक्ती ही जात्याच स्वयंभू आहे आणि तिचे स्वयंभूत्व निसर्ग फुलवू पहातो, पण या तथाकथित महापुरुषांनी पूर्ण पुरुषाचा आपापला आदर्श लोकांपुढे ठेवला आणि त्यांना आपापल्या साच्यांतून आकार देण्याची खटपट चालवली, परिणाम असा झाला की, निसर्गाचे मूळ ईप्सितच बाजूला सारले गेले, माणसे विकृत बनत गेली. आणि त्यातूनच कलह आणि विद्ध्वंस यांचीच काय ती पैदास झाली हे त्यांचे स्पष्टीकरण होते.

यावर कुणीतरी विचारले, 'मग आपण जिला संस्कृती म्हणतो, तिला काही अर्थच नाही काय?' या प्रश्नाच्या उत्तरादाखल ते म्हणाले, "संस्कृती, ज्ञान, वगैरे ज्या गोष्टींबद्दल आपण मोठा अभिमान बागवतो त्या सर्व अनर्थावह आहेत. युगानुयुगांच्या या विचारसंग्रहाचा आपण डोळे मिटून स्वीकार केला आहे. तो काही आपल्या प्रतीतीतून उगवलेला नाही. बुद्धीने विणलेली ही कोळिष्टके आहेत. शरीरव्यवस्थेत बुद्धीला स्थान नाही असे मला म्हणावयाचे नाही. भावना, संवेदना, विचार या सर्वांनी त्या व्यवस्थेची स्वाभाविक लय बिनसू न देता वावरायला हवे. पण बुद्धीला आपण वाजवीपेक्षा अधिक महत्त्व दिल्यामुळे तिने सर्वांवर कुरघोडी केली आहे. आणि आपली पेशीन्‌पेशी विषाक्त करून टाकली आहे."

यावर मी विचारले, "मग मानवजातीला या चक्रव्यूहातून सुटण्याची काही आशाच नाही का?" ते म्हणाले, "त्यातून कुणीच आपल्याला सोडवू शकत नाही. त्यातून सुटण्याची आच लागून धडपडत रहाणे एवढेच आपल्या हाती आहे. ही

धडपड यशस्वी होईलच याची शाश्वती नाही. आपल्यातच एक विस्मयकारक स्फोट होऊन ही सुटका घडावी लागते. " अशी चर्चा बरीच झाली. ती आम्हा उपस्थितांना कितपत कळली देव जाणे. त्यांचे म्हणणे सांगताना त्याचा माझ्याकडून किती विपर्यास झाला असेल हेही मी सांगू शकत नाही. पण त्यांच्या दोन तासांच्या संपर्कात काही आगळे-वेगळे जाणवून मी सावध झालो एवढे मात्र खरे.

आम्ही जायला उठलो. त्यांचा निरोप घेतला. दुसऱ्या दिवशी पहाटेच ते लोंढ्याला जाऊन गाडी धरणार होते. फार जवळचा माणूस दूर जायला निघाल्यावर जिवाची चुटपुट व्हावी, तसे काही तरी मला झाले आणि काळोख पडून दिवे लागले होते तरी देखील, माझे मन एका आगळ्या सूर्यास्ताच्या उजाळ्यात रेंगाळत होते.

३००६
२४०३८
निबंध ३।११।८३

एकेकाला एकेक योग असतो. कुणाला धनाचा, कुणाला सत्तेचा, कुणाला विलासाचा, तर कुणाला स्नेहसत्कारांचा; तसाच मला योग आहे तीर्थक्षेत्रांचा. मी पिंडतःच सश्रद्ध आहे. देव मला घरच्या माणसांपेक्षाही जवळचा वाटतो. पण तीर्थक्षेत्रांना जीव टाकून जावे असे मला कधीच वाटले नाही. पण माझ्या कुंडलीचा योगच असा की, काश्मीरमधील अमरनाथपासून कन्याकुमारीपर्यंतच्या, देशातील बहुतांश तीर्थक्षेत्रांचे दर्शन मला विनासायास आणि पदराला कपर्दिकेचा खार न लागता घडलेले आहे. कुणी ना कुणी मला आग्रहाने ओढून नेले आणि यात्रांचा अपार आनंद मला मिळवून दिला. गेल्या महिन्यात पुन्हा एकदा असेच घडले.

परभणीला होणार असलेल्या एका जंगी कविसंमेलनाचे मला निमंत्रण आले. या संमेलनाला कमीत कमी दहा हजार श्रोत्यांची उपस्थिती असते हे मला ऐकून माहीत होते. तो रंग एकदा लुटावा असे वाटले देखील. पण लांबच्या प्रवासाची दगदग, त्यात मराठवाड्यातला होरपळणारा उन्हाळा आणि तिथली धूळ या कल्पनेनेच माझ्या मनाने माघार घेतली आणि संयोजकांना मी माझा नकार कळवला; पण कविसंमेलनाला अवघे तीन दिवस राहिले आहेत अशा वेळी त्या भागातील स्नेह्यांची गळ घालणारी अजीजीची पत्रे आली. निरुपाय होऊन औरंगाबादपर्यंतचे विमानाचे तिकीट मी मिळवले. औरंगाबादला पोचल्यावर तेथील स्नेह्यांच्या भेटीगाठी झाल्या. त्यांतले भगवंतराव देशमुख म्हणाले, परभणीचा कार्यक्रम आटोपल्यावर आजूबाजूच्या भागास निदान आणखी दोन तरी कार्यक्रम तुम्हाला द्यावे लागतील. पण सोमवार संध्याकाळपर्यंत तुम्हाला माझ्याकडे पोचायला हवे. कारण मंगळवारी सकाळी तुम्हाला घेऊन पैठणला जायचे आम्ही पतिपत्नींनी ठरवले आहे. मी त्यांना होकार दिला. आणि त्याप्रमाणे कार्यक्रम आवरून मी वेळेवर त्यांच्याकडे हजर झालो.

देशमुख पतिपत्नी नवस फेडायला आपल्या कुलदेवीला जाणार होतो. त्यांची कुलदेवी रेणुका. ही कोकणातली सांतेरी किंवा कुंकणा पैठणला कशी पोचली हा

## नाथांचे पैठण

माझ्या लेखी एक कुतूहलाचा विषय होता. पैठणबद्दल लहानपणापासून ऐकून-वाचून मला खूपसे माहीत होते. याच पैठणच्या ब्रह्मवृन्दाने निवृत्ती-ज्ञानदेवांना मौंजिबंधनाचा हक्क नाकारला होता. पण पैठणच्या या प्रमादाचे परिमार्जन ज्ञानेश्वरीची पोथी परिशुद्ध करून तिथल्याच नाथांनी केलेले होते. आमच्याकडे रोज जे भजन चाले त्यातही सर्वाधिक रचना नाथांचीच असे. 'असा कसा देवाचा देव बाई ठकडा। देव एका पायाने लंगडा' या त्यांच्या गीतातून 'दहिदुधाचा रबडा' करणारा लडिवाळ बाळकृष्ण मी माझ्या बाळडोळ्यांनी पहिल्यांदाच पाहिला होता सप्ताहाच्या दिंडीत 'वारियाने कुंडल हाले। डोळे मोडीत राधा चाले' हे गीत मी पहिल्यांदा ऐकले तेव्हा सांगोवांगीतली राधा मी नखशिखान्त पाहिली होती. 'भूत जबर मोठं गं बाई' या गीतासरशी माझ्या सर्वांगावर सरसरून काटा उठला होता. आणि 'नाथांच्या घरची उलटी खूण। पाण्याला लागली तहान' हे गीत ऐकून मी गोंधळून गेलो होतो. पाण्याला तहान कशी लागते, हे माझ्या बालमनाला पडलेले एक मोठे कोडेच होते. आता त्याचा थोडा अंदाज लागू लागला आहे. अशा वेळीच पैठणला जाण्याचा योग आला यात काही अर्थपूर्ण संकेत आहे असे सारखे मला वाटू लागले. पैठण या नावाबरोबर घरातल्या जुन्या पैठणीचीही आठवण झाली. सणासुदीला केवढ्या हौसेने आई ती नेसायची; आणि नेसल्यावर कशी पिवळ्या ज्वालेसारखी दिसायची तेही आठवले.

औरंगाबादेची ही माझी पाचवी खेप होती. बसच्या तासाभराच्या प्रवासाने मला पैठणाला सहज जाता आले असते. पण कसे कोण जाणे, तिथे जाण्याचे मला सुचलेच नाही. पण आता हा असा योग आला होता. मला वाटले, मला आपल्याकडे नेण्याचे नाथांच्याच मनात आले असावे.

आम्ही अलार्म लावून ठेवून भल्या पहाटे उठलो. कारण सकाळची पहिली साताची बस आम्हाला पकडायची होती. नाथांच्याच कृपेने बस सुटता सुटता आम्हाला मिळाली. सव्वा आठच्या सुमाराला आम्ही गावात पोचलो. गाव अजून झोपेतून उठले नव्हते. पान सिग्रेटचे गाडेही अजून उघडले नव्हते, गावची कळा एखाद्या प्रगत खेड्यासारखी वाटली. पाट्या पहात मी चालत होतो. त्यातल्या बहुतेक नाथांचाच नामोच्चार करीत होत्या. मुक्कामाला पोचेपर्यंत मला दम लागलेला होता. हे लक्षात घेऊन भगवंतरावांनी आपल्या एका स्नेह्यामार्फत जीपची व्यवस्था केली होती. जेवण होऊन वामकुक्षी होते तोच ती दारात उभी राहिली. त्या जीपने आम्ही पहिल्यांदा गेलो नाथ सागरला, हे गोदावरीवर बांधलेले प्रचंड धरण. एवढे मोठे मातीचे धरण उभ्या आशियात नाही, असे तेथील रहिवाश्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले. आम्ही धरणाच्या भिंतीच्या फाटकापर्यंत जीपने गेलो. पहातो तो डोळे फाटून जावे असा पाण्याचा निळा विस्तार समुद्रासारखा पसरलेला.

भर दुपारच्या चमचमत्या उन्हात सम्राटाच्या वैभवाने तो तळपत होता. त्याच्या त्या जलसमृद्धीने आजूबाजूचा अनेक मैलांचा भूभाग सस्यश्यामल होणार असे आम्हाला सांगण्यात आले.

धरणाच्या डाव्या अंगाने गोदावरी क्षीण आणि मंद होऊन वहात होती. तिच्या एका कडेला विस्तीर्ण माळ होता. लवकरच तेथे ज्ञानेश्वर उद्यान होणार असल्याचे समजले. मला एकदम ज्ञानेश्वरीतील सहाव्या अध्यायातल्या ध्यानभूमीवरच्या ओव्या आठवल्या. आणि तसा रम्य प्रदेश त्या माळावर दिसून त्या कडाक्याच्या उन्हातही सुखद शैत्याचा प्रत्यय आला. तेथून आम्ही जीप नाथांच्या समाधिस्थानाकडे वळवायला सांगितली. ते गोदेच्या अगदी काठालाच आहे. त्याच्या फाटकाशी थांबलो. तेव्हा पिंजर, नारळ, फुले आणि खाद्यपदार्थ यांची छोटी छोटी दुकाने हारीने दिसली. फुले घेऊन आम्ही फाटक ओलांडले तेव्हा भलामोठा मंडप दिसला. समोरच्या भिंतीला समांतर अशी अनेक समाधींची रांगच होती. एक पोरगा प्रसाद द्यायला बसलेला होता. तो म्हणाला, नाथांचे पणजोबा भानुदासांपासून त्यांच्या नातवापर्यंत सहा दांपत्यांच्या या समाध्या आहेत. मला ही पैसे उपटण्याची एक निर्बुद्ध शक्कल वाटली. कारण नाथांनी जलसमाधी घेतल्याचे मला वाचून माहीत होते. तरीही आम्ही मंडपाला एक प्रदक्षणा घातली आणि मागच्या दरवाजाने गोदाकाठी जाऊन थांबलो. प्रवाह क्षीण होता, तसाच शांतही होता. त्याच्या निळाईवर प्रसन्नता विराजमान होती. त्यातल्या एका डोहाकडे अंगुलीनिर्देश करून भगवंतराव म्हणाले, “नाथांनी जळसमाधी घेतली म्हणतात, ती ही इथे.” मी मनातल्या मनात त्या स्थळाला नमस्कार केला. मला वाटले, भागवत धर्माचा भगवा ध्वज येथे कायमचा लावलेला असायला हवा होता.

तेथून आम्ही नाथांच्या वाड्यात गेलो. वाडा एखाद्या जहागीरदाराचा असावा त्याहून मोठा. गेल्या चारशे वर्षांत त्यांच्या कुटुंबाच्या पात्या वाढल्या तसा हा वाडाही वाढला असेल. पण तो मुळातच मोठा असला पाहिजे हे जाणवले. आम्ही गेलो तो भाग थोरल्या पातीचा. आम्ही वाड्यात शिरलो तेव्हा तेथे प्रवचन चालले होते. आणि पाचपंचवीस स्त्रियांचा जमाव भक्तिभावाने ते ऐकत होता. नाथ ज्या विठ्ठल-मूर्तीची नित्य पूजा करीत ती मला पहायची होती. ती प्रवचनकारासमोरच्या भिंतीच्या डाव्या अंगाला होती. सारा देव्हारा आणि त्यातल्या सर्व लहान मोठ्या मूर्ती घासून पुसून स्वच्छ ठेवलेल्या होत्या. दिव्यांच्या प्रकाशात त्या पंचरसी मूर्ती झळाळत होत्या. त्यांची रचना तीन पायऱ्यांची होती आणि सर्वोच्च पायरीवर असलेली काळ्या पाषाणाची विठ्ठलमूर्ती सोन्याच्या वस्त्रालंकारांनी मढविलेली होती. हे सारेच धातुशिल्प असाधारण कुशलाईचे होते. नाथांचे एक वंशज मुख्य मूर्तीने काय चमत्कार केला हे साग्रसंगीत सांगत होते. पण माझे त्याकडे लक्ष नव्हते.

नाथांच्या नित्यस्पर्शाने आणि भक्तिभावाने त्या पुण्यपावन झाल्या आहेत, या एकाच जाणिवेत मी बुडून गेलो होतो. तिथून नाथांचे ते वंशज आम्हांला त्यांच्या प्रसिद्ध रांजणाकडे घेऊन आले. हा रांजण देव्हाऱ्यासमोरच सभामंडपाच्या एका टोकाला आहे. हा रांजण दोन वार लांबी-रुंदीचा आहे. त्यांनी त्यावरचे झाकण काढून तो आम्हाला दाखवला. यात्रेला येणारे, आपापली घागर त्यात ओतीत असतात. ज्याच्या घागरीने तो पुरता भरतो त्याचा म्हणे तेथे सत्कार होतो. मला ओवी आठवली :

वाड्यामध्ये सांगतात नाथ गीता-भागवत
समोरच्या रांजणात गंगा बसली ऐकत

तेथून परतताना गोड मला वर्ज्य असूनही मी जीरं गुऱ्हाळाशी थांबवायला लावली. लिंबू टाकलेला रस घेतल्यानंतर ऊन थोडे सुसह्य झाले. गुऱ्हाळाचा मालक म्हणाला, आता यात्रा जवळ आली आहे. सतत एक महिना भक्तभाविकांची जी झुंबड उडेल तेवढ्यावर वर्षाची कमाई सुटेल.

तेथून भगवंतराव मला बाळासाहेब पाटलांच्या वाड्यावर घेऊन गेले. मला घेऊन येतो असे त्यांनी त्यांना आधीच सांगून ठेवले होते. ते आमची वाटच पहात होते. पुरातन गोष्टी गोळा करण्याचा त्यांना कसा नाद आहे याची थोडीशी जाणीव भगवंतरावांनी मला दिलेली होती. हे गृहस्थ माझ्या कवितेचे चांगले जाणकार आणि चहाते निघाले.

त्यांच्या चौसोपीवर थोडे चहापाणी झाल्यावर आम्हांला घेऊन ते माडीवर गेले. तेथले एक दालन पांढऱ्या फडक्यात बांधलेल्या पोथ्यांनी भरून गेले होते. ते म्हणाले, "या सहा हजार हस्तलिखित पोथ्या आहेत. तुम्हांला पुरेशी सवड नाही तेव्हा काही मोजक्याच गोष्टी तुम्हाला दाखवतो." एवढे बोलून त्यांनी आम्हांला दुसऱ्या दालनात आणले. भिंतीला तक्के लावून आम्हाला बसवले आणि आपली खास पेटी आणून ती आमच्या समोर खोलली. त्यातली एकेक हस्तलिखित पोथी ते आम्हांला दाखवू लागले. सुवाच्य आणि देखणे बाळबोध वळण. शाई इतकी काळीभोर की, नुकतीच वाळली आहे असे वाटावे. मग बारीक अक्षरांच्या लहान पोथ्या निघाल्या. त्या नीट वाचण्यासाठी मुठीचा सूर्यकान्त त्यांनी माझ्या हाती दिला. शेवटी त्यांनी एक इंच लांबीरुंदीची एक पोथी काढली. ती होती भगवद्गीता. सूर्यकांताच्या साहाय्याने मी ती वाचू लागलो. विलक्षण सुवाच्य आणि तितकीच देखणीही. पण एवढ्याने संपले नाही. त्यांनी तेरीकोटाची लज्जागौरी मला दाखवली.

मी विचारले, "हिचा काल?"

ते म्हणाले, "सात वाहनांचा."

मी म्हटले, " पण ही मिळाली कशी ? "

" गोदेचे आटलेले पात्र उघडे पडले तेव्हा, आत गाडल्या गेलेल्या शहरातील किती तरी अलभ्य वस्तू आयत्या हाती आल्या. "

त्यानंतर त्यांनी अलंकारासाठी वापरले जाणारे स्फटिकमणी आणि साच्यावरचे भाजल्या मातीचे मणी दाखवले. काही अलंकारांचे तुकडेही दाखवले. आणि शेवटी काळ्या स्फटिकाचा एक पातळ चौकोनी तुकडा माझ्या हाती दिला. त्याच्यावर एक पिवळा ठिपका तेवढा होता. त्यांनी तो माझ्या का हाती दिला हे काही माझ्या लक्षात आले नाही. माझे गोंधळलेपण त्यांच्या लक्षात आले. ते म्हणाले, " सूर्य-कान्तातून बघा. " बघतो तो काय, नाजुक कारागिरीचे एक सालंकृत सुवर्णमुख ! ही अपूर्व कारागिरी पाहून मी स्तिमित झालो. आता दिवस पडायला आला होता आणि औरंगाबादची बस पकडणे भाग होते. माझे पाय निघत नव्हते. कारण अजून पुष्कळ पहायचे होते. बाळासाहेब म्हणाले, " तुमचा शेरा या पुस्तकात असू दे. " तो लिहून आम्ही त्यांच्या वाड्यातून बाहेर पडलो. बाळासाहेब आम्हांला पोचवायला आले. मला एकाएकी पैठणीची आठवण झाली. मी त्यांना विचारले, " अजून येथे पैठणी होतात काय ? " " होतात तर ! आमच्यात म्हणच आहे, बोटभर विणावे आणि पोटभर जेवावे. "

" काय असते पैठणीची किंमत ? "

" दीड हजारापासून बारा हजारापर्यंत ! "

ती घेणे माझ्या आवाक्यातले नव्हते. पण अस्सल पैठण पहावी असे मनात होते. पण गाडी चुकण्याच्या धास्तीपायी तो विचार मी सोडून दिला.

स्टॅण्डवर काळोखात फार वेळ थांबावे लागले, पण त्यात काही वाटले नाही. मी त्या काळोखात नाथांचे पैठण पहात होतो. काळचे, आजचे आणि उद्याचेही.

*

मी सश्रद्ध जरूर आहे. पण तीर्थक्षेत्रांच्या यात्रा जीव टाकून कराव्या हे माझ्या स्वभावातच नाही. आणि तरीही काश्मीरमधील क्षीरभवानी पासून दक्षिणवासिनी कन्याकुमारी पर्यंतच्या बहुतेक तीर्थक्षेत्रांच्या यात्रा मला सहज घडल्या आहेत आणि त्याही स्नेह्यांच्या आग्रहापायी आणि नवपरिचितांच्या हौसेपायी. त्यांसाठी मला फारशी पदरमोडही करावी लागलेली नाही.

यात्रास्थाने नेहमी स्वच्छ आणि शुचिर्भूत ठेवायला हवीत. तेथे भक्तीच्या नावावर यात्रेकरूंची लुबाडणूक होता कामा नये आणि कोलाहलाने तिथली शांती आणि गांभीर्य नष्ट होऊ देता कामा नये, हे भान एकंदरीत आम्हा भारतीयांना नसतेच. दक्षिणेत हे भान बरेचसे सांभाळले जाते. उत्तरेत या बाबतीतली अनास्था अगदी वैताग आणणारी आहे. आणि तरी देखील, आपल्याकडची सर्व तीर्थक्षेत्रे आपली धर्मभावना जागवून एक आगळा आनंद आपल्याला सदैव देत असतात.

अशी स्थाने उगवतात कशी याचा शोध घेताना माझ्या लक्षात आले की, त्यातल्या काहींना जात्याच असे प्राकृतिक सौंदर्य लाभलेले असते की, त्यांच्या दर्शनासरशीच आपली धर्मभावना जागी होते. असा प्रत्यय लोकांना सारखा येत राहिला की, तेथे तेच एकाद्या दैवताची प्रतिष्ठापना करतात. पुढे त्या स्थानाला वाढते उपासनाबळ लाभत गेले की, त्याची धर्मभावना जागवण्याची शक्तीही वृद्धिंगत होत जाते. कधी असेही होते की, त्या स्थळाला प्राकृतिक सौंदर्य फारसे नसले तरी, एकाद्या पुण्य-पुरुषाच्या धर्मकर्तृत्वाचे अधिष्ठान लाभल्यामुळे त्याचे तेजोबळ त्याला प्राप्त झालेले असते. आणि तेच भोवतालच्या लोकसमुदायाची धर्मभावना जागवू लागते आणि महात्म्य पावते.

या दोन्ही प्रकारच्या स्थानांच्या ठिकाणी त्यांच्या उपासकांच्या संस्कृतीतल्या सर्व विलोभनीय गोष्टी मानस सरोवरावर हंस जमावे तशा गोळा झालेल्या असतात. त्यांचे परीक्षण आणि परिशीलन करता करता आपल्या संस्कृतीची, एरवी दुर्लक्षित

---

**कुणकेश्वराची यात्रा**

---

राहिलेली कितीतरी उद्बोधक मर्मस्थाने आपल्याला एकाएकी उमगतात आणि आपल्याला धन्यतेचा प्रत्यय देऊन जातात.

कालच्या आठवड्यात असाच प्रत्यय मला पुन्हा एकदा आला. देवगड कॉलेजचे प्राचार्य, माझे स्नेही गोपाळराव मयेकर आपल्याकडील स्नेहसंमेलनाचे अध्यक्षस्थान मी स्वीकारावे अशी विनंती करण्यासाठी मुद्दाम येऊन मला भेटले. सहा वर्षांमागे याच कॉलेजच्या संमेलनाला मुख्य पाहुणा म्हणून ते मला घेऊन गेले होते. आता त्याच कॉलेजची स्वतःची इमारत झालेली आहे. ती उभी करण्यात त्यांचा वाटा फार मोठा आहे. तिच्या शिलान्यासाला मी उपस्थित होतो. त्यांच्या कर्तृत्वाचा यथोचित आदर करण्यासाठी त्यांचे निमंत्रण स्वीकारणे माझे कर्तव्यच होते. शिवाय देवगडला पुन्हा भेट देण्यात मला खास आनंदही होता. कारण त्याच्या पहिल्याच भेटीत त्याच्या प्राकृतिक सौंदर्यावर मी भलताच लुब्ध होऊन गेलो होतो. प्राचार्यांच्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सहवासात माझ्या कित्येक घटका काव्य-शास्त्र-विनोदांत बहरून गेल्या होत्या. तिथल्या काहींनी आपल्या उत्स्फूर्त पाहुणचाराने आणि निरागस स्नेहाने मला उपकृत करून ठेवले होते. आणि या भावसमृद्ध भेटीवर लाँचमधून केलेल्या समुद्रसफरीने अविस्मरणीय चांदणमुद्रा उमटवलेली होती. त्यामुळे त्यांचे आमंत्रण मी उत्साहाने आणि तत्परतेने स्वीकारले. उतारवय आणि तोळामासा प्रकृती यांची क्षिती बाळगली नाही.

माझ्या अडचणी लक्षात घेऊन त्यांनी खासगी गाडी मला न्यायला पाठविली. उन्हे उतरू लागली होती. आणि का कोण जाणे, सायंकालीन लालिम्याप्रमाणे एक प्रकारची उदात्त उदासी माझ्या मनावर पसरू लागली होती. तशा मनोदशेतच मी गाडीत बसलो. त्या दीर्घ प्रवासात हिरवी मखमल ल्यालेली वायंगण शेती वारंवार वाटेत लागत होती. नद्या लागत होत्या. माझ्या उदासीन प्रसन्नतेचे रेशिमधागे ओवले जात होते. बांदे आले तेव्हा, मला सोहिरोबांची आठवण झाली. ज्या इन्सुली या घाटात त्यांना गैबीनाथांचा गुरुप्रसाद लाभला, तो आता येईल म्हणून मी सर्वांगसावध झालो. तेथे पार बांधलेला एक सात जांभळींचा पुंज आहे. हीच त्यांच्या साक्षात्काराची जागा असा तिथला लोकसमज आहे. त्यांच्या दर्शनाला मी उत्सुक झालो. तेथे ड्रायव्हरने क्षणभर गाडी थांबवली आणि खिशातले एक नाणे कपाळाला लावून त्या पारावर वाहिले. घाटातली संरक्षक देवता म्हणून येणारा जाणारा त्यांच्याकडे पाहातो आणि त्याला आपली काणूक वाहून जातो, हे कळल्यावर आम्हा आजकालच्या कवींना लाभणारी प्रसिद्धी किती वरवरची आणि तकलुपी आहे हे चटकन कळून चुकले.

सावंतवाडी ओलांडून आम्ही मार्गाला लागतो तोच डाव्या अंगाला दोन पांढऱ्या शुभ्र कबरी लागल्या. त्या होत्या, तिथल्या सुफी संतांच्या. तिथे ऊद जळत असेल

अशी माझी अपेक्षा होती. प्रत्यक्षात तो तिथे जळत नव्हता. पण तसा उल्लेख असलेली कवी वसंत सावंतांची कविता मला आठवली आणि त्यासरशी मला उदाचा वास जाणवला. चांगल्या कवितेची प्रत्ययकारिता किती विलक्षण असते! सोहिरोबांची हिंदुस्थानी कविताही आठवली. मनात आले, या सुफी संतांबरोबर त्यांची पुष्कळ अध्यात्मचर्चा झाली असेल. मनाने तिचा अंदाज घेता घेता मी केव्हा देवगडला पोचलो हे माझ्या ध्यानातच आले नाही. दोन घास खाऊन घेऊन मी लवकर झोपी गेलो आणि आल्हादक गारव्यामुळे सकाळी अगदी तरतरीत होऊन उठलो.

नास्ता उरकल्यावर मयेकर म्हणाले, "मागच्या खेपेला तुम्हांला कुणकेश्वरला नेऊ शकलो नव्हतो. ही वास्तू फारच सुंदर आहे आणि अगदी समुद्राकाठीच आहे. समोरच्या पुळणीवरून चार मैल चालत राहिलो तर दीड तासात तिथे पोचू. अशा फेरफटक्याचा आनंद मी तुम्हांला सांगायला नको. पण आजच्या तुमच्या प्रकृतीला तो झेपावयाचा नाही. शिवाय आधी तुम्हांला कॉलेजची नवी इमारत दाखवायची आहे ती पाहून होईपर्यंत उन्हेही वाढतील, तेव्हा आपण त्या स्थानाला गाडीनेच जाऊ. गाडीच्या रस्त्याने ते अवघे सोळा मैलांवर आहे."

"कुणकेश्वर हे नाव या स्थळाला कसे पडले? कुणक या शब्दाचा अर्थ काय?" मी विचारले. त्यावर ते म्हणाले, "या विषयी इथे कुणालाच काही माहीत नाही. हा संशोधनाचा विषय आहे. पण त्यांच्या विषयीची प्रचलित लोककथा मोठी रोमहर्षक आहे."

"मग ती सांगा ना!" मी.

ते कथा सांगू लागले—

"एकदा एक मुसलमान अंमलदार समुद्रातून सफर करीत असताना त्याचे जहाज भयंकर वादळात सापडले. आणि ते आता निश्चित बुडणार असे वाटून त्याची अक्षरशः गाळण उडाली. भोवती घनदाट काळोखी रात्र होती. तरी तशा काळोखातही त्याला काठावरच्या छोट्या टेकडीवर एक तेवता दिवा दिसला. त्या दिव्याच्या दैवताची करुणा भाकून त्याने नवस केला की, मी या संकटातून वाचलो तर तुझे देऊळ बांधीन. तो असा नवस बोलला मात्र, वादळ ओसरत गेले आणि त्याचे जहाज सुखरूप बंदराला लागले. अर्थात बोलल्याप्रमाणे तिथल्या शिवलिंगावर त्याने देऊळ बांधले. त्यावर सोन्याचा कळस चढवायचा होता. तो चढवण्याचा प्रत्येक प्रयत्न फसायचा. शेवटी तो अंमलदार म्हणाला, मी स्वतःच तो चढवीन आणि त्यात मला अपेश आले तर स्वतःचे बलिदान करीन. त्याप्रमाणे त्याने कसोशीने प्रयत्नही केला. पण त्यात त्याला यश आले नाही. त्याने शिखरावरून

खाली उडी टाकली आणि तेथेच तो गतप्राण झाला. लोकांनी तेथे त्याची कबर बांधलेली आहे. देवाप्रमाणेच लोक तिच्यावरही फुले वहातात. हे गाव तसे अगदी लहान आहे. पण महाशिवरात्रीला तिथे लाखावर यात्रा भरते."

मयेकरांच्या तोंडची ही कथा ऐकून मी भारावून गेलो आणि त्यांना म्हणालो, "तर मग, मला हे देऊळ पाहिलेच पाहिजे."

कॉलेजची इमारत पाहून झाल्यावर आमची गाडी कुणकेश्वरच्या दिशेने धावू लागली. वाटेत पाणथळी, कुळागरे, माडांच्या राया वगैरे लागत. तेव्हा गोव्यातली परिचित सौन्दर्यस्थळेच भेटत राहिली असे वाटले.

समुद्रकाटच्या त्या देवळाशी पोचलो तेव्हा, नंदनगोळचे एक झाड लागले. आपल्या शरीराची सुंदर कमान करून झेंड्यासारखे ते उंच वाढले होते. त्याला वळसा घालून आम्ही जांभ्या दगडाची पाज चढलो. तिच्या डाव्या अंगाला बांधलेली तळी होती. पटांगणात आलो तेव्हा, देवळाला खेटून असलेली अर्धचंद्राकार समुद्रवेला उन्हात तळपत होती. देवळाच्या समोरच चार दीपस्तंभ दिसले. त्यांची बांधणी मुस्लिम धर्तीच्या मनोऱ्यासारखी दिसली. पुन्हा पायऱ्या चढून आम्ही देवळाच्या चौकाशी गेलो. आत पाषाणी अष्टदलावर एक सुंदर, शुभ्र, संगमरवरी कूर्माकृती होती. तेथून पायरी चढून गर्भागाराच्या दरवाजाकडे गेलो. आत लिंगाची पूजा चालली होती. हे शिवलिंग जांभ्यादगडाचे आहे. देवळाची आतली बांधणी हेमाडपंती आहे.

दर्शन घेऊन आम्ही खालच्या चौकात आलो. देवळाला प्रदक्षिणा घातली. तेथे शिर तुटलेला एक निळ्या पाषाणाचा नंदी दिसला. त्याच्या रेषांवरून समुद्राचा हात कित्येक वर्षे फिरून गेला असावा असे वाटले. मग आम्ही कबर पहायला गेलो. वाटले होते, तिच्यावर हिरवी शाल पसरलेली असेल. उदबत्त्या जळत असतील. पण लोकांनी कबरीवर मंदिर बांधल्याचे दिसून आले. आतली कबर अगदी पांढरी शुभ्र होती. देवपूजा संपल्यावर तिच्यावर फुले पडणार होती.

हिंदु-मुस्लिम सख्याचे प्रतीक असे हे देऊळ मला जितके अपूर्व आणि पूजनीय वाटले, तितकीच ती अनामिक कबरही मला वंदनीय वाटली. मी तिला मनःपूर्वक हात जोडले आणि असला सख्य–समन्वय या देशात निरंतर वाढत राहो अशी प्रार्थना माझ्या अंतःकरणात मोहरून निघाली.

मी पहिला अभंग लिहिला तो वयाच्या नवव्या वर्षी. तो मी स्फूर्ती आली म्हणून लिहिला नव्हता, तर मार चुकविण्यासाठी लिहिला होता. रात्रीचे भजन सात पिढ्या आमच्या घरात चालत आले होते. ती धून तीन तीन तास चालायची. त्यात संतांची निवडक पदे असत. पण विशेष भरणा असे तो अभंगांचा. शब्द आणि स्वर यांची उपजत आवड असल्यामुळे आणि रोजच्या संथेमुळे अल्पवयातच ते मला मुखोद्गत झालेले होते. करड्या शिस्तीच्या माझ्या चुलत्यांनी मला आणि माझ्याच वयाच्या माझ्या चुलत भावाला एक परिपाठ लावून दिला होता. तो हा की रोजच्या भजनाच्या नित्य पाठानंतर, एक दिवस त्याने आणि दुसऱ्या दिवशी मी, संतांचे एकादे नवे पद वा अभंग पाठ करून म्हणावयाचे.

एकदा माझी पाळी असताना खेळाच्या नादात मला लावून दिलेल्या या शिस्तीचा विसर पडला. दिवस मावळला तेव्हा, एकाएकी मला माझी जोखीम आठवली. त्यावेळी चुलते सहलीला गेलेले होते. पुस्तकांचे कपाट बंद होते. त्यामुळे जिवाचा धडा करून मी स्वतःच एक अभंग रचला आणि तो चांगला आळवून आळवून तोंडपाठ केला. ‘ नामा म्हणे, ’ ‘ तुका म्हणे ’ या धर्तीवर शेवटच्या चरणात ‘ बाकी म्हणे ’ असे लिहायला मी विसरलो नाही. पण, तेच माझ्या आंगलट आले. भजनात घरच्या साऱ्याच मंडळींनी तो म्हणताना मला चांगली साथ दिली. पण ‘ बाकी म्हणे ’ असा शेवटचा चरण म्हणताना सगळ्यांचेच चेहरे गोरेमोरे झाले. भजन संपल्यावर चुलत्यांनी मला आपल्या अभ्यासिकेत बोलावून घेतले आणि मला समज दिली की, संतांच्या अभंगात स्वतःचे नाव घुसडणे पाप आहे. त्यांच्याच समक्ष दुसरा अभंग लिहून मीच तो लिहिला होता हे मी त्यांना तिथल्या तिथे पटवून दिले. ते हरखले आणि मोठ्या अभिमानाने मला आपल्या आईकडे, म्हणजे माझ्या आजीकडे घेऊन गेले. मी तिचा लाडका होतो. मला वाटले होते ती माझे कौतुक करील. पण, झाले उलटेच. तिने मला समज दिली, “ संत झाल्याशिवाय अभंग करायचा नसतो.

तू आईवडिलांचा थोरला मुलगा आहेस. तुला वंश चालवायचा आहे. त्यामुळे तुला तर संत होण्याचा मुळीच अधिकार नाही." इतके बोलूनच ती थांबली नाही तर, माझ्या हाती नारळ देऊन मला तिने घराच्या वास्तुदेवतेपुढे उभे केले. आणि माझ्याकडून भाक घेतली की, मी अभंग लिहिणार नाही.

मी अभंग लिहिला, याचा तिने असा धाक का घेतला ते आता समजते. माझे आजोबा देवलसी होते. ते नेहमी संतांच्या भजनी लागलेले असत. ज्या जगन्नाथ-बुवा बोरीकरांनी गोव्यात भजनी सप्ताह सार्वत्रिक केला, त्यांचा अनुग्रह त्यांनी घेतला होता. त्यांनी प्रसाद म्हणून दिलेल्या मुकुंदराजांच्या 'विवेकसिंधू'ची त्यांनी वर्षभर सतत पारायणे केली. या काळात कडक मौन पाळले. आणि टाकलेल्या संसारात पुन्हा लक्ष घातले नाही. विजरच्या जत्रेला कीर्तन ऐकत बसले असताना, पूर्वरंग संपल्यावर लघवीला म्हणून ते बाहेर गेले, ते भुईसपाट विहिरीत पडले. आणि तेथेच त्यांना जलसमाधी मिळाली. मीही सन्तसाहित्याच्या नादाने त्यांच्याच मार्गाने जाईन ही तिची विचारीची भीती होती.

ही घटना किती जुनी! पण मला तिची फार तीव्रतेने आठवण झाली. त्याला तसेच कारण आठ दिवसांमागे घडले. कसे कोण जाणे, एकामागून एक अभंग माझ्या ओठावर उमाळून येऊ लागले. मी माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे अभंग लिहून झाल्यावर पत्नीला तो गाऊन दाखवू लागलो. सुरवातीला तिने त्यांचे तोंड भरून कौतुक केले. म्हणाली, "हे तुमचे अभंग अगदी संतांच्या अभंगांसारखे वाट-तात!" पण लागोपाठ असे सात अभंग मी लिहिलेले पहाताच, माझ्या आजी-सारखीच तीही धास्तावली आणि कावरीबावरी होऊन मला म्हणाली, "तुम्ही संत व्हाल आणि संसार टाकून द्याल अशी मला भीती वाटू लागली आहे." तिच्या या उद्‌गारांनी मी खरोखरच चकित झालो. कारण मी संन्यास घेण्याच्या गोष्टी जेव्हा जेव्हा बोललो तेव्हा तेव्हा, तिने माझे बोलणे हसण्यावारी नेले होते आणि ती मला मिस्किलपणे म्हणाली होती, "संन्यास घेणे तुम्हांला कधीच जमणार नाही." पण यावेळी ती खरोखरच घाबरली होती. तिची समजूत घालण्यासाठी मी तिला म्हणालो, "संत झालेल्याने संसार टाकलाच पाहिजे असे नाही. आदर्श संसार करूनही नाथ संत झालेच ना! अंगात दैवताचा संचार झाल्यावर अडाणी माणूस-देखील देववाणी बोलू लागतो. अभंग लिहितानाच्या क्षणी माझ्याही अंगात संतत्वाचा संचार होत असेल. पण तेवढ्याने मी संत झालो असे ठरत नाही. त्यासाठी फार मोठे भाग्य लागते. अनंत जन्मांची पुण्याई लागते." अशा शब्दांनी मी पत्नीची भीती घालवली.

पण आतून मला एका गोष्टीचे समाधान झाले ते तिला माझे अभंग प्रत्ययाचे बोल वाटले याचे. पत्नीला जेव्हा असे मनोमन वाटते, तेव्हा खचित आपल्या

हाताला काही खास लागले आहे असे खुशाल समजावे. कारण नवरा कितीही मोठा असो तो त्याच्या बायकोला सोपाच वाटतो.

या घटनेला आठवडा होऊन गेला आणि कुमार गंधर्वांचा मला निरोप आला की, "सूरश्री केसरबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त आपल्या गायनाचा पणजीला कला अकादमीच्या सभागृहात कार्यक्रम व्हायचा आहे. तिकडे या. आपण नंतर तुमच्या सहवासात काही घटका घालवण्याचे ठरवले आहे." आम्ही दोघे एकमेकांचे स्नेही आणि चाहते. या खेपेला फार दिवसांनी पुन्हा एकमेकांना भेटणार होतो. आपापल्या आध्यात्मिक अनुभवांची देवाणघेवाण करणार होतो. काव्य काय, संगीत काय, आध्यात्मिक उपासनेचे मार्ग असल्यामुळे त्यांतून भावले, जाणवले त्याचे आदान-प्रदान करणार होतो.

त्यांच्या निरोपाप्रमाणे मी त्यांचा कार्यक्रम सुरू होण्याच्या काही मिनिटे आधीच सभागृहात हजर झालो. कार्यक्रम सुरू होण्याच्या आधी त्यांना भेटूनही घेतले. त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यावर पूर्वीचीच कोवळीक आढळली. पण अनुभवाला आलेल्या तापत्रयामुळे त्यांच्या केसांवरून काळाचा पांढरा कुंचला फिरलेला होता. त्यांनी गाण्याला प्रारंभ केला तेव्हा, ते गानसमाधीत शिरत आहेत आणि त्यासाठी हलक्या सुरांनी अनाहत नादाला आवाहन करीत आहेत, गोंजारून त्याला जागवीत आहेत असे मला वाटले. त्यांची धून तापत चालली तशी त्यांची गायनकळा मधल्या कालावधीत केवढी परिपक्व झाली आहे याचा मला अंदाज आला.

ठरल्याप्रमाणे त्याच दिवशी संध्याकाळी सहाच्या सुमाराला ते आपल्या व माझ्या तीन स्नेह्यांना घेऊन माझ्याकडे आले. गप्पा सुरू झाल्या त्याच मुळी निर्मितीच्या अंगाने. मग मी त्यांना म्हणालो, "आज तुमच्या ठेवणीतल्या काही चिजा ऐकायच्या आहेत." त्यांना माझी आवड माहीत. ते मला म्हणाले, "तुम्हांला खास इथे कुणी न ऐकलेले असे निर्गुणी संगीत म्हणून दाखवितो." साथ नव्हती. तरीही संगीताची एक आगळी दुनिया त्यांनी निर्माण केली.

मग मला त्यांनी माझी नवी-जुनी कविता म्हणण्याचा आग्रह केला. धीर करून मी माझे नवे अभंग गाऊ लागलो. ते आणि त्यांचे जाणकार स्नेही उत्स्फूर्त दाद देऊ लागले. मग त्यांनी त्यातले तीन अभंग माझ्याकडून लिहून घेतले. आणि मला म्हणाले, "उद्या सकाळी मी माझी माणसे पाठवून तुमच्या आवाजात हेच रेकॉर्ड करवून घेईन. यांचे हक्क कुणाला देऊ नका. मला ते बैठकीत गायचे आहेत. त्यांचा बाज तुमचाच असेल. त्याच्यावरची करामत तेवढी माझी असेल." त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची मंडळी अभंग रेकॉर्ड करून निघून गेली. एका आगळ्या धन्यतेने माझे मन भरून निघाले. कधीतरी कुमारांच्या कंठस्पर्शाने सजीव झालेले ते अभंग तुमच्या कानावर पडतीलही. एक बरे आहे, त्यात 'बाकी म्हणे' हा उल्लेख नाही; त्यातच त्या अभंगांची कृतार्थता आहे. ❋

सकाळची वेळ आहे. सारा आसमंत विलक्षण शांत आहे आणि कुठेतरी जवळ-पास ' सुंदर ते ध्यान ' हा तुकारामाचा सुंदर अभंग आळवला जात आहे. बहुतेक ती रेकॉर्डच असावी. आवाज विलक्षण सुरेल आणि आर्त होता. मी एकदम अंतर्मुख झालो. वस्तुतः हा अभंग मी लहानपणापासून ऐकत आलो आहे. घरच्या नित्याच्या भजनात मी तो असंख्य वेळा आळवला आहे. त्यातला विठ्ठल मी पंढरपूरला प्रत्यक्ष पाहिलेला आहे. शिल्पसौंदर्यात त्याची ही मूर्ती लोकविलक्षण आहे, असे काही म्हणता येणार नाही. पण या अभंगातल्या तुकारामाच्या उत्कट भक्तीने न्हाऊन निघाल्यामुळे ती मला नेहमीच अतीव सुन्दर वाटत आली आहे.

विठ्ठलाची आणि माझी पहिली ओळख याच अभंगाने करून दिली. मराठी संतांनी आई मानलेला हाच एक देव. त्यांच्या लेखी तो आईच होतो असे नाही, तो त्यांचा सवंगडीही होतो. त्यांनी त्याला विठू म्हटले तर तो फुरंगटून बसत नाही. चिडून विठ्या म्हटले तर रागावण्याऐवजी गालातल्या गालात हसत रहातो. भक्त मंडळी त अगदी माणूस होऊन वावरणारा याच्यासारखा देव दुसरा नाही. छोट्या नाम्याच्या हातून हा दूधभात जेवला. नाथावरी कावडी वाहून त्याने त्यांचे रांजण भरले. दामाजी संकटात सापडला तेव्हा विठू महार होऊन याने त्याची हुंडी पटवली. मोमीन असलेल्या कबीराचे शेले विणले. चोखयाची ढोरे ओढली. जनीसारख्या दासीची धुणी धुतली. प्रसंगी तेल माखून तिच्या उवाही मारल्या असतील. कसलेच सोवळे-ओवळे वा जातपात न मानणारा हा देव, मला भलताच आवडायचा. खारव्या-कुळवाड्यात त्याचे विशेष कौतुक. आमच्या गावचे त्यांतले कितीतरी आषाढीच्या वारीला पंढरपूरला जात.

त्याच्या रखुमाईचे कौतुक मराठी साहित्यात मी फारसे वाचलेले नाही. पण एका कोकणी लोकगीतात तिला आपल्याकडल्या तांबड्या भाजीचे डोहाळे लागल्याचे अगदी साग्रसंगीत वर्णन आहे. आपल्याकडच्या कुळवाडणी ही भाजी खुडतात.

---

## सुंदर ते ध्यान

---

तिच्या चुड्या बांधतात आणि टोपलीत घालून त्या पंढरपूरला नेतात. कशासाठी? तर गर्भार रखमाईचा डोहळा भागवण्यासाठी. तिला दिवस गेल्याची आणि डहळा लागल्याची ही गुप्त आणि नाजूक बातमी या बायांना लागली कशी? ती त्यांच्यापैकी एकादीच्या कानी लागल्याशिवाय खास नव्हे आणि गोव्याची ही तांबडी भाजी तिने आधी केव्हातरी खाल्लेली असल्याशिवाय तिला तिचे असे डोहाळे कसे लागतील? त्यामुळे ही विठ्ठल रखुमाई आपलीच असे मला वाटायचे.

त्यांच्याविषयी लहानपणी माझ्यात अशी रुजलेली भक्ती कशी आतल्या आत बळावत गेली याची मला कल्पना नव्हती. पण एका प्रसंगाने मला ती अचानक आली. दिल्लीचा प्रवास करून पुण्याला परतताना मथुरेला एकाद्या दिवसाचा मुक्काम करावा आणि तिथल्या बालाजीचे दर्शन घ्यावे असे माझ्या मनात आले. मंदिराशी पोचेपर्यंत दुपारचे बारा वाजून गेले होते. दर्शनाला पोचलो तेव्हा पुजाऱ्याने सांगितले की, देव झोपी गेले आहेत. चार वाजता या. एवढे तास कसे घालवावे, समजेना. म्हणून दुकानांच्या दुतर्फा आंगडीतून मी फेरफटका करू लागलो. इतक्यात कुठल्या तरी दुकानात 'सुंदर ते ध्यान' ही रेकॉर्ड लागली. तिचे शब्द कानी पडताच माझ्या अंगभर हर्षाचे रोमांच उभे राहिले. कित्येक दिवसांत मराठी कानावर पडले न हते. मी जागच्या जागी खिळल्यासारखा झालो आणि अभंग थांबला तेव्हाच भानावर आलो.

कशी कोण जाणे, माझी मनोमन भावना झाली की, या सुंदर ते ध्यानामधली विठ्ठलमूर्ती मला इथे कुठे तरी मिळणार आहे. मी प्रत्येक दुकानात शिरून तिची चौकशी करू लागलो. अनेकांनी रांगत्या बाळकृष्णाच्या पितळी मूर्ती मला दाखवल्या. त्या होत्याही अगदीच आधुनिक. शेवटी एका दुकानदाराने तिथल्याच एका मूर्तिसंग्रह करणाऱ्या माणसाचा मला पत्ता दिला आणि हव्या असलेल्या मूर्तींची वास्तपुस्त करायला सांगितले. पत्ता नीट असल्यामुळे घर चटकन सापडले पण मालक घरी नव्हते. घरी असलेला त्यांचा मुलगा म्हणाला, ते आपले प्रदर्शन घेऊन दिल्लीला गेले आहेत. त्याने आस्थेने माझी चौकशी केली. मी म्हणालो, "मी कवी बोरकर. महाराष्ट्रातून आलो आहे." हे ऐकून तो भलताच सुखावलेला दिसला. धावत घरात जाऊन त्याने एक मराठी वेच्यांचा संग्रह माझ्यापुढे करीत मला हिंदीत विचारले, "ही तुमचीच कविता ना? ही कविता आम्हांला लावलेल्या वेच्यांत आहे. मी इंटर आर्ट्सला आहे." ती पाहून मी सुखावलो. तो तर माझ्या रूपात गंगाच घरात आली अशा आनंदात होता. पुढे म्हणाला, "तुम्हांला विन्मुख पाठवणे मला शक्य नाही. ज्या थोड्या मूर्ती आहेत त्या तुम्ही पाहून घ्या आणि त्यात तुम्हाला हवी असलेली मूर्ती दिसते का बघा." मी त्याची उघडी कपाटे हिंडून पाहिली. त्यांत विठ्ठलाची एक तांब्याची मूर्ती, एक नागवेढा असलेले पितळी शिवलिंग

आणि रजपूत कुसरीचे एक लांबट गोल ताट अशा तीन वस्तू मला फार आकर्षक वाटल्या. मी त्याला विचारले, "या तीन वस्तू तुम्ही मला विकत देऊ शकता काय?" तो म्हणाला, "विकत नाही पण माझी भेट म्हणून या तुम्ही नेऊ शकता." फुकट न्यायला माझे मन घेईना.

शेवटी मला परवडेल ती रक्कम देऊन मी त्या न्यायाधीशी आमच्यात तडजोड झाली. तांब्याच्या विठ्ठल मूर्तीवरच्या निळसर गंजावरून तिचे शतकांचे पुराणेपण स्पष्ट दिसत होते. ती बारकाईने पाहिल्यावर पंढरपूरच्या विठ्ठलाच्या अंगावरील सर्व लक्षणांनी ती संपन्न दिसली. मला परमानंद वाटला.

अशा अकल्पितपणे हाती आलेल्या या मूर्तीचा काही खास संकेत असावा असेही वाटले. तिला मजकडून नित्य पूजा तर हवी नसेल ना? असेही मनात आले. माझ्या पायाला तर तेव्हा भिंगरी नित्याचीच लागलेली असे. मी विचारात पडलो, आता काय करावे? पण याचे उत्तर मला लगेच सापडले. माझे थोरले जावई हे आयंगारातले दोरेस्वामी, वीरवैष्णवांतले पिढीजात आचार्य पुरुष, तेव्हा त्यांच्या हाती ही सोपवली की, तिची पूजाअर्चा नेमनिष्ठेने होईल आणि मी निश्चित होईन हा विचार माझ्या मनात सुस्थिर झाला. पुण्याला परतलो तेव्हा, मूर्तीच्या लाभाची अकल्पित घटना सांगून मी ती त्यांच्या हवाली केली. त्यांच्या देव्हाऱ्यातला तिच्या प्रतिष्ठापनेचा सोहळा डोळे भरून पाहून तिचा प्रसादही सेवन केला.

पुढे एकदा रात्रीच्या वेळी विद्युद्दीपांच्या प्रकाशात तीच मूर्ती मला षोडशोपचार पूजेने नटलेली दिसली. कित्येक महिन्यांच्या नित्याच्या घासण्यापुसण्यामुळे ती आरणी कांतीने तळपत होती. विठ्ठलाची ही राजबिंडी एकाकी मूर्ती पाहून त्याच्या शेजारी रखुमाईची मूर्ती असायला हवी होती असे मला तीव्रतेने वाटले. आणि तेव्हापासून तशा मूर्तीचा माझ्या मनाने ध्यासच घेतला. पण अशा जुन्या मूर्ती विकत थोड्याच मिळतात! तरीही अशाच एका योगायोगाने ती आपल्या पायांनी चालून माझ्या हाती येईल असे मात्र मला सतत वाटत राहिले. आणि झालेही तसेच.

विठ्ठलमूर्तीच्या आगमनानंतर सुमारे तीन वर्षांनी असेल. एका निमित्ताने माझ्या एका स्नेह्याबरोबर मी हरिद्वारला गेलो. येथील घाटावर स्नान करून ईश्वरस्मरण उरकल्यावर मी विश्रब्धपणे फेरफटका करताना इथे कुठे रखुमाईची मूर्ती मिळेल का असा प्रश्न माझ्या मनात विजेसारखा चमकून गेला. आम्हाला भटकण्यापलीकडे काम असे मुळीच नव्हते. मी माझ्या स्नेह्याला म्हणालो, "इथल्या पेठा थोड्या हिंडून येऊ या का?" त्याने लगेच होकार भरला. आणि त्याला बरोबर घेऊन प्रत्येक भांड्याच्या दुकानात मला हव्या असलेल्या रखुमाईच्या मूर्तीची मी चौकशी करू लागलो. मला वाटते, भांड्याच्या दुकानात मूर्ती शोधणाऱ्या मला त्यांच्या बहुतेक

मालकांनी वेड्यातच काढले असावे. पण त्यातला एक स्नेहल निघाला. तो मला म्हणाला, " दक्षिणेतले जे लोक इथे आपले व्रत उजवायला येतात, ते एखादी मूर्ती गंगेला अर्पण करून जातात. आणि मग पट्टीची पोहणारी मुले, त्या शोधून काढतात आणि मोडीच्या भावाने आमच्यासारख्याला विकतात. " एवढे सांगून दुकानातल्या पोऱ्याला त्याने हाक मारली. ज्या भांड्यात अशा मूर्ती साठवून ठेवल्या होत्या ते मागवले आणि ते माझ्या पुढे करून तो म्हणाला, " बघा तुमची मूर्ती यात सापडते का ! " आणि थोड्याच वेळात ती मला खरोखरच सापडली. तांब्याचीच. ठेंगणी ठुसकी, सुंदर आणि आकर्षक बांध्याची. अवघ्या पाच रुपयांत दुकानदाराने ती मला देऊन टाकली. आज ती मुलीकडच्या विठ्ठलाच्या जोडीने उभी आहे. जेव्हा जेव्हा त्यांचे मला दर्शन घडते, तेव्हा त्यांचे लग्न लावल्याचा मला आनंद होतो.

*

ज्यांचा निकट परिचय आणि अनुग्रह मला भाग्याने लाभला असे पहिले थोर साहित्यिक म्हणजे भाई देसाई. लेखक म्हणून ते सिद्धहस्त तर होतेच, शिवाय ते विलक्षण संभाषणचतुर, बहुश्रुत आणि जीवनरसज्ञ होते. संतसाहित्याचा त्यांचा व्यासंग गाढा होता. माणसांचे स्वभावनाट्य आणि आध्यात्मिक अनुभव यांच्याबद्दल ते बोलू लागले की, त्यांच्या रसवंतीला आगळाच फुलोरा येई. पावलोपावली सुभाषितांची फुले झडू लागत. 'दिसामाजिं कांहींतरी तें लिहावें' या विषयी बोलताना ते मला म्हणाले. गाता गळा, शिंपता मळा आणि लिहिता हातवळा. मूळ म्हणीला लिहिता हातवळा ही त्यांनी जोडलेली स्वतःची पुस्ती. त्यांनी मला पोरवयात दिलेला हा इशारा मी सातत्याने पाळीत आलो आणि त्याचमुळे लेखक म्हणून या उतारवयातही मी ताजातवाना राहिलो आहे.

आपण लिहू ते अमर साहित्य व्हायला हवे असा आदर्श होतकरू लेखकाने अवश्य बाळगावा. पण तशा तोलाच्या काही सुचेपर्यंत मी लेखणी हातात घेणारच नाही असे तो म्हणू लागला तर, तो लेखक कधीच होऊ शकणार नाही. अशा या अवास्तव आग्रहामुळे साहित्यक्षमता असूनही वाया गेलेले काही स्नेही मला माहीत आहेत.

माझ्या लोभातली काही मुले-मुली आपल्याकडून चांगली साहित्य निर्मिती व्हावी म्हणून धडपडत असतात. त्यांच्या लेखनांतले दोष दाखवण्यापेक्षा त्यांना उत्तेजन देण्याकडे माझा कल आहे. सतत लिहीत राहिल्याने त्यांचे दोष यथाकाळ मावळत जातील आणि त्यांचे अनुभव साहित्यरूप घेता घेता त्यांना आपले सर्जनसामर्थ्य उमगत जाईल हे स्वानुभवावरून मला माहीत असते. अशाच एका होतकरू कवयित्रीकडे गेलो असताना ध्वनिक्षेपित झालेल्या आपल्या पहिल्यावहिल्या संगीतिकेची टेप तिने मला वाजवून दाखविली. मी तिला त्या वेळी वर्षाभऱ्याने भेटलो होतो. एवढ्या अवधीत तिने लेखनकलेत केलेली ही प्रगती विस्मयकारक होती. श्रोत्यांत

तिचा नवरा, सासू आणि तिचे स्नेहीदांपत्य होते. विनम्रपणे ती मला म्हणाली, " मी ही संगीतिका लिहिली खरी. पण नेहमीच काही नवे लिहायला घेताना मी भेदरलेली असते. माझ्या सारखीला खरी लेखनसिद्धी कधी लाभणारच नाही काय? मला या बाबतीत काही मार्गदर्शन करा ना." मी तिला धीर देत भाईंची ती म्हण सांगितली. आणि म्हटले, लिहिता हातवळा याचा प्रत्यय तुला आलाच आहे. म्हणून तर एक चांगली एकांकिका लिहिण्याइतपत आज तुझी प्रगती झालेली आहे.

" अहो पण माझे शिक्षण बेताचे. व्यासंगही मामुली. आणि प्रतिभेबद्दल म्हणाल तर, फार तर ती तिळाएवढी असेल."

यश आणि प्रसिद्धी यांची पहिली चव मिळाली असतानाही ही मुलगी आतून जागी आहे. पुढची वाटचाल करायला उत्सुक आहे, विनम्र आहे. ही तिची लक्षणे पाहून मी प्रसन्न झालो. आणि तिला शाबासकी देऊन म्हणालो, " अग्नीला कधी लहान म्हणू नये. त्याला आपण सतत फुंकर घालीत राहिलो आणि नेमाने इंधन पुरवीत गेलो तर तो गगनालाही भिडू शकतो. प्रतिभेचेही असेच आहे. तिला अग्नीप्रमाणे जपले पाहिजे आणि तिचे अग्निहोत्र पडेल ती किंमत मोजून सातत्याने चालवले पाहिजे. पण त्यासाठी तिच्यावर आपले नितांत प्रेम असावे लागते. तिचा निदिध्यास धरावा लागतो. तिच्या उपासनेच्या आड येणारे आतले वा बाहेरचे सर्व विक्षेप कटाक्षाने टाळावे लागतात आणि तिच्या विकासाला जे जे काही पोषक असेल त्याचा आस्थेने अवलंब करावा लागतो. ही एक प्रकारची व्रतस्थताच आहे. तिची हेळसांड केल्यामुळे प्रतिभेचे चांगले देणे उपजत लाभले असतानाही पाचदहा वर्षांतच विझलेले लेखक मला माहीत आहेत."

यावर ती मला म्हणाली, " आपले हे मार्गदर्शन नीट अंगी बाणवून घेता यावे यासाठी पाळावयाची काही पथ्ये मला सांगाल का?" मी तिला म्हणालो, " पहिले पथ्य हे की, आपले कान-डोळे नेहमी उघडे असावे. सामान्यपणे आपण सगळेच दिवसभर स्वतःच्या सुख-दुःखात इतके गुरफटलेले असतो, की आपले कान-डोळे उघडे नसतात. ते तसे उघडे ठेवायचे असतील तर, मनाला तटस्थतेचे वळण लावायला हवे. पण ही तटस्थता म्हणजे अनास्था नव्हे. जीवन स्वतःचे असो किंवा दुसऱ्या कुणाचे असो, त्याच्याविषयी आपल्याला अदम्य आस्था असायला हवी. ही आस्था म्हणजेच ज्ञानाची लालसा. ती असावी, पण जो आस्थेचा विषय असेल त्यात आपण गुंतता कामा नये. जीवन जगत असताना नानाविध मनस्तरंग आपल्या अंतर्यामी उठत असतात. ते बरे असोत की, वाईट असोत. त्यांचे समर्थन किंवा अधिक्षेप करावयाचा नाही. प्रयोगशाळेत एखादा प्रयोग चालला असताना ज्या साक्षित्वाने आपण त्याची नोंद घेतो, त्याच्या बरेवाईटपणाचा कस लावण्याच्या

भानगडीत पडत नाही. अगदी तशी भूमिका आपण धारण करायची. ही गोष्ट सोपी नाही, पण सरावाने ती अंगवळणी पडत जाते. आपल्या मनाच्या या जागरूक निरीक्षणाला बुद्धाने विपश्यना म्हटले आहे. माणसाचा आपल्या मनाशी असा अहर्निश संबंध असतो, तसाच आपल्या भोवतालच्या बाह्य जगाशीही असतो. तेव्हा त्याच्याशी वागताना आपल्या आंतरिक साधनेत विक्षेप येणार नाही अशी एक निर्मळ, निरागस वृत्ती आपण आपल्या ठिकाणी बाणवायला हवी. ती जगवायची असेल आणि आपल्या जीवनात सुस्थिर व्हायची असेल तर, बुद्धाने सांगितलेल्या चारही विहारांत आपल्याला सारख्याच सहजतेने वावरता आले पाहिजे."

"कोणते बरे हे चार विहार?" तिने अधीर होऊन विचारले.

"हे चार विहार म्हणजे, मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा."

"याचे नेमके अर्थ?"

"कुणाच्याही सुखाने सुखावणे ही मैत्री. कुणाच्याही दुःखाने दुखावणे आणि त्याचा निरास करण्यासाठी धडपडल्याशिवाय जिवाला चैन न पडणे ही करुणा. एखाद्याच्या हातून सत्कृत्य घडल्याचे कळताच प्रमुदित होणे ही मुदिता आणि एखाद्याकडून एखादे अपकृत्य घडल्याचे कानावर येताच त्याच्याकडे काणाडोळा करणे ही उपेक्षा."

"आपण सांगितलेले पहिले तीनही विहार कुणालाही सहज पटण्यासारखे आहेत. पण अपकृत्याकडे काणाडोळा करणे कसे शक्य आहे?" त्या मुलीने काहीसे गोंधळून विचारले. यावर मी म्हणालो,

"ज्याने आपल्या मनाची डोळ्यांत तेल घालून विपश्यना केलेली असेल त्याला आपल्या मनाची ओळख घेता येते. मानवी मनाचीही ओळख झालेली असते. त्यामुळे प्रमादाची प्रक्रिया तो जाणतो. मूल चालताना पडते पण पडता पडता ते चालायला शिकते. माणसाचेही तसेच आहे हे तो जाणतो. म्हणून माणसाच्या अपकृत्यावरून तो त्याच्या ठिकाणच्या मांगल्यावरचा आपला विश्वास ढळू देत नाही."

हा विचार ऐकून ती थोडी अंतर्मुख झाली आणि मग म्हणाली, "या मौलिक गोष्टी आहेत हे मला पटते. पण प्रतिभेचा वही जागता रहावा यासाठी रोज काय करायला हवे?"

"चिंतनशील माणसाला रोज काही ना काही सुचत असते. अशा वेळी लिहायला फुरसत असतेच असे नाही, पण आपल्या वहीत त्याचे टाचण करावे,

त्याच्या संबंधी काही लिहिण्यापूर्वी त्याविषयी जितके अभ्यासता येईल तेवढे अभ्यासावे, स्फूर्ती आपल्या हातची नसते म्हणून थोर लेखक-कवींचे निवडक साहित्य सतत वाचीत असावे, लेखनाला अवश्य असलेले मूलद्रव्य माणसांच्या जीवनातच असते. मग ती निरक्षर का असेनात. आपल्याला त्यांच्याविषयी आस्था असते तेव्हा, ती आपले जीवनानुभव आपल्याला सांगत जातात.

" साहित्याचे मूलधन हेच आहे हे आपण ओळखले तर, कान, मन उघडे ठेवून आपण ते अनुभव ऐकून घेऊ आणि सहानुभूतीने ते आपलेसे करू. प्रत्येक माणसाने आपण भोगले-सोसलेले जीवन न नटवता सांगितले, तर एक अद्वितीय पुस्तक तो सहज लिहू शकेल. असे एका नामवंत साहित्यिकाने म्हटले आहे. आणि ते सोळा आणे खरे आहे याविषयी मला यत्किंचितही शंका नाही. "

गोळ्यांचा कमाल डोस घेऊनही माझ्या रक्तातले साखरेचे प्रमाण खाली उतरत नाही हा माझ्या आप्तेष्टांच्या दृष्टीने एक चिंतेचा विषय होता. मी स्वभावतःच नादिष्ट आणि छांदिष्ट असल्यामुळे नेमनिष्ठेने आणि वेळच्यावेळी पथ्योपचार पाळणे मला जमत नाही. मी आपल्या माझ्याच नादात पारध्यासारखा घुमत असतो. या घुमण्यात खंड पडू लागला की, आपले आरोग्य ठीक नाही हे मला उमगते आणि सावध होऊन मी पथ्यपाणी सांभाळू लागतो. स्वतःच्या आरोग्याविषयीची माझी ही हयगय पाहून माझे कविमित्र पाडगावकर चिडले, आणि सगळ्या टेस्टस् करून घेण्यासाठी पुण्याहून मला आपल्याकडे मुंबईला घेऊन गेले.

तपासण्यात साखर आणि कोलॅस्टेरॉल ही द्रव्ये भलतीच वाढल्याचे दिसून आले, त्यांच्याकडून हे वर्तमान कळताच माझे मित्र डॉ. सखाराम मला आपल्या उपचार-केंद्रात घेऊन गेले. ख्यातनाम मधुमेहतज्ज्ञाला फोन करून त्यांनी बोलावले. आम्हा उभयतांचे स्नेही असलेले तीन डॉक्टर माझी वास्तपुस्त करायला आलेले होते. त्यांचे माझे बोलणे चाललेले असतानाच, बोलावलेले डॉक्टर महाशय माझ्या खोलीत आले. पथ्यपाण्याच्या बाबतीत ते फार आग्रही आहेत हा त्यांचा लौकिक मला ऐकून माहीत होता त्यामुळे मी जरा धाकधुकीतच होतो. डॉक्टरांचा चेहरा–मोहरा एकंदरीत गंभीरच होता. पण खोलीत प्रवेश करताच ते स्मितपूर्वक मला म्हणाले, "तुमची 'चांदण वेल' वाचीत बसलो होतो तोच फोन आला आणि मी इथे यायला निघालो" त्यांच्या या अनपेक्षित उद्‌गारांनी मला थोडा धीर आला. ते सांगतील ती सर्व पथ्ये मी कटाक्षाने पाळणार होतो. पण सिग्रेट एकदम वर्ज्य असे काही भयानक त्यांनी सांगितले तर माझी पंचाईत होणार होती. त्यामुळे माझे लेखन तर अडणार होतेच. शिवाय माझ्या पिंडाला सतत पन्नास वर्षे जडलेली सवय एकाएकी तोडल्याने माझ्या चयापचयाला आकस्मिक धक्का बसला असता, आणि आजारापेक्षाही पथ्य अधिक तापदायक झाले असते. ही आपत्ती कशी टाळावी याचा मी विचार करू लागलो आणि एकदम मला शेषाच्या आजाराची जुनी गोष्ट आठवली.

---

## शेषाचा आजार

---

डॉक्टरांनी बारकाईने सर्व तपासणी केली. तपशिलाचे प्रश्न विचारून झाले. इन्सुलिन टोचून घेतल्याशिवाय यापुढे निर्वाह नाही असा निर्णय दिला आणि म्हणाले, 'डोस लवकरच निश्चित करू.' आता ते पथ्य सांगणार हे मला स्पष्ट दिसत होते. तेव्हा आणखी वेळ न दवडता मी त्यांना म्हणालो, "तुम्हाला सवड असेल तर तुम्हाला मी एक गोष्ट सांगू इच्छितो, सगळ्याच डॉक्टरांनी ती ध्यानात ठेवण्या-सारखी आहे!" डॉक्टर महाशयांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करण्याआधीच उपस्थित डॉक्टरांनी 'सांगा, सांगा' असा आग्रह चालवला, आणि पडत्या फळाची आज्ञा घेऊन मी ती सांगू लागलो. गोष्ट अशी : 'कधी नव्हे तो शेष एकदा आजारी झाला. आपल्या डोक्यावर पृथ्वी आहे, ती चळता कामा नये, आणि आपल्या शरीराच्या बिछान्यावर जो भगवान अनंतशयन विसावला आहे, त्याचे निद्रासन डळमळता कामा नये याचे अविरत भान त्याला होतेच. पण आजारामुळे तो क्वचित पेंगायचा. तर क्वचित अंगाला पिळे द्यायचा. सर्वज्ञ श्री विष्णूंना त्याची ही अस्वस्थता लगेच जाणवली आणि तो आजारी आहे हे कळताच त्यांनी धन्वंतरीला बोलावणे पाठविले. तो लगेच आला. श्री विष्णूने शेषाच्या आजाराची गोष्ट त्याच्या कानावर घातली आणि त्याचे योग्य निदान करून त्याला अवश्य तो औषधोपचार करायला फर्मावले. त्याने त्याच्या आजाराची सर्व लक्षणे बारकाईने पाहून आपल्या परीने निदान केले आणि औषधोपचार सुरू केले. पण एक सप्तक ओलांडले तरी, शेषाला तिळाचाही गुण पडेना.

धन्वंतरी मनात चांगलाच गडबडून गेला. सर्व देव काळजीत पडले. त्यांनी सुचवले की, वैद्यक शास्त्रातले निष्णात असे जे आश्विनीकुमार, त्यांचा सल्ला घ्यावा. धन्वंतरीने त्यांना आपल्या उपाययोजनेची इत्थंभूत माहिती दिली. त्यांना तिच्यात कसलीच खोड दिसली नाही. शेष तर सारखा वाळत चालला होता. त्यामुळे धन्वंतरीप्रमाणेच उभय आश्विनीकुमारही चिंताग्रस्त झाले. पुढे वाट कशी काढावी यावर त्यांची चर्चा सुरू झाली. पण रामबाण उपाय कुणालाच सुचेना.

अशा निकराच्या वेळीच हातातील महती वीणा छेडीत देवर्षी नारद तिथे प्रगट झाले. तिघांच्याही सचिंत मुद्रा पाहून त्यांनी "प्रकार काय?" अशी पृच्छा केली आणि सर्व हकीकत कळल्यावर ते त्यांना म्हणाले, "नुकताच मी पृथ्वीपर्यटन करून आलो आहे. तीर्थाटन करण्यासाठी बरेच दिवस भारतवर्षात होतो. तेथे सुश्रुत नावाचा दिगंतकीर्ती भिषगवर्य आहे. देवलोकात आजार क्वचित. उलट मृत्युलोकात त्याचे प्राबल्य विशेष, त्यामुळे तेथील भिषगवरांच्या गाठीला अनुभव जास्त. सुश्रुत हा तर त्यांचा शिरोमणी, तेव्हा त्याचा सल्ला घेणे मला सर्वतोपरी इष्ट वाटते.

ऐन अडचणीच्या वेळी लाभलेला नारदाचा हा अमूल्य सल्ला तिघांनाही एकदम पसंत पडला. आणि स्वतः धन्वंतरीने सुश्रुताची गाठ घेऊन त्याचा सल्ला मिळवावा असे ठरून, बैठक समाप्त झाली.

त्याप्रमाणे पक्ष्याचे रूप घेऊन धन्वंतरी सुश्रुताच्या आश्रमाकडे रवाना झाला. तो तिथे पोचला तेव्हा, आश्रमाच्या आवारातील वृक्षवाटिकेत दीक्षान्त समारंभ चालू झाला होता. आणि वैद्यर्षी सुश्रुत शिष्यांना उद्देशून आपले दीक्षान्त भाषण करीत होते. त्यात व्यत्यय येऊ नये म्हणून एका आम्रवृक्षाच्या शाखेवर पक्षीरूपातला धन्वंतरी बसून राहिला. भाषणाचा समारोप करताना सुश्रुत म्हणाले, "वत्सांनो, मला अवगत असलेली सर्व विद्या मी तुम्हाला दिली आहे. रोगाची लक्षणे कशी हेरावी, निदान कसे करावे, औषधे कशी योजावी, पथ्ये-अनुपाने कोणती असावी हे सर्व तुम्ही चांगले पढला आहात. पण एवढे पुरेसे नाही. ज्या रोग्यांवर तुम्ही उपचार करणार आहा, त्यांचा पिंड नेमका ओळखून ते तुम्ही करायला हवेत. अर्थात रोग्याचा स्वभाव ओळखण्याचे काम तुमचे तुम्हांलाच करावे लागेल. निरीक्षण, कल्पकता आणि सहृदयता ही तुमच्या ठिकाणी जितकी अधिक असतील, तितके तुमचे यश अधिक हे पक्के ध्यानात असू द्या.

समारंभ संपला आणि गुरूचे पदवंदन करून, शिष्य मार्गस्थ झाले. तेव्हा धन्वंतरी मनुष्यरूपाने सुश्रुतासमोर प्रगट झाला आणि त्याने आपली अडचण त्यांच्यासमोर मांडून म्हटले, "माझ्या औषधोपचारात काही चुकले, का?" तेव्हा ते म्हणाले, "तुमचे निदान आणि उपचार शंभर टक्के बरोबर आहेत. फक्त औषध पाजताना शेषाचे डोळे चांगले गच्च बांधा!" यावर विस्मयचकित होऊन धन्वंतरीने विचारले, "डोळ्यांचा आणि औषधाचा काय संबंध?" सुश्रुत हसले आणि म्हणाले, "अहो, शेषाची दृष्टी औषधावर पडली की, तिच्यातले विष त्या औषधात शिरते आणि ते गुण देऊ शकत नाही!" सुश्रुताचा हा सल्ला फलदायी ठरला, हे सुज्ञास सांगणे नलगे.' ही गोष्ट सांगून मी डॉक्टर महाशयांना म्हणालो, "तुम्हाला ही गोष्ट मी अशासाठी सांगितली की, तुम्हाला एका कवीवर उपचार करायचे आहेत हे तुमच्या ध्यानी असावे!"

यावर डॉक्टर महाशयांनी मला विचारले, "यातला मतलब?"

तेव्हा मी म्हणालो, "माझ्या दुखण्याला धूम्रपान घातक आहे हे मी जाणतो. म्हणून दिवसा वीस सिग्रेटींचे प्रमाण मी आता दहावर आणले आहे. त्यांच्याशिवाय माझी लेखणी चालत नाही. सिग्रेट सोडली तर माझा मूडच जातो आणि चयापचयही बिघडतो."

डॉक्टरमहाशय ओठांतल्या ओठांत हसले आणि म्हणाले, "आता दहांचे प्रमाण सातांवर आणून पहा!" ते निघून गेल्यावर आम्ही सारेच मनापासून हसलो. मला तर वाटले, सांगितलेल्या गोष्टीचे सार्थक झाले!

*

आपले बहुतेक स्नेही, सोय, सोयरीक, सहवास किंवा सक्ती अशांपैकी कोणत्या तरी संबंधातून उगवलेले असतात. पण, काही विरळा स्नेह असे असतात की, जे माणसांमधल्या परस्पर चुंबकत्वातून सहजपणे उगवतात आणि सतत वाढतही राहतात. ते जोपासावे लागत नाहीत. त्यांना खतपाणी घालावे लागत नाही. वारंवार भेटीगाठी घ्याव्या लागत नाहीत. पत्रद्वारे एकमेकांची चौकशीही करावी लागत नाही. कोणत्या तरी अदृश्य अमृतमात्रेने ते शांतपणाने गाढावत असतात; तसेच गोडावतही असतात. असल्या निर्मळ, निरागस स्नेहाला समान स्वभाव, समान वय, समान लिंग, समान पेशा, समान दर्जा असले काहीही लागत नाही.

कविवर्य द. रा. बेंद्रे यांचा-माझा स्नेह या जातीचा होता. मी धारवाडला सत्तावीस साली मॅट्रिकला होतो. तेव्हा कवी म्हणून त्यांचे कर्नाटकात चांगलेच नाव झाले होते. ते धारवाडातच रहात. माणसांचे चहाते असा त्यांचा लौकिकही होता. त्यांना भेटायला गेलो असतो तर, तेव्हाच आमचा स्नेह जमून गेला असता, पण मला ते सुचलेच नाही.

या गोष्टीला वीस वर्षे उलटली. आणि परिस्थितीप्राप्त मला पुण्याला बिऱ्हाड करावे लागले. तिथले इंटरनॅशनल दीक्षित म्हणून प्रसिद्ध असलेल्या विठ्ठलरावांचे ग्रंथभांडार हा सुविद्य ग्राहकांचा अड्डाच होता. तेथे निवडक पुस्तके खरेदी करण्यासाठी दिल्लीपासून गल्लीपर्यंतचे ग्रंथशौकीन हटकून भेटायचे. विठ्ठलराव आपल्याकडील ग्रंथांचा ज्या उत्साहाने परिचय करून देत, त्याच्याही पेक्षा अधिक उत्साहाने साहित्यिकांच्या आणि ग्रंथप्रेमींच्या ओळखी करून देत. तशात योगी अरविंदांच्य भक्त-चाहत्यांच्या गाठी-भेटी घालून देण्यात त्यांना खास रस होता.

मी अरविंदांचा चाहता, तर बेंद्रे त्यांचे निस्सीम भक्त. आम्हा उभयतांची भेट एका योगायोगाने त्यांच्याच दुकानात झाली. आणि तीही त्यांच्याच मुळे. तेथे जो आमचा स्नेह जमला तो कायमचा. वस्तुतः बेंद्रे वयाने माझ्यापेक्षा पंधरा वर्षांनी

---

मोठे. ते मूळचे मराठी भाषिक असल्यामुळे माझी थोडीफार कविता त्यांच्या वाचनात येऊन गेली होती. त्यांचा लौकिक मी जाणून होतो. पण त्यांची कविता काही मी वाचलेली नव्हती. तरी देखील, आपल्या पहिल्याच भेटीत त्यांनी मला जिंकले. ते त्यांच्या कोणत्या खास स्वभावविशेषामुळे हे मला तेहतीस वर्षांच्या आमच्या स्नेहानंतरही उमगलेले नाही. मला वाटते, माझ्यावर मोहिनी पडली ती त्यांच्या कलंदरपणाची, निरागसतेची. ज्या सहजतेने ते घरात वागत, तसेच सभासमारंभातही वागत. ज्याला एकदा आपला म्हटला त्याच्याकडे न बोलावता आवर्जून जात. त्याचा सामाजिक दर्जा त्यांनी कधीच विचारात घेतला नाही. मी घरी नाही हे माहीत असतानाही ते अनेकदा माझ्याकडे येऊन गेले आहेत. आणि माझ्याशी कराव्या तशा गप्पा त्यांनी माझ्या पत्नीशी केल्या आहेत.

पुण्यात प्रतिवर्षी कुठे ना कुठे त्यांची व्याख्याने होत. त्यांतून त्यांचे काव्य आणि पांडित्य सारख्याच लीलेने ओसंडताना दिसत. त्यांची पंढरीच्या विठ्ठलावरची व्याख्याने तर आजही श्रोत्यांच्या स्मरणात ताजी असतील. बेंद्र्यांची बुद्धी विलक्षण कुशाग्र तर होतीच. आणि ती अध्यात्मापासून विज्ञानापर्यंत कोणत्याही क्षेत्रात सारख्याच लीलेने संचार करीत असे. त्यांचे काव्यगायन असो की व्याख्यान असो, त्यात त्यांना धुंद झालेले पहाणे ही एक पर्वणी असे. साध्या गप्पात देखील त्यांची बहुश्रुतता आणि त्यांचा विद्याभ्यासंगही झळाळून उठत.

आमचा हा स्नेह माझ्या थोरल्या जावयांमुळे अधिक निकटचा होत गेला. ते दोरेस्वामी आयंगारातले. म्हैसूरच्या महाराजांच्या पुरोहित घराण्यातले. त्यांची मातृभाषा तमीळ. पण त्यांचे शिक्षण कन्नडमधून झालेले. बेंद्रे हे त्यांचे साहित्यदैवत. त्यांची कितीतरी गीते त्यांना मुखोद्गत आहेत. आणि ते ती पट्टीच्या आवाजात फार सुंदर तऱ्हेने गातात. मला त्यांनी ती अनेकदा गाऊन आणि समजावून सांगितली आहेत. त्यामुळे बेंद्र्यांचे काव्यसामर्थ्य जसे मला नीट अजमावता आले, तशीच त्यांच्या खास शब्दकळेची सुभगता आणि संगीतशक्तीही मला जाणवली. त्यांच्यामुळे बेंद्र्यांच्या आणि माझ्या गाठीभेटी आणखीनच वाढल्या. आणि आमच्या बैठका अधिकाधिक रंगत गेल्या. एकदा बोलता बोलता कवीची उत्स्फूर्त वाणी ही कवीची नसतेच, तर ती कवीचा कवी जो विश्वंभर त्याची असते हा संतांचा विचार विशद करून सांगताना त्यांनी आपली एक कविता वाचून दाखवली. तिच्यात त्यांनी एक कडवे टागोरांचे, एक आपले आणि एक माझे अशी तीन कडवी एका सूत्रात ओवली होती. आणि मूळ कवी विश्वंभरात कसे विलीन झाले आहेत हे दाखवले होते.

पुढे बेंद्रे माझ्याप्रमाणेच आकाशवाणीत वाङ्मयसंचालक म्हणून आले. पद्मपरिवारांतही आले. आमच्या वारंवार गाठीभेटी होऊ लागल्या. एकदा माझ्या

थोरल्या जावयांना काही कामानिमित्त हुबळीला जायचे होते. ते मला म्हणाले, "चला, आपण गाडी काढू. हुबळीचे काम आटोपताच धारवाडला कविवर्यांना भेटून येऊ."

आम्ही बेंद्र्यांकडे पोचलो तेव्हा सकाळचे नऊ वाजले असतील. ज्याने दार उघडले तो म्हणाला, 'आत जा; बेंद्रे वाचत बसलेले असतील.' आत गेलो तर सर्वत्र पिवळया जर्द वेळूची ग्रंथांनी भरलेली उघडी कपाटेच कपाटे. अशी तीन दालने तपासता तपासता तिसऱ्या दालनाच्या एका कोपऱ्यात कानटोपी घातलेले बेंद्रे आम्हांला आढळले. बेंद्र्यांनी आयुष्यात मिळवलेला बहुतांश पैसा पुस्तकांच्या खरेदीतच खर्च केला असला पाहिजे.

गोवामुक्तीनंतर माझी बदली पणजीला झाली. पूर्वीसारख्या आमच्या गाठी-भेटी होईनाशा झाल्या. येथील कर्नाटक संघाने त्यांना व्याख्यानासाठी दोनदा इकडे बोलावले. दोन्ही वेळेला मीच अध्यक्ष असायला हवे असा त्यांनी आग्रह धरला. आणि त्यांच्या स्नेहापायी मी त्याला मान तुकवली. दुसऱ्या खेपेच्या व्याख्यानात मला आढळून आले की, आकडेशास्त्राने त्यांना झपाटले आहे. ते जे सांगत होते ते सर्व माझ्या डोक्यावरून गेले.

त्यानंतर 'नाल्कु तंतु' या त्यांच्या काव्यसंग्रहाला ज्ञानपीठ पारितोषिक मिळाल्याचे वर्तमान वाचले. ते समजून घेण्याची उत्सुकता होती. पण मूळ पुस्तक मराठीत अनुवादित झाल्याशिवाय ती फिटणे शक्य नव्हते. वर्षे गेली; आणि अकस्मात... गेल्या वीस सप्टेंबर रोजी माझे सुहृद कुमार गंधर्व आणि प्रा. राम पुजारी माझ्याकडे आले. ते म्हणे गोव्याला येताना कविवर्यांना धारवाडला भेटले होते. रामनी कवि-वर्यांनी भेट म्हणून दिलेली त्यांची दोन पुस्तके माझ्या हवाली केली. एक होते, 'चार तंतू' हे 'नाल्कु तंतू'चे मराठी भाषांतर. आणि दुसरे होते, 'संत महंतांचा पूर्ण शंभू विठ्ठल' या नावाचे. दोन्ही पुस्तकांवरचे त्यांचे हस्ताक्षर सुवाच्य होते पण तितकेच कापरेही होते. रामना मी विचारले, "त्यांची तब्येत ठीक आहे ना?" ते म्हणाले, "कविवर्यांना शहांशीवे वर्ष चालू आहे. त्यांचा तुम्हांला निरोप आहे की, त्यांना गवसलेला अमृतानुभवाचा गुह्यार्थ त्यांना तुम्हांला सांगायचा आहे, तेव्हा तो ऐकण्यासाठी लवकरात लवकर या."

नंतरचे दहा दिवस फार गडबडीत गेले. एक ऑक्टोबरला मी कविवर्यांना विस्तृत पत्र लिहिले. सोबत आणि सवड पाहून लवकरच तुमच्या प्रेरक सहवासाचा जरूर लाभ घेईन असेही कळवले. त्यांचे विठ्ठलाचे वेड पाहून त्यांना माझा विठ्ठलावरचा एक नवा अभंगही पाठवला.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी, कविवर्य निवर्तल्याचे वर्तमान आले. त्यांच्या तोंडचा अमृतानुभवाचा गुह्यार्थ ऐकायला मिळाला नाही याची रुखरुख मला लागलीच. पण माझे पत्र तरी त्यांना वेळीच गेले असे समाधान मी मानून घेतले. पण दुर्दैवाची गोष्ट ही की, कालच ते माझ्या हाती परत आले. पत्ता बदलून ते दादरला नातू नावाच्या गृहस्थांकडे गेल्याची पत्रावर नोंद आहे. आणि वर unclaimed अशी पांढरी चिठ्ठी लावली आहे. पत्र पोचले तेव्हा कविवर्यांची इहयात्रा संपली होती की, ते वाचण्याच्या परिस्थितीत नव्हते म्हणून ते घेतलेच गेले नाही, हे कळले नाही.

माझ्या पत्रातला मजकूर त्यांच्यापर्यंत पोचलाच नाही. आता केव्हातरी मलाच तो स्वतः त्याना सांगावा लागेल.

आपल्याला मिळालेले शरीर हा वर की शाप, हा प्रश्न निरंतर माझ्या चिंतनाचा विषय राहिला आहे. 'शरीरमाद्यं खलुधर्मसाधनम्' किंवा सर्व देहांत फक्त नरदेहच तेवढा असा आहे की, ज्याच्यामुळे मोक्ष प्राप्त करता येतो. हा विचार भारतीय तत्त्वचिंतनात आलेला नाही असे नाही. पण आपल्या सर्व जुन्या साहित्यात, विशेषतः बुद्धोत्तर साहित्यात देहाची निंदाच अधिक आलेली आहे. आपल्या संतसाहित्याचा तर याच गोष्टीवर विशेष भर आहे. देहाविषयी तिरस्कार निर्माण करण्याकडेच त्याचा जास्त कल आहे. त्याच परंपरेत मी लहानाचा मोठा झालो. घरातले वळण देखील देहाचे चोचले करू नयेत असेच होते. पण त्याचा अतिरेक इतका असायचा की, सणा-उत्सवाच्यासाठी बाहेर निघण्यावेळेशिवाय अन्य वेळीं आपले तोंड आरशात पाहिले तर, वडीलधाऱ्यांकडून मुस्कटात बसावयाची. देहाविषयी इतका तिरस्कार आपल्यावर का बिंबवला हे काही माझ्या ध्यानात येत नसे. आणि तो सुंदर ठेवला पाहिजे आणि नेटकेपणाने तो वावरला पाहिजे ही माझी स्वाभाविक मनोधारणा बदलत नसे.

पुढे तेराव्या वर्षी शिक्षणानिमित्त मला पर्वरीला माझ्या चुलत काकांकडे रहावे लागले. शाळेतील बहुसंख्य मुले ख्रिश्चन होती. त्यांचे सर्वांचेच वेष नेटके असत. त्यामुळे मन अगदी प्रसन्न होऊन जाई. पुढे नॉर्मल स्कूलमध्ये गेल्यावर पाश्चात्त्य संस्कृतीचा वाढता परिचय होत गेला आणि ग्रीक संस्कृतीने शरीराच्या महत्त्वाची आणि त्याच्या कमनीयतेची शिकवण उभ्या युरोपला कशी दिली आहे हे ध्यानात आले. तेव्हापासून शरीर हा शाप की वर, हा प्रश्न वारंवार मला विचार करायला लावू लागला. माझे निरीक्षण आणि चिंतन वाढत गेले तसतसे मला उमगत गेले की, आपण आत्मसाधनेच्या नादात देहद्रोह चालवला आहे. तर पाश्चात्यांनी देहाचे चोचले चालवण्यापायी आत्मद्रोहाचा मार्ग अनुसरला आहे.

देह आणि आत्मा हे स्वभावतः परस्परांचे वैरी नसून एकाच स्वयंभू एकमूची परस्परपूरक अशी ही दोन अंगे आहेत. आणि त्यांच्यात आंतरिक सख्य आहे.

---

## शरीर : वर की शाप ?

---

आपल्याकडे आत्म्याचा जितका सूक्ष्म विचार झाला, तसा देहाचा झाला नाही. पाश्चात्यांत नेमके याच्या उलट झाले. त्यामुळे त्यांच्यातल्या सख्याचे शास्त्र निर्माणच होऊ शकले नाही. जगातल्या विचारवंतांना केव्हाना केव्हा त्याची उभारणी करावीच लागेल आणि त्याप्रमाणे माणसे जगू लागतील तेव्हाच, सुखाची, म्हणजेच स्वाभाविक विकासाची वाट त्यांना सापडू शकेल. तसे होत नाही तोपर्यंत ती एकमेकांवर मात करीतच रहातील आणि दुःखपरंपरा चालूच राहील.

वस्तुतः माझे बाल्य आणि तारुण्य तसे सुखात गेले. घरी चैनीला वाव नव्हता. पण वाढीला आवश्यक असलेल्या सुखाची कमतरता नव्हती. खाण्या-जेवण्याच्या बाबतीत माझे तर फार लाड झाले. गरमागरम आणि चविष्ट पदार्थ सतत खायला मिळाल्यामुळे, त्या बाबतीत माझा स्वभाव 'भलताच खोड्याळ' बनला होता. झोपताना तर मला, अंथरुणावरच्या चादरीला चूण पडलेली खपत नसे.

पण जेव्हा मी गोव्याच्या स्वातंत्र्यसंग्रामात ओढला गेलो, तेव्हा माझा प्राण आतून इतका पेटून निघाला की, भुकेला कोंडा आणि उशाला धोंडा असला तरी माझे व्यवस्थित चालू लागले. माझ्यातल्या या आकस्मिक पालटाने मी स्वतःच विस्मयचकित झालो. या पालटावर विचार करू लागलो, तेव्हा माझ्या ध्यानात आले की, आत्म्याला आपला खरा खुराक लाभल्यावर देह आपोआपच त्याला साथ देऊ लागतो. आणि जरुरीपुरते मिळाले की, तेवढ्यात संतुष्ट रहातो. मला जसा हा अनुभव आला, तसाच याच्या उलटही अनुभव आला.

आमचा लढा खूप रेंगाळला. प्राणाची ज्वाला ओसरू लागून निखारे फुंकरीत राहण्याची माझ्यावर पाळी आली. पुण्याला मी बिऱ्हाड केले. गरिबीतच आम्ही रहात होतो. पण घरचे गरम गरम चवदार जेवण मिळे. गाद्यागिर्द्या नसल्या तरी, फळ्यांच्या खाटीवर चटई टाकून झोपायला मिळे. तेवढ्यात मी खूष होतो.

वर्षे अशी चालली असताना, माझा पन्नासावा वाढदिवस झाला. त्या निमित्ताने माझा दुसरा भाऊ माझ्याकडे आला. तो स्वभावतः वडिलांसारखा शौकीन आहे. माझ्या खाटेवर गादी नाही हे त्याच्या लक्षात आले तेव्हा, बाजारात जाऊन तो डनलॉपची गादी आणि तसल्याच दोन उशा घेऊन आला. त्याच्या या उत्स्फूर्त सौहार्दामुळे मी सुखावलो. आणि ती गादी मी रोज वापरू लागलो असे काही महिने गेले. एक दिवस माझ्या कार्यकर्त्या मित्राचे बोलावणे आल्यामुळे मुंबईच्या एका बैठकीला मला जावे लागले. बैठक बरीच रात्रपर्यंत लांबली. अपुऱ्या जागेत आम्ही सारे चटया टाकून पसरलो. पण सारी रात्र मला डोळा लागला नाही.

सकाळी लवकर उठून मी पुण्याची गाडी धरली. एकटाच बसलो असताना मनात आले, आपले शरीर स्वभावतःच किती सुखासीन आहे! नेहमीची लुसलुशीत गादी

नसल्यामुळे काल आपल्याला क्षणभरही डोळा लागला नाही. फळ्यांच्या खाटेवर वर्षानुवर्षे झोपण्याची आपली सवय, पण अवघ्या महिन्यातच साफ लयाला गेली! आपले हे शरीर सुखाला किती लवकर चटावते! पण त्याचबरोबर माझ्या हेही लक्षात आले की, आपले मन पूर्वीसारखे पेटते राहिले असते तर, त्या चटईवर देखील गाढ झोप मला लागली असती.

या अनुभवाने मी एकदम सावध झालो. आणि त्यानंतर आचार्य कालेलकरांशी घडलेल्या पहिल्याच भेटीत, नेहमीच्या माझ्या सवयीप्रमाणे मी हा प्रश्न छेडला. त्या वेळी त्यांनी केलेली मीमांसा मला मोठी उद्बोधक वाटली. ते म्हणाले, "स्वभावतः आपले मन शरीराला जखडलेले असते. शरीर धारणेसाठी निसर्गाने ही सोय केलेली असते. पण आपल्याला शरीर सांभाळायचे असते, त्याचप्रमाणे आत्म्याच्या सादाला 'ओ'ही द्यायची असते. तुम्ही गोव्याचे. तेव्हा नारळाच्या उपमेने या गोष्टीचे स्पष्टीकरण केल्यास ते तुम्हाला लवकर पटेल. ताजा नारळ फोडला तर, कोयत्याच्या घावाबरोबर त्याची भकले होताना आतल्या कोवळ्या खोबऱ्याचीही भकले होतात. कारण ते नरोटीला अगदी चिकटून असते, पण तोच नारळ वाळून त्याचे 'गुडगुडे' झाले की, कोयत्याच्या घावाने नरोटीची भकले झाली तरी, आतल्या 'गुडगुड्या'ला इजा पोचत नाही. पण त्याचबरोबर बसलेल्या घावाची जाण त्याला झाल्याशिवाय रहात नाही. देहभान असावे पण देहासक्ती नसावी, हे भान आत्मार्थी माणसाला निरंतर ठेवावे लागते. अशी अखंड जागरूकता ठेवणे आणि देहासक्तीतून सुटणे अवतारी पुरुषांना देखील किती कठीण जाते हे खिस्त भगवानाच्या वधस्तंभावरील उद्‌गारातून दिसून येते. तो म्हणाला होता, 'शक्य असेल तर, हा यातनेचा पेला दूर कर; कारण प्राण समर्थ असला तरी, शरीर दुर्बलच आहे.'"

जेव्हा जेव्हा आत्मा आणि शरीर यांच्या मधला तोल माझ्यात बिनसतो तेव्हा तेव्हा, काकासाहेबांचे हे विवेचन मला आठवते. मी सावध होतो. आणि गेलेला तोल सांभाळण्याचा प्रयत्न करू लागतो.

*

प्रत्येक समाजात काही खुळचट कल्पनांनी दुर्वासारखे घट्ट मूळ धरलेले असते. आपल्याकडेच पहा ना! शाळा मास्तर म्हटला की तो बुजरा आणि लाचार असला पाहिजे, समाजसेवक दरिद्री असला पाहिजे, कवी व्यवहारशून्य असला पाहिजे, व्यापारी हा खोटा असतोच, सरकारी अंमलदार हा मुजोर, ताठर आणि लाचखाऊ असायचाच. असले किती तरी समज आपल्यात प्रचलित आहेत. त्यातलाच एक जीवनग्रासी समज हा आहे की, आध्यात्मिक वृत्तीच्या माणसाने सुतकी असावे, सर्व लौकिक सुखोपभोगांकडे त्याची पाठ फिरलेली असावी.

लहानपणी मला वाचल्याचे स्मरते की, ब्रह्मचाऱ्याने 'चित्रीची स्त्री' देखील पहाता कामा नये. एवढेच नव्हे तर, सूर्योदय-सूर्यास्त कामोद्दीपक असतात म्हणून तेही कटाक्षाने बघण्याचे टाळले पाहिजेत. इतकेच काय तर, स्वादिष्ट अन्न घेता कामा नये, फुलाचा वास घेता कामा नये. समाजाच्या अशा आनंदद्रोही वातावरणात मीही वाढलो होतो. जीवनातल्या प्रत्येक स्वाभाविक सुखावर पापाचे शिक्के मारलेले मला दिसत होते. मनात रसाविषयीची लालसा आणि प्रत्यक्षात मात्र पापाची अव्याहत धास्ती यांच्या कात्रीत मी वावरत होतो. घेतलेले निर्व्याज सुख देखील चोरून घेतल्या सारखे वाटे. मी तेव्हा तारुण्याच्या उंबरठ्यावर होतो. आपल्या चालत आलेल्या परंपरेत कुठे तरी फार मोठा विसंवाद आहे असे अंतर्मन सांगत होते. पण त्यावरचे उत्तर सापडत नव्हते.

अशा मनोवस्थेत असतानाच, मडगावच्या सारस्वत ब्राह्मण समाजात चालू असलेल्या गीतावाचस्पती भिडे शास्त्र्यांच्या प्रवचनाला हजर रहावे म्हणून मी तिकडे गेलो. हा जन्मांध भाष्यकार फार मोठा प्रज्ञाचक्षू होता. त्या दिवशीचे त्यांचे प्रवचन शेवटचे होते. आणि ते भगवद्गीतेवरचे होते. अस्खलित वाणी, अमोघ वाक्पाटव, वेदोपनिषदांचे हुकमी पाठांतर, अर्थबोधक कथाआख्यायिकांचा अमाप स्मरणसंचय, या सर्व समृद्धीने त्यांचे प्रवचन कमालीचे रंगले. सभा विसर्जन पावल्यावर श्रोत्यांतली

प्रौढ पुढारी मंडळी त्यांचे अभिनंदन करण्यासाठी व्यासपीठावर गेली. त्यांचे आणि वाचस्पतींचे संभाषण ऐकायला मिळावे म्हणून मीही जाऊन एका कडेला बसलो. संभाषण चालू असताना, 'आमचा गोमंतक'चे लेखक गजाननबाबा सावर्डेकर यांनी सिग्रेट वळली आणि शिलगावली. त्या काळी तयार सिग्रेट ओढण्याऐवजी झिग-झॅगच्या तलम कागदात व्हर्जीनिया बर्डस् आयच्या किसलेल्या तंबाखूची सुरळी ओढण्याची पद्धत होती. त्यांनी एक-दोन झुरके सोडताच, त्या विदेशी तंबाखूचा खमंग दरवळ वातावरणात पसरला. दृष्टी नसलेल्या व्यक्तीची इतर ज्ञानेंद्रिये फार तिखट असतात. वाचस्पतींना तो तत्काळ जाणवला आणि हा इतका मधुर सुगंध कशाचा अशी त्यांनी पृच्छा केली. सावर्डेकरांनी त्यांना तशी सुरळी करून दिली. ती पाण्याने चिकटवून दिली आणि वाचस्पतींनी ती ओठात धरताच ती पेटवलीही. ते एकाग्र होऊन सिग्रेटचे झुरके घेऊ लागले. अशा वेळी मंडळीतल्या एका वृद्ध गृहस्थाने त्यांना विचारले, "आपण गीता सांगता, आणि सिग्रेटही पिता हे कसे काय?" तेव्हा ओठांतल्या ओठांत हसत वाचस्पतींनी प्रतिप्रश्न केला, "गीतेत किंवा आपल्या अन्य धर्मग्रंथात भोगास्वाद घेऊ नये असे कुठे सांगितले आहे? स्वतः योगेश्वर श्रीकृष्ण मद्यास्वाद घेत असत. आणि गोपालकृष्ण असून वृषभाचे मांस चवीने खात असत, हे महाभारतात तुम्ही वाचलेले नाही काय? प्राप्तभोग असावे, पण भोगाधीन नसावे, हेच तर आपल्या धर्माचे सांगणे आहे." त्यांच्या या उत्तराने एकदम सन्नाटा पसरला. प्रतिप्रश्न करण्याची कुणाची हिंमत झाली नाही.

त्यांचे हे म्हणणे किती खरे आहे हे पुढे घडलेल्या धर्मग्रंथवाचनातून माझ्या प्रत्ययाला आले. ऋग्वेद हा आपला सर्वांत पुरातन असा धर्मग्रंथ. त्यातल्या ऋचा वाचल्या की, हे विश्व आनंदातून उगम पावते, आनंदामुळेच फुलते, फळते आणि आनंदातच लय पावते अशी आपल्या पूर्वजांची धारणा दिसते. स्वतःला ते 'अमृतस्य पुत्रः' असेच मानताना दिसतात. ते देवाकडे निःश्रेयसाबरोबर अभ्युदयही मागतात. 'आम्हाला राज्य दे, प्रासाद दे, पवनगती अश्व दे, पुष्ट मांड्यांच्या स्त्रिया दे' अशा मागण्याच ते अधिक करताना दिसतात. रामायणही पाहिले तर, चौदा वर्षे वनवासाची शिक्षा झालेला राम, सीता-लक्ष्मणासह गंगा पार करीत असताना सीता तिला नवस करते, 'माते गंगे! आम्हांला सुखरूप अयोध्येला परत आण. त्यानंतर मी तुला मद्याचे सहस्र घट आणि मांसोदन (पुलाव) यांचा अहेर करीन!' प्रस्थान त्रयीचे भाष्यकार श्री आद्य शंकराचार्य हे तर यतींद्रच. तरी ते भोगाचा धिक्कार करीत नाहीत. भोग चालत पुढे आला तर तो घ्या, पण आपण केवळ शरीर नाही हे भान सुटू देऊ नका, असे आपल्या प्रसिद्ध अवधूत स्तोत्रात सुंदर रीतीने सांगतात.

आपली ही परंपरा अशी आनंदवेधी असून देखील, आपण आनंदद्वेष्टे आणि

सुतकी झालो कसे याचे मला नवल वाटते. एका अतिरेकापासून दुसऱ्या अतिरेकाकडे झुकणे हा आपला स्वभावच दिसतो. आपल्या इतिहासाचा निर्वाळा असाच आहे. आत्मा आणि देह ही दोन आहेत आणि त्यांच्यांत स्वयंभू वैर आहे, असा अपसमज कुठे तरी आपल्या चित्तात घर करून राहिला आहे. एखाद्या महान पूर्वसुरीने विवेचनाच्या सोयीसाठी त्यांचे वेगळेपण दाखवून दिले असेल. आणि त्याच्या अतिरेकी शिष्यांनी त्याचा परिपाक अशा भयानक विपर्यासात केला असेल. जितके देहदंडन अधिक करावे तितका आत्मोत्कर्ष त्वरित, हा आपल्याकडे एक आध्यात्मिक फॉर्म्युलाच होऊन बसला. त्यामुळे यतिधर्म हा देहद्रोह्यांचा आणि गृहस्थ धर्म हा आत्मद्रोह्यांचा अशी विभागणीच होऊन बसली.

गौतम बुद्धाने असल्या यतिधर्माची शीग गाठून पाहिली आणि त्याचे वैय्यर्थ्य पटल्यावर मध्यम मार्गाचा पुरस्कार केला. पण आपल्या समाजाच्या अंगात ते विष इतके खोलवर भिनले होते की, त्याने बुद्धाचे खरे तत्त्वज्ञान खाऊन टाकून त्याच्यावर आपली मात केली. आत्मानुसंधानाशिवाय शरीरसुख मोहरत नाही आणि शरीर, सुखसंतृप्त ठेवल्याशिवाय आत्मा बहरत नाही. हेच खरे पहाता पहिले जीवनसत्य होय असेच आपला अनुभव सांगतो. त्यावरून त्या उभयतांत स्वयंभू वैर नसून मौलिक संख्य आहे. ते ज्याने मनोमन जागले तोच जीवनाच्या खऱ्या रसास्वादाचा धनी होतो. त्याच्या असीम आनंदाचा निरंतरचा भोक्ता बनतो.

सुग्रास, स्वादिष्ट अन्न पोटात दोन घासांची जागा ठेवून मी जेवतो. आणि माझी आवडती सिग्रेट पीत बसतो. तेव्हा माझे चित्त अशा प्रसादाने भरून निघते की, कवितेची एखादी नवी ओळ माझ्या ओठावर मोहरू लागते. शरीर आणि आत्मा उपजत सख्याने अशी एकाकार झाली की, तेथे आनंदाची निर्मिती होते. आणि त्या आनंदाने कोणत्याही माध्यमातून का असेना सुंदर आकार घेतला की, त्यालाच आपण कला किंवा सांस्कृतिक आविष्कार म्हणतो. खाल्लेल्या घासात आनंद आहे, तसाच दिलेल्या घासातही आनंद आहे. प्रेम घेण्यात आनंद आहे, तसा ते देण्यातही आनंद आहे. प्रेमाची आणि आनंदाची अशी देवघेव सतत आणि सहज करीत रहाणे म्हणजेच जीवनाचा रसास्वाद. जीवनाच्या रसास्वादनासाठी आनंदाची आणि प्रेमाची देवघेव तर लागतेच, पण तेवढ्यानेही ते पुरे होते असे नाही. त्यासाठी दुःख निपटणे आणि तसे करणे शक्य नसेल तेथे ते यथाशक्ती हलके करणेही आवश्यक असते. शेत जसे योग्य वेळी आणि योग्य रीतीने पेरावे लागते, तसेच जागरूक राहून त्यात आपोआप उगवणारे तण कटाक्षाने नडावे लागते. आणि रोपांवर कीड पडली तर, योग्य औषधे आणि खते देऊन रुग्ण शेताला सावरावे लागते. जीवनाचेही असेच आहे. जग हे एक एकत्र कुटुंब आहे. त्याचे आपण कुटुंबीय असल्यामुळे दुसरा दुःखी असला, रोगी असला, दरिद्री असला किंवा हाय खालेला

असला तर, 'मला काय त्याचे,' असे म्हणून भागत नाही. त्याचे दुःख केव्हा ना केव्हा आपल्यालाही घेरल्याशिवाय रहात नाही; कारण आपले व्यक्तिजीवन स्वभावतःच संघजीवनाचा भाग असते. औदार्याचा विचार क्षणभर बाजूला ठेवला तरी, स्वतःच्या हितासाठी म्हणून तरी व्यक्तीला त्याची दखल घ्यावीच लागते. आणि ते हलके करण्यासाठी खपावे लागते. एवढे करूनही दुःख संपले असे होत नाही. कधी कधी जीवन असे विचित्र वळसे घेते की, आपल्या जीवनाची अक्षरशः शोकान्तिकाच होऊन बसते. अशा वेळी एखादी शेक्सपीरियन शोकांतिका ज्या तटस्थ रसिकतेने आपण आस्वाद्य करून घेतो, तशीच आपल्या जीवनाची शोकांतिकाही आपल्याला आत्मभोग्य करून घ्यावी लागते. 'बाईल मेली बरे झाले' असे म्हणत संचिताचे कौतुक पहाणारा तुकाराम हा असाच एक थोर जीवन-रसिक होता. तशा प्रकारची जीवनरसिकता आपल्याला गाठायची आहे.

*

आल्त पर्वरीहून बिठ्ठोणला जाणारी सडक अगदी माझ्या घरावरून जाते. सकाळ-संध्याकाळ मी त्याच सडकेवरून हिंडून येतो. अशी सहल मला आवडते आणि ती एकाकी करीत राहिल्याने मला नवनवीन सुचतेही पुष्कळ. शिवाय अशी सहल नेमाने करीत राहिल्याने रक्तातली जादा साखर जाळली जाते हाही लाभ आहेच.

या सडकेने दहाएक मिनिटे संथ चालीने चालले की, एक नुकतीच तयार झालेली भव्य इमारत लागते. पाद्री लोकांच्या अखत्यारीतली ही इमारत ऐतिहासिक संशोधन संस्थेची आहे. तिच्या समोरच एक प्रचंड वडाचे झाड आहे. त्याने सोडलेल्या पारंब्यांचे भरदार असे आठ खांब झाले आहेत. त्याचे वय पन्नास साठ वर्षांचे असेल. म्हणजे वटवृक्षाची आयुर्मर्यादा लक्षात घेता त्याला तरुणच म्हटले पाहिजे. त्याचा सध्याचा जोम पाहिला तर जितकी अधिक दशके जातात तितके पारंब्यांचे अधिक खांब सोडीत, एक दिवस दक्षिणेतल्या सहस्रस्तंभ मंडपासारखा तो फैलावत जाईल आणि हजारो यात्रिकांना आपल्या छायेखाली घेईल याची ग्वाही त्याला पाहणारा कोणीही देईल. प्रत्येक खेपेला जाता येता तो वड माझे लक्ष वेधून घेतो. आणि कसा कोण जाणे, मी आपोआप अंतर्मुख होतो.

ज्या स्थळाच्या सान्निध्यात आपण असे अंतर्मुख होतो ते पुण्यस्थान समजावे असे आपले ऋषिमुनी नेहमीच सांगत आले आहेत. या संस्कारामुळे म्हणा किंवा या स्थानाच्या प्रभावामुळे म्हणा, हा वाढता वड असाच वाढत राहावा असे सारखे मला वाटत राहाते. त्याला वाढायला त्याच्या अवती भोवती मोकळी जमीनही भरपूर आहे. अजून त्याच्या आजूबाजूला लहान वा मोठी घरे उभी झालेली नाहीत.

या अष्टवडाच्या केंद्रस्थानची जागा मोकळी आहे. पण मला तो मोकळेपणा म्हणजे ओकेपणाच वाटतो. किंबहुना तुम्ही येथे ज्योतिर्लिंगाची स्थापना कराल

म्हणून मी वाट पहात आहे असा संकेत ती जागा मला नेहमीच करीत असते. मला ईश्वराने कल्पकता दिली आहे. पण माझे कल्पनाचित्र प्रत्यक्षात उभे करण्यासाठी जो पैसा लागतो तो त्याने मला दिलेला नाही. ते श्रेय पुण्यशील दात्यांना किंवा इथल्या लोकसमुदायाला द्यावे असे त्याच्या मनात असावे असे मला नेहमीच वाटते.

मी उगीचच विचार करू लागतो. इथे ज्योतिर्लिंग बसवायचे झाले तर कुठले बसवावे ? नवे तयार करवून घेऊन ? छेः छेः केवळ प्रतिष्ठापनेच्या मंत्रविधीने त्याच्यात तात्काळ देवकळा कशी येईल ? त्यासाठी ते जुनेच हवे– या विचारासरशी मला माझ्या लहानपणची आठवण झाली. सुटीत माझी आत्या मला असोळड्याला आपल्याकडे बोलावून घेत असे. आणि सुटी संपेपर्यंत मला आपल्याकडे ठेवून घेत असे. तिच्या घरापासून अवघ्या आठ मिनिटांच्या वाटेवर काही जांभळी जांभळांनी लगडलेल्या असत. आम्ही मुले त्यांचे काळेगर्द घोस दगड भिरकावून पाडीत असू आणि पडलेल्या जांभळांवर ताव मारत असू. त्या जांभळीच्या रायीत दोन तुळतुळीत काळीभोर माणसाच्या गुडघ्याएवढी लिंगे सोबतीने असलेली मी पाहिली. त्यांना पिंडिका नव्हत्या. ती उपेक्षित आहेत. पूजेअर्चेशिवाय आहेत याचे तेव्हाही मला वाईट वाटले होते. ती अशी वाळीत का टाकली आहेत याची पृच्छा देखील मी केली. तेव्हा मला कळले की, डुकरे त्यांना शिवून गेली असतील म्हणून त्यांची प्रतिष्ठापना करण्याच्या फंदात कुणी पडत नाही.

पण पुढे बऱ्याच वर्षांनी इतिहासकार वर्दे वालावलकरांच्या एका लेखात मी वाचले की, ही लिंगे श्वेताश्वर उपनिषद निर्माण होण्याच्या पूर्वीची आहेत. त्या काळात लिंगपूजक आणि योनिपूजक असे दोन पंथ होते. पुढे जेव्हा त्यांचा एकोपा झाला तेव्हा, पिंडिकेसह लिंग अशी योजना उभयमान्य झाली. अर्थात असोळडेची लिंगे दोन हजार वर्षांइतकी तरी जुनी खास आहेत. आज ती मूळ जागेत आहेत की नाहीत हे मला माहीत नाही. पण अजून ती तिथेच असावी असा माझा समज आहे. कारण अशा लिंगांची मोडतोड करण्याचे आम्हा गोवेकरांच्या स्वभावात नाही. मी मनातल्या मनात त्यातले एक लिंग काळ्या पाषाणाच्या शाळुंकेत, या वडाच्या मध्यभागी बसवून दिले. आणि त्याला उद्देशून आद्य शंकराचार्यांचे शिवमानसपूजास्तोत्र आळवले. मग मनात प्रश्न आला, या ज्योतिर्लिंगाला नाव काय ठेवावे ? पर्वरी या शब्दाचा ध्वनी त्यात असला तर त्याला सार्थता येईल. मग अकस्मात माझ्या लक्षात आले की, पर्वरीच्या या पटाराला इतिहास असा नाहीच. इथे वस्ती व्हायला सुरुवात झाली तीच मुळी पंचवीस-तीस वर्षांपूर्वी. तेव्हा या भूमीला इतिहास कुठला असणार ? पण तो घडण्याची चिन्हे मात्र स्पष्ट दिसत आहेत. पुढच्या पंधरा-वीस वर्षांत पर्वरीचे हे सारे पठार देखण्या इमारतींनी आणि

आखीव रेखीव चौकांनी भरून जाईल. हा हा म्हणता येथे एक टुमदार शहर उभे होईल हे स्पष्ट आहे.

पणजीला आडव्या अंगाने वाढायला फारसा अवसर नाही. ती उभ्या अंगाने वाढू दिली तर तिचे आजचे देखणेपण लयाला जाईल. तेव्हा पाचएक वर्षांतच आल्त पर्वरी पणजीत समाविष्ट करून घ्यावी लागेल. जवाहरलाल पुलामुळे जोड-मुंबईसारखी जोड पणजी उभी होईल. या स्थळाची लोकसंख्या तर वाढेलच. पण त्याच बरोबर बऱ्याच नव्या-जुन्या खात्यांच्या कचेऱ्या या भागात उघडाव्या लागतील. अर्थातच बागा, खेळांची मैदाने, नाट्यगृहे, सभास्थाने, चित्रपटगृहे यांचीही सोय या भागात करावी लागेल. शहर म्हटले आणि लोकांच्या गरजा पुरवायच्या म्हटल्या की, लोकांच्या धर्मभावनेची गरज ी पुरवावीच लागेल. ख्रिस्ती लोकांची सोय इथल्या चॅपलमुळे होत असते. त्याचे उपासक वाढले तर, त्याचेच रूपांतर इगर्जमध्ये करता येईल. हिंदूंसाठी आज या भागात देऊळ नाही. मी सांगितलेली जागा ही गरज भागवू शकेल. आल्त पर्वरीचे जे संभाव्य चित्र उभे होऊ पहात आहे त्यावरून त्याचा पर्वकाळ सुरू झाला आहे हे स्पष्ट आहे. मग या ज्योतिर्लिंगाला पर्वकालेश्वर नाव ठेवले तर ते समर्पक नाही का ठरणार ? असे माझ्या मनात येऊन गेले. या नावामुळे पर्वरी या नावाचे ध्वनिसाम्यही त्याला मिळून जाते. येथे अशी ही ज्योतिर्लिंगाची प्रतिष्ठापना झाली की, महाशिवरात्रीला येथे लाखावर यात्रा भरेल याविषयी मला मुळीच शंका नाही. मात्र माझी मनापासूनची इच्छा आहे की, हे ज्योतिर्लिंग उघड्यावरच असावे. त्याच्यावरचे मंदिर उभारण्याचे काम हा वडच करीत राहील. लोकांना पर्वकालेश्वर नाव पसंत न पडले तर, त्यांनी त्याला वटेश्वर म्हणावे. पर्वणीच्या दिवशी प्रत्येक यात्रिकाने तेथे आपापली पणती लावावी.

*

आमच्या लग्नाचा एकावन्नावा वाढदिवस आला तेव्हा, आम्ही पतिपत्नी पुण्याला आमच्या मुलीकडे होतो. अगदीच निकटच्या मोजक्या आप्तेष्टांना बोलावून तिने तो साजरा केला. सर्वांनीच काहीना काही भेट आणली होती. पण त्यातल्या एका भेटीने माझे विशेष लक्ष वेधले. ती होती माझ्या एका सुविद्य आणि स्वतंत्र बुद्धीच्या मैत्रिणीची. तिने चंदनाच्या छिलक्यांचा सुंदर हार आणला होता. पण तिने तो मला न घालता माझ्या पत्नीला घातला आणि माझ्या हातात दिले एक इंग्रजी सुभाषित, भिंतीला टांगता येईल अशा छोट्याशा लोहपत्रात कोरलेले. त्याचा भावार्थ होता तो असा 'प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते, जी तो कुठे चुकला हे त्याला सांगत असते.' तिच्या या भेटीने मी खरोखरच सुखावलो. पण तिची थोडीशी छेड काढावी म्हणून तिला म्हणालो, “ हे सुभाषित फार सुंदर आहे. पण मी काही यशस्वी माणूस नाही. मनस्वी मात्र जरूर आहे. आणि कदाचित त्याचमुळे सुखी आहे ! ” माझी मैत्रीण यावर काही बोलली नाही. ती मुमुर्खेच हसली. पण किती अर्थपूर्ण !

आज सहज तो प्रसंग मला आठवला आणि अभावितपणे एक महत्त्वाचे जीवन-सूत्र मी बोलून गेल्याचे मला एकाएकी जाणवले. यशाला जीवनात फार मोठे मोल आहे हे मी जाणतो. म्हणूनच तर ते मिळवण्यासाठी जो तो अष्टौप्रहर आपला जीव पाखडीत असतो. या यशासाठी सर्वत्रच एक निर्घृण स्पर्धा चाललेली आपण पाहतो. तिच्यात कुणी सपशेल चिरडले जातात, कुणाच्या हाताला ते थोडेसे लागलेले दिसते. आणि ज्या विरळा लोकांना ते भरपूर मिळाले असे आपल्याला वाटते ते, ते अपुरे आहे म्हणून किंवा ते केव्हाही हातचे निसटेल म्हणून धास्तावलेले दिसतात.

यशस्वी माणसे सुखी असतात असा जो आपला समज आहे तो खरा नाही. यशाचे क्षेत्र हे एक रणांगणच आहे. वार दिल्याघेतल्याशिवाय त्यात वावरताच येत नाही. त्यामुळे जो जो त्यात शिरतो त्याला सदैव सावध, सायुध आणि सकवच

## यशस्वी नव्हे, मनस्वी

रहावेच लागते. एकदा असे रहायची माणसाला सवय जडली की, कवचा-आयुधा-शिवाय आणि तज्जन्य धास्तीशिवाय त्याला जगताच येत नाही. मग तो घरात आणि बिछान्यात देखील ती अंगावेगळी करू शकत नाही. त्याचा परिणाम असा होतो की, त्यांच्या वजनानेच त्याच्या सुखाचा चुराडा होतो.

माझ्या उपजत मनस्वीपणामुळे हे सत्य मला फार लवकर उमगले असावे. यामुळे यशाचे आकर्षण मला कधीच वाटले नाही. आणि त्याच्यामागे मी कधी धावलो नाही. अठ्ठावीस साली मी मॅट्रिक झालो आणि दुसऱ्याच वर्षी नोकरीच्या शोधार्थ मुंबईला गेलो. उतरलो होतो माटुंग्याला. बळवल्ली कुटुंबात. हे मूळचे बोरकर. त्यांचा आमचा खूप घरोबा होता. झेनिथ इन्शुरन्समध्ये हे तिथे भाऊ तीन शाखांचे मॅनेजर होते. माझे शिक्षण अवघे मॅट्रिकपर्यंतचे. त्यामुळे मासिक नव्वद रुपयांपेक्षा अधिक पगार मला ते देऊ शकत नव्हते. पण मला लवकर बढत्या देण्याचे अभिवचन त्यांनी मला दिले होते. एकोणतीस साली नव्वद पगार हा काही कमी नव्हता. पण मुंबईचे जीवन माझ्या मनस्वी वृत्तीला मानवणारे नव्हते. तेथे राहून माझ्यातला कवी वाढू शकेल असे मला वाटेना. चालून आलेली संधी नाकारून मी परत फिरलो आणि तीस रुपये पगारावर इथे गोव्यातच शिक्षक म्हणून रहाणे मी पसंत केले.

त्याच वर्षी माझी आजी, म्हणजे माझ्या वडिलांची आई फार आजारी झाली. दुखणे विकोपाला जाऊन तिचा अंतकाळ समीप आला. तिने मला जवळ बोलावून, छातीवरून हात ओढीत रहायला सांगितले. धाप लागलेल्या अवस्थेत ती कुलदेवाचे आणि माझे अशी दोनच नावे घेत होती. तिने माझ्यासाठी ज्या खस्ता खाल्ल्या आणि माझ्यावर जे जिवापाड प्रेम केले ते सर्व माझ्यापुढे साक्षात होऊन माझा गळा दाटून आला. टांगणीला लागलेल्या तिच्या जिवाची समाधानाने सुटका व्हावी म्हणून मी तिला विचारले, “ मी काय केल्याने तू समाधानाने डोळे मिटशील ? ” कदाचित ती माझ्या याच प्रश्नाची वाट पहात असावी. धाप आवरून ती मला म्हणाली, “ माझ्यानंतर माझ्यासारखीच तुझी काळजी घेईल अशी मुलगी मी तुझ्यासाठी पाहून ठेवली आहे. ती तू करून घेतो म्हणालास तर मी सुखाने मरेन. ” ही मुलगी तिच्या चुलतभावाची आहे हे मला माहीत होते. मी तिला पाहिलेही नव्हते. पण मागचा पुढचा कसलाही विचार न करता मी तिला शब्द देऊन टाकला.

मी दहा माणसांचा संसार वाऱ्यावर सोडून गोमंतकाच्या स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली तीही या मनस्वीपणापायीच. ट्रेनिंगचा कोर्स पुरा करीपर्यंत माझी थोडीथोडकी फरफट झाली नव्हती. पुढे सरकारी नोकरी लागली. पाच वर्षांनी तिथेच कायम झालो. पण त्याच वेळी डॉ. लोहियांनी कायदेभंग करून संग्रामाचे शिंग फुंकले. विवेक सांगत होता की, वेडेपणा करू नकोस. मुलांच्या तोंडचे घास काढून घेऊ नकोस. तरी देखील डॉ. लोहिया आणि कापितांव मिरांदा यांची झालेली चकमक

म्युनिसिपल बिल्डिंगमधून दृष्टीस पडताच मी तेथून तीरासारखा निसटलो आणि रणांगणाच्या रिंगणात जाऊन पोचलो.

माझ्या जीवनाचे सर्वच महत्त्वाचे निर्णय माझ्या मनस्वीपणानेच घेतले आहेत आणि तो मला प्रसादरूपच ठरला आहे. मनस्वीपणा लाभायला भाग्य लागते आणि सर्व प्रकारच्या आपत्ती-विपत्तीला तोंड देऊन तो टिकवायला पुरुषार्थ लागतो असा माझा समज आहे आणि तसा माझा प्रत्ययही आहे. मला त्याची व्याख्या नाही सांगता यायची. कारण तो वाऱ्यासारखा आहे. स्वच्छंद आहे, तसा निरालंबही. हा मनस्वीपणा कोणत्या तरी अदम्य आंतरिक श्रद्धेमुळे येत असावा. ही श्रद्धा असते जीवनाच्या अक्षय ऐश्वर्यावरची. जीवनाचे जे जे आवाहन आपल्या आंतर ऊर्मीला वेध लावते, त्याच्यामागून जीव टाकून धावल्याने आपण संपन्नच होऊ असा खंबीर विश्वास तिच्यात अभिप्रेत असतो.

मी अशी आवाहने सतत घेत गेलो आणि त्यामुळे माझ्यातली सर्जकता सतत परिपुष्ट होत राहिली. माझ्या या अशा प्रवासात थोडेफार यशही आपणच माझ्या दारी येऊन पडले हे खरे. पण यश हा दो घडीचा पाहुणा आहे या सत्याचा विसर मी स्वतःला कधीच पडू देत नाही. आलेल्या पाहुण्याची करावी तशी त्याचीही योग्य सरबराई मी करतो. पण मी खरा जपत असतो तो माझ्या मनस्वीपणाला. मी लुंगी नेसून फिरायला जातो, नातीबरोबर रमी खेळतो, कुणालाही चटकन सलगीत घेतो. टेबल व्यवस्थित लावीत नाही, केवळ पत्रोत्तरे लिहिण्यात रोज दीड तास वाया घालवतो अशा माझ्या पत्नीच्या कितीतरी तक्रारी आहेत. तिच्या दृष्टीने मी कुठे कुठे चुकतो हे ती मला सारखे सांगत असते. मला अधिकाराने तसे सांगणारी माझ्या आईनंतर तीच काय ती आहे. मात्र मी यशस्वी नाही आणि म्हणूनच मैत्रिणीने दिलेले ते इंग्रजी सुभाषित अजून मी भिंतीला टांगलेले नाही.

कालचीच गोष्ट. माझ्या एका तरुण साहित्यिक मित्राने, एक चिंतनीय प्रश्न मजकडे छेडला होता. माझ्यासारखाच तोही गोमंतकीयच होता. त्याचे म्हणणे होते की, कोणत्याही साधनेला आवश्यक असलेले स्वास्थ्य जरी अजून गोव्यात असले तरी, साधकाला लागणारा बौद्धिक सहवास इथे मिळू शकत नाही. त्यामुळे त्याच्या प्रतिभेची उपासमार होते. तो वाढू शकत नाही. उलट तो खुरटत जातो. यावर मी त्याला म्हणालो, " सकृद्दर्शनी तुमचे म्हणणे खरे वाटते. पण विचारांती ते अर्धसत्यच आहे. आपल्याला वाटते की, आपण पुण्या-मुंबईसारख्या शहरात असतो तर तेथे उपलब्ध असलेल्या सर्व बौद्धिक सोयी आपल्याला सहज लाभल्या असत्या. आणि आपल्या साधनेत आपली प्रगती झपाट्याने झाली असती. पण तिथल्या साधकांना तुम्ही भेटलात आणि त्यांचा अनुभव तुम्ही विचारलात तर, ते तुम्हाला निराळीच रड सांगितील. म्हणतील, इथल्या या धावपळीत आणि गलबल्यात चित्ताची एकाग्रता दुर्लभ होऊन बसते. जाण्यायेण्यातच दिवसाचे किती तरी तास मोडतात आणि दिवस पडेतो जीवही मोडून जातो. साधनेला पोषक अशा सोयी विपुल आहेत खऱ्या, पण इथल्या या धबडग्यात त्यांचा फायदा घेण्याइतकी सवड असतेच कुणाला ? सारखा मागे वाघ लागलेला असतो. शहरात प्रसिद्धी सुलभ होते हे खरे, पण सिद्धी दुरावते हेही तितकेच खरे आहे. खेड्यांत पिकते आणि शहरात विकते हा नियम प्रतिभेलाही तितकाच लागू आहे.

आमची ही चर्चा वाढ रात्रीपर्यंत चालली आणि मी अंथरुणावर येऊन पडलो, पण मला झोप लागेना. गोव्यातल्या गोव्यातच आयुष्य घालवावे लागले असतानाही प्रतिभेच्या विविध क्षेत्रांत जी दिग्गजांसारखी मोठी माणसे इथे होऊन गेली ती माझ्या चित्तचक्षूंपुढून जाऊ लागली. सोहिरोबा आणि कृष्णभट यांच्यासारखे संतकवी, दाग्लाद फिलिप, नेर शावियेर आणि पिसुर्लेकर यांच्यासारखे विद्वान, बीनकार बाजी गुरव, लय भास्कर खाप्रूमाम, पणशीकर, तोटेकर यांच्यासारखे संस्कृत तज्ज्ञ, दादा

वैद्य आणि फोंडूशास्त्री यांच्यासारखे समाजधुरीण अशी किती नावे सांगावी ! आणि ज्यांचे फारसे नाव झाले नाही, पण गुणवत्तेने जे आपापल्या परीने थोरच होते असे आणखी किती तरी : असे अनामिक थोर प्रतिभावंत गावोगाव होते.

माझ्या लहानपणात माझ्याच बोरी गावात मी असे किती तरी पाहिले आहेत. ज्यांना मी पाहू शकलो नाही त्यांच्या अव्वल दर्जाच्या कलाकृती अजून त्यांच्या थोरवीची साक्ष देतात. नवदुर्गेच्या कांचोळीचे लावण्य पाहिले की, ज्या सुवर्णकाराने ती घडवली असेल त्याच्या अजोड धातुशिल्पज्ञतेने अजूनही आपण थक्क होऊन जातो. तिच्या पाषाणी पूजामूर्तीचे कमनीयत्व न्याहाळले की, बोरीतले पाषाणशिल्प केवढ्या उच्च अवस्थेला पोचले होते याचे तात्काळ प्रत्यंतर मिळते.

या मूर्तीच्या लावण्यावरून लहानपणीचे नवरात्रातले दिवस आठवले. प्रत्येक रात्री ती नव्या रूपात आणि नव्या वेषभूषेत प्रगट व्हायची. हे सारे कौशल्य तिच्या सेवेतल्या दत्ता देवाऱ्याचे असे. तिच्यावर गंधाचा लेप चढवून तिची रेखणी करण्यात त्याचा हातखंडा असे. रोज नव्या रंगाची जरीकाठांची शालू–चोळी तो तिला नेसवी आणि जमलेले देवीचे भजक कुळावी त्याची तोंड भरून प्रशंसा करीत. मखराच्या सजावटीने तर आम्हा पोरांचे डोळे दिपून जात. लाखी आणि हलकलई कागदाची फुले हरिबाबांनी कापलेली असत. त्यांची कातरण विलक्षण नखरेल असे. मखराच्या लहान मोठ्या चौकटीतली काचेवरची दशावतारांची आणि पौराणिक चित्रे दत्तू मान्यूनी चितारलेली असत. ही चित्रे अंड्याच्या बलकात रंग मिसळून दर्शनी भागाच्या उलट्या बाजूने रेखाटावी लागत.

गणेश चतुर्थीला आम्ही मुले घरोघर जाऊन गावातल्या एकूणएक गणेशमूर्ती बघत असू. प्रत्येक मूर्ती आकार प्रकारात वेगळी आगळी असे. गावचेच कलाकार त्या करीत. भजनी सप्ताहात रोज एक पार निघे. प्रत्येक पारात पुरुषभर उंचीची मातीची चित्रे असत. बहुंशी ती रविवर्म्याच्या चित्रांवरून केलेली असत. दिंडीतून त्यांची मिरवणूक नवदुर्गेच्या देवळापर्यंत जाई. दिंडीतली भजने तालासुरावर गाइली जात. टाळ कसे समेत वाजत. द्रुत लागली की, मुरदुंग्या धमाल उडवीत असे. तार सप्तकातल्या आलापीने रात्रीचा सारा आसमंत धुंद होऊन जाई. माझ्या गात्रांना तर ही कलेची मेजवानीच असे. त्या सगळ्या, कलाकारांची नावे माझ्या स्मृतीत आज कुठे आहेत ? पण त्यांचे संस्कार आजही माझ्यात ताजेतवाने आहेत ना !

असे कोणते ना कोणते कसब अंगी असलेले कितीतरी लोक तेव्हा आमच्या गावी होते. नरकासुराची मिरवणूक उत्तररात्री गावच्या रस्त्यातून निघायची, पण ती चुकू नये म्हणून आम्ही पोरं डोळे चोळून जागत असू. तो तीन पुरुष उंच असायचा. माणसाच्या पायाने चालायचा. त्याचे तोंड अक्राळविक्राळ असे, पण ते प्रत्येक वर्षी

नवीन असायचे. हे लाकडी तोंड तयार करायचा सुतारवाडीतला लवू मेस्त. केवळ हौसेपायी. त्याचे हे कसब पाहून जगन्नाथ बावाचा पुतळा करू शकेल तर हाच असे माझ्या वडिलांना वाटले. आणि सिद्धनाथ पर्वतावरच्या निळ्या पाषाणात त्यांनी तो त्याच्याकडून करवून घेतला, केवळ घरात असलेल्या त्याच्या फोटोवरून. आजही बावांच्या समाधीवर बसवलेला त्यांचा तो पुतळा आपण पाहू शकतो.

कुणी इंजिनियर स्नेही मला भेटायला आला तर, हटकून मी त्याला बोरीतली मरडे आणि कुळागरे दाखवायला नेतो. आणि ज्याला आज टिरेस ॲग्रिकल्चर म्हणतात ते किती नैपुण्याने तेथे उभारले गेले आहे हे त्याच्या नजरेला आणून देतो. ज्यांनी ती तयार केली त्या कसबी स्थपतींची नावे मला कुठे माहीत आहेत?

बोरीत माझ्या लहानपणी दहाबारा तरी पट्टीचे नेमबाज शिकारी होते. फटे देसाई हा त्यांतलाच. त्याने मारलेली पक्ष्यांची वाघीण केवढी मोठी होती हे पालखीत घातल्या जाणाऱ्या तिच्या कातड्यावरून सहज अजमावता येईल. देवीची मिरवणुकीची पालखी त्याने भरून निघते.

शिकारीवरून एकदम आठवण झाली ती पांडुरंगची. सकाळी त्याला रुपया देऊन ठेवला तर, दिवस पडण्याच्या आत मारलेला ससा तो चौसोपीवर आणून टाकी. त्याच्या हमखास नेमबाजीवर घरातल्या बायकामंडळींचा एवढा जबरदस्त विश्वास असे की, शिकार घरात येण्याआधीच त्या सागुतीचा मसाला वाटून ठेवीत. मी आणि माझा समवयस्क चुलत भाऊ विषमज्वरातून उठलो तेव्हा, टॉनिक म्हणून दादा वैद्यांनी आमच्यासाठी कवड्यांचा सूप सांगितला. एक आणि दोन दिवसच नव्हे तर, सतत सात दिवस ही कवड्यांची लावण वडिलांनी पांडुरंगला सांगितली. रोज रुपयाला चार या भावाने ते घरच्या खुराड्यात असल्यागत तो नेमाने घेऊन यायचा. त्या काळी आजार विकोपाला गेल्याशिवाय कुणी डॉक्टरकडे जात नसे. वापरातली औषधे झाडपाल्यांचीच असत. कुठल्या रोगावर कोणा झाडाचे पाळ, साल वा पाने हे जाणणारे गावात अनेक होते. त्या त्या माणसाला सांगून पाठवले की, औषध मिळून जाई.

गावातल्या अशा विद्याकलांच्या साधनेबद्दल किती सांगावे? ती माझ्या लहानपणची बोरी आता राहिलेली नाही. स्वातंत्र्य आल्यापासून खूप चांगल्या गोष्टी तिथे झाल्या आहेत. कौलारू खोपट्यांच्या जागी मंगळूर कौलांची घरे उभी झाली आहेत. रॉकेलचा धूर ओकणाऱ्या चिमण्या जाऊन घराघरात लख्ख वीज आली आहे. जुनेरांच्या जागी बायकांच्या अंगावर नायलॉनच्या साड्या झुळझुळू लागल्या आहेत. सणासुदीला त्यांच्या अंगावर दागिनेही दिसतात. कष्टी कुळवाडी लंगोटीत दिसत; त्या

ऐवजी आज त्यांची मुले चांगल्या गणवेशांत शाळेत जाताना दिसतात. त्यांतली जी मिळवती असतात ती नेटक्या पोषाखात असतात. त्यांच्या मनगटात घड्याळ असते गळ्यात सोन्याची साखळी देखील असते.

शेकडो वर्षांत न झालेले हे परिवर्तन स्वातंत्र्यामुळे अवघ्या वीस वर्षांत झालेले पाहून मोठे समाधान वाटते. पण अशी सुबत्ता आली असूनही कलाकसबांचा छंद, साहित्याचा छंद, विद्वत्तेचा ध्यास वा संगीताचा षोक क्वचितच दिसतो. हे असे माझ्याच गावात नव्हे तर, गोव्यातल्या सगळ्याच गावांत दिसते. गोव्यातली प्रतिभा स्वातंत्र्यानंतर अशी एकाएकी ओसाड कशी झाली, हा प्रश्न कोणाही सुविद्य मनाला छळणारा आहे. याला उत्तरच नाही का ? इतक्यात मला एक प्रसंग आठवला.

सत्तरी तालुक्यातल्या नगरगाव या दूरस्थ गावी महाराष्ट्र परिचय केंद्राच्या मदतीने तेथील लोकांनी एक कार्यक्रम आयोजित केला. स्वातंत्र्यसैनिक असलेल्या तेथील शिक्षकाने शिकवून तयार केलेल्या मुलांनी त्यात आपापले कौशल्य दाखवले होते. मुलींनी डोक्यावर तेवत्या समया घेऊन नाच केला. शेवटी समई हलू न देता सर्पमुद्रा घेतली आणि पायाशी टाकलेल्या नोटा ओठांनी टिपल्या. एका चार वर्षाच्या मुलीने तालासुरात ज्ञानेश्वरीतले पसायदान सुस्पष्ट उच्चारात गाऊन दाखवले, त्या दृश्यांनी माझे डोळे पाणावले. कुठेही जा, गोव्यात प्रतिभेची उणीव नाही, आहे ती तिच्या मशागतीची !

*

घोडा अडला का? भाकरी करपली का? आणि पाने कुजली का? या तिन्ही प्रश्नांचे उत्तर एकच. ते म्हणजे 'न फिरविल्याने' हे. आज घरोघर धूसफूस का? प्रत्येक संस्थेत भांडणे का? आणि प्रत्येक राजकीय पक्षात कलह का? या तिन्ही प्रश्नांचे उत्तरही एकच आहे. ते हे की, वडीलधाऱ्यांनी योग्यवेळी आपली भैरवी न म्हटल्याने.

माझ्या लहानपणी गावातली शहाणी माणसे सांगत की, आपली पायतणे आपल्या मुलाच्या पायांना चपखल बसली की, संसार मुलावर सोपवीत जावे आणि संतोषाने निवृत्त होऊन हरी हरी म्हणत बसावे. त्याने सल्ला विचारला तर तो जरूर सांगावा पण त्याच्या व्यवहारात लुडबूड करू नये. पण हे शहाणपण अजून काही आपण शिकलो नाही. वय झाले तरी, आपली अधिकारलालसा सुटत नाही. आपण लोकांनाच नव्हे तर स्वतःलाही पढवीत असतो की, आपण संसारात लक्ष घालतो, त्यासाठी खस्ता खातो, ते काही अधिकारलालसेमुळे नव्हे, तर मुलाचे भले व्हावे एवढ्याच बुद्धीने. संस्थांचे चालक आणि पक्षांचे नेतेही हेच सांगत असतात. आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ या वडीलधाऱ्या मंडळींचा मोठ्यांतला मोठा कोटिक्रम कोणता? तर आम्ही अधिक पावसाळे पाहिले आहेत. म्हणून आपल्या गाठीला अनुभव अधिक आहे. अर्थात आमच्या सांगण्याप्रमाणे चालण्यातच नव्या पिढीचे हित आहे.

निव्वळ वयामुळे शहाणपणा येतो हे मुदलातच खोटे आहे. शिवाय कालच्या जमान्यात जे शहाणपण फलप्रद ठरले ते नव्या जमान्यात विफलच नव्हे तर, विनाशक ठरणे शक्य आहे, हे नाकारून कसे चालेल? नव्या जमान्याबरोबर जीवनाच्या गरजा बदलतात, विचार आचार बदलतात, नवे प्रश्न उत्पन्न होतात आणि त्यांची उत्तरे किंवा त्यांच्यावरचे उतारेही नवे असतात, हे आपण लक्षातच घेत नाही. ज्याचे लग्न आईवडिलांनी ठरवलेल्या मुलीशी झाले तो, प्रेमात पडलेल्या

---

**भैरवी न म्हटल्याने**

---

आपल्या मुलाला योग्य मार्गदर्शन कसे काय करणार? जिचे लग्न सोळावे वर्ष लागण्यापूर्वीच झाले होते, ती आई पंचविशीतल्या आपल्या अविवाहित मुलीच्या मनोयातना कशी काय उमजू शकणार? सात वर्षे ज्या मुलाला परिस्थितिवश अमेरिकेत एकाकी जीवन काढावे लागले तो आर्थिक, व्यावसायिक वा भावनिक भोवऱ्यात सापडला तर, त्याचा बाप कितीही सुविद्य असला तरी, त्याला रास्त सल्ला कसा काय देऊ शकणार? कल्पकता, सहानुभूती आणि ज्ञान या त्रयीच्या बळावर एखादा बाप आपल्या अशा स्थितीतल्या मुलाचा मित्र आणि सल्लागार होऊ शकणारच नाही असे नाही. पण अशी वडीलधारी एकंदरीत विरळाच.

बहुतेकांची स्थिती झाडांसारखीच असते. ती ठराविक उंचीपर्यंतच वाढतात आणि मग थांबतात. त्यांच्या मनांची स्वागतशीलताच संपते. नवे विचार ती आत्मसात करू शकत नाहीत. नव्या आचारांची सुभगता किंवा अपरिहार्यता ती उमजू शकत नाहीत. आयुष्यात लाभलेल्या यशानेच त्यांना एक प्रकारचे मानसिक आणि बौद्धिक आंधळेपण आलेले असते. मग आपण चालवतो तो दुराग्रह असतो हे यांच्या लक्षातही येत नाही. आपण नव्या पिढीच्या सुखाच्या आड येतो आहोत, स्वातंत्र्याच्या आड येतो आहोत, विकासाच्या आड येतो आहोत याचे त्यांना भान रहात नाही. ती आपल्याला जुमानीत नाहीत असा ग्रह करून घेऊन ती क्रुद्ध लागतात, त्रागा करू लागतात आणि स्वतःच्या आणि इतरांच्या जीवनस्वास्थ्यालाच तडा पाडतात. समाजाच्या विकासाला ती अडसर होऊन तर बसतातच शिवाय आत्मविकासाला आंचवून दयनीयही बनतात.

यावरचा बिनतोड उपाय म्हणून आपल्या पूर्वजांनी वानप्रस्थ आणि संन्यास हे दोन आश्रम सांगितले. 'उरलो उपकारापुरता' अशा भावनेने घरात वा समाजात वावरणे म्हणजे वानप्रस्थ आणि संपूर्ण इच्छान्यास साधणे म्हणजे संन्यास अशी ही योजना होती. समाजातल्या अंतःकलहावरचा हा नामी उतारा तर होताच, पण त्याच बरोबर माणूस अंतःकलहातून सोयीस्करपणे सुटावा अशी व्यवस्थाही तिच्यात अनुस्यूत होती. या व्यवस्थेमुळे दोन पिढ्यांमधल्या कलहाचे मूळच छेदले जाई.

राजे लोक मुलगा वयात येताच त्याला यौवराज्याभिषेक करीत आणि तो स्वतःच्या हिमतीवर राज्यकारभार करण्याइतका समर्थ झाला की, वनाची वाट धरीत. त्यामुळे राज्यात यादवी होण्याचे टळे आणि कारभाराचा गाडा सुरळीत चाले. राजाच असा वागे असे नव्हे, तर प्रजाही हाच दंडक पाळीत असे. माझ्या लहानपणी देवीच्या पालखीच्या प्रत्येक पेण्यागणीक कलावंतिणीचे नाचगाणे चालत असे. पण त्यांच्यातही हा दंडक पाळला जाई. आपली मुलगी वयात आली की, तिची आई चंद्रज्योतीच्या उजेडात राहाण्याचे कटाक्षाने टाळीत असे. फारच आग्रह झाला तर, पालखी मार्गस्थ

होण्याअगोदरचा झुलवा बोलून ती काळोखात अदृश्य होई. आपल्या मुलीच्या उत्कर्षासाठी स्वतः होऊन ती अशी मागे पाय घेत असे. हा दंडक सर्वच पाळीत, असे नाही. जे पाळीत नसत ते कलहाची शिकार होत. पण जे पाळीत ते आपले आणि समाजाचे हित साधीत. आणि त्यांचा दुवा घेत. या दंडकाला सार्वत्रिक पाळा लाभत होता असे नाही. मात्र लोकमानसात त्याला प्रतिष्ठा होती. पण कलहमूलक अशा वर्णव्यवस्थेच्या बाबतीत आपण आत्यंतिक आग्रह धरून तिची जातिव्यवस्थेत परागती केली आणि तिच्यावरचा उतारा अशी जी आश्रमव्यवस्था होती तिला मात्र सपशेल फाटा दिला.

आपल्या देशाचा इतिहास पाहिला तर, आपण ही आश्रमव्यवस्था जोवर पाळली तोवर समाजाचे स्वास्थ्य बऱ्याच अंशी टिकले. पण पुढे मुसलमान राज्यकर्ते आले. आपली आश्रमव्यवस्था त्यांच्या गावीही नव्हती. कंबर वाकली तरी स्वेच्छेने राज्यत्याग करून ते कधी बाजूला झाले नाहीत. मोंगलांनी तर या बाबतीत कहरच केला. ते वाचलेही पुष्कळ. मुलगा पन्नाशीला आला तरी बाप तख्तनशीन. त्यातूनच बापाला तुरुंगात डांबणे, भावांची मुंडकी उडवणे, बंडाळ्या करून राज्यात बेदिली उत्पन्न करणे अशी अनर्थपरंपरा सुरू झाली. घरात काय, संस्थांत काय किंवा राजकारणात काय, ही मोंगलांची परंपराच आजही आपण चालवीत असतो. सारी कलहपरंपरा आपल्या या वृत्तीतूनच उगवली आहे.

आपल्या पुरुषार्थाची अभिवृद्धी आणि सांगता नव्या पिढीचा पुरुषार्थ फुलवण्यात आहे हे आपण जितक्या लवकर ओळखू, तितके ते उभयपक्षी श्रेयस्कर आहे. सरकारी नोकरीत ठराविक वय होताच निवृत्त व्हावेच लागते. त्याप्रमाणे ठराविक वय होताच आपण स्वेच्छेने निवृत्त व्हायला शिकले पाहिजे. यालाच मी भैरवी आळवणे म्हणतो.

रानडुकरांच्या हिंडातला जो सर्वज्येष्ठ असतो त्याला आब म्हणतात. तो सर्व माद्यांचा नर म्हणून मग्रुरीने वागत असतो. पण हिंडातले छोटे डुक्कर वयात आले की, त्याची दादागिरी चालू देत नाहीत. एकजूट करून ते त्यास हुसकावून तरी लावतात किंवा त्याला फाडून तरी टाकतात. आपल्याला आपला आब राखायचा असेल तर, आपण होऊन बाजूला होण्याची कला आपण अंगवळणी पाडून घेतली पाहिजे. आणि यशाच्या शिखरावर असतानाच आपली भैरवी म्हटली पाहिजे.

*

ग्रंथालय ठाणे
३००६
निबंध २४०३८
३।११।८
शाखा (स्थळ प्रत)

मी नेहमी माझ्याच तारेत मस्त असतो. त्यामुळे माझ्या वयाचे भान मला नसतेच. रवींद्रनाथांनी आपल्या एका कवितेत म्हटले आहे की, आपण सर्वांचा समवयस्क आहे. माझे थोडेबहुत असेच आहे. जो स्नेहाने जवळ येतो त्याच्या वयाचा मी बनतो. त्यामुळे त्याच्या-माझ्या तारा चटकन जुळतात. माझ्या लहानपणी गोव्यातल्या आमच्या हिंदु समाजात, वाढदिवस साजरे करण्याची प्रथा नव्हती. मी आईवडिलांचा थोरला मुलगा. पण माझ्या लहानपणी माझा कधी वाढदिवस साजरा झाला नाही. पण माझी पन्नाशी आली तेव्हा, माझ्या प्रकाशकमित्रांनी पुण्याला माझी पाच पुस्तके एकाच वेळी प्रकाशित केली आणि माझा वाढदिवस मोठ्या थाटाने साजरा केला. तेव्हापासून आठवण ठेवून माझे आप्तेष्ट आणि चहाते प्रत्येक वाढदिवसाला माझे अभीष्टचिंतन करायला येऊ लागले आणि माझ्या वाढत्या वयाची जाण मला देत राहिले.

माझ्या साठीचा समारंभ तर फार मोठ्या प्रमाणावर झाला आणि तब्बल सात तास चालला. त्यावेळी मला वाटले, मुद्दल हाताला चढले. आता मिळेल तो दिवस फाज्याचा, म्हणजे बोनसचा. अशी फाज्याची दहा वर्षे मिळाली आणि हा हा म्हणत मी सत्तरीला आलो. आता दिवस फार थोडे राहिले आहेत हे मला दिसते. पण मला हुरहुर अशी अजून लागलेली नाही. आतली तार अजून झिणझिणतेच आहे. हल्लीच्या हल्ली माझे बरेच स्नेही गेले. त्यामुळे अनेकदा विषादाने झाकळून गेलो. जगण्याची आसक्ती नाही, पण मरणाची उतावीळही नाही. कारण मला वाटते, मी स्वभावतःच जीवनावर अनुरक्त आहे.

मी साठीला आलो तेव्हा, एकदा कविवर्य पाडगावकरांनी मला विचारले, 'मृत्यूच्या विचाराने तुम्ही कधी विलक्षण अस्वस्थ होत नाही का?' मी त्यांना म्हणालो, 'नाही. माझा पहिला मुलगा वारला. मग एक मुलगी वारली, निकटचे अनेक आप्तेष्ट वारले. त्यावेळी व्हायचे दुःख तर झालेच. पण हे जिवलग आपल्या

---

जीवनातून कायमचे लोप पावले असे मला कधीच वाटले नाही. ' वुई आर सेव्हन ' या वर्डस्वर्थच्या कवितेतील मुलीचे मन मी घेऊन आलो आहे की काय देव जाणे ! ती आपल्या दिवंगत भावंडांच्या गोष्टी सांगते. पण प्रत्येक वेळी, ' वुई आर सेव्हन ' म्हणते. कधीच ' वुई वेअर सेव्हन ' म्हणत नाही. कारण तिची भावंडे तिच्या मनात सदैव हयात असतात. माझेही असेच आहे. मला वाटते, माझी एक उपजत धारणा त्याला कारण आहे. मला स्पष्ट आठवते, मी पाच वर्षांचा असल्यापासून मला वाटत आले आहे की, माझ्या जन्माआधी मी होतो आणि मृत्यूनंतरही मी असणार. ही धारणा मला कशी लाभली हे एक कोडेच आहे. गीता, अध्यात्म वगैरे वाचण्या-पूर्वीच माझी ही धारणा पक्की होती.

अशीच आणखी एक धारणा मी घेऊन आलो, ती ईश्वराबद्दलची. देवघराच्या दिवाणखान्यात अन्य कुटुंबियांबरोबर भजने आळवताना, समोरची दत्ताची रंगीत लाकडी मूर्ती सजीव झालेली मी अनेकदा लहानपणी पाहिलेली आहे. ही धारणा पुढे विकसित होत गेली आणि ' स्थिरचर व्यापुनि अवघा तो जगदात्मा दशांगुळी उरला ' या पातळीवर ती आता स्थिर झाली आहे.

इंग्रजीतले नास्तिकतेवरचे बरेचसे साहित्य मी तरुण वयात वाचले आणि ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलच्या शंकाकुशंकांनी काही काल मी हैराण होऊन गेलो. पोरका होऊन रानात सापडल्यासारखा झालो...पण ही अवस्था फार काळ टिकली नाही. ज्ञानेश्वरी, गाथा, रामतीर्थ विवेकानंदांचे वाङ्मय आणि रवींद्रनाथांचे ' साधना ' हे पुस्तक यांनी त्या काळात मला सावरले. प्रत्यक्षातही ईश्वराची प्रचीती जशी आतून, तशीच बाहेरूनही मिळत राहिली. श्रद्धा असली तर, देव प्रसंगाला धावतो या संतोक्तीचा पडताळा येत राहिला. कधी शक्तीचा संचार करून, कधी प्रातिभदर्शन देऊन, कधी माणसाच्या रूपाने, कधी परिस्थितीच्या आकस्मिक पालटाने अशा नाना तऱ्हांनी तो पावतो याचा विपुल अनुभव मी घेतला आहे. अजून घेतो आहे. त्यामुळे ' जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हाती धरोनिया ।। ' याविषयी माझी खात्री होऊन चुकली आहे. समोर ठाकलेला प्रसंग केवढाही दारुण असो, ऐन वेळी ईश्वराचा हात साह्याला येईलच येईल, ही माझी श्रद्धा रतिमात्र ढळत नाही आणि त्याचमुळे मी संकटाला डगमगत नाही.

माझी आजी म्हणायची, मी वरदशेचा मुलगा आहे. आज ते मला बरे वाटते. आमचे घर तसे नावलौकिकाचे, पण माझ्या शिक्षणाचा काळ आला तेव्हा त्याला पडता काळ आला. घरचा आब राखण्यातच वडिलधाऱ्यांची शक्ती खर्ची पडायची. धडपडत मी शिकत राहिलो. कठीण प्रसंगी कुणी तरी महाभाग पाठीशी उभा राहिला.

मला गळा चांगला होता. तो चांगला फिरतही असे. मामा पद्धतीने गाणारे होते. गवई व्हावे असे पुष्कळ वाटे. पण तालीम मिळू शकली नाही. वडील भित्तिचित्रे फार सुंदर काढीत. ती पाहून मी चित्रे काढू लागलो. चित्रकला शिकण्याची सोय उपलब्ध असती तर, चित्रकार झालो असतो. तशी हौसही होती. पण ती संधी कधी लाभलीच नाही.

भजने, पदे कानावर पडत राहिली. ती पाठ होत गेली. काही घरातल्या मंडळींनी घटवून घेतली. शब्दांची, तालसुरांची आणि विविध छंदांची संथा अनायास मिळत गेली, आणि त्याचा परिपाक म्हणूनच की काय, कवितने मला झपाटले. चोरून कविता करीत असे. पण एका योगायोगाने ती एका जाणकाराच्या हाती गेली. आणि त्याच्याच प्रोत्साहनाने ' प्रतिभा ' या नावाने संग्रहरूपात प्रकाशित झाली. तेव्हा माझी विशीदेखील उलटली नव्हती. त्याच वेळी, आजीच्या चुलतभावाच्या मुलीशी माझे लग्न झाले. मरताना मला आजी म्हणाली होती की, ' आपल्यामागे आपल्यासारखीच तुझी काळजी ती घेईल. तू माझ्या म्हणण्याला रुकार दिलास तर मी सुखाने मरेन. ' तिला समाधानाने मरण यावे म्हणून मी तिला शब्द दिला. दोन बहिणींची लग्ने आणि तीन भावांची शिक्षणे आटोपल्याशिवाय मला लग्न करावयाचे नव्हते. पण वडीलधाऱ्यांनी ठरवलेल्या लग्नाला विरोध करण्याची हिंमत मला झाली नाही. लग्न झाले आणि वडिलांचा संसार आणि हा नवा संसार अशा दोन संसारांचे ओझे मला शिरावर घ्यावे लागले. त्या पायी खूप ओढगस्त झाली. पण ईश्वरकृपेने सर्व भावंडांचे संसार सुखाचे झाले आहेत. माझाही संसार ठीक झाला आहे. आठही मुले सुस्थित आहेत. अठरा नातवंडे आणि दोन पणतवंडे सुखात वाढत आहेत. आजोबा, पणजोबा कुणीच म्हणत नाहीत. सगळी आबाच म्हणतात.

माझे शिक्षण यथातथाच. मी म्हणण्यासारखा बुद्धिमानही नाही आणि शहाणा तर नाहीच नाही. आजीला शब्द मी जसा तडकाफडकी दिला, तसेच आयुष्याचे सर्व महत्त्वाचे निर्णयही मी तडकाफडकीच घेतलेले आहेत. उत्तम नोकऱ्या चालून आल्या तेव्हा, त्या काव्यसाधनेत विक्षेप आणतील म्हणून मी नाकारल्या. पाच वर्षांच्या सेवेनंतर शिक्षक म्हणून पोर्तुगीज राजवटीत कायम झालो होतो तेव्हाच, संसार उधळून डॉ. लोहियांनी सुरू केलेल्या स्वातंत्र्यसंग्रामात सामील झालो. माझे असे सगळेच निर्णय अंतःप्रेरणेने घेतले गेले. माझ्या जीवन-साधनेला आणि काव्य-साधनेला राजकारण जोपर्यंत उपकारक ठरले, तोपर्यंत मी त्यांत जीव तोडून खपलो. आणि जेव्हा ते त्यांना मारक ठरणार असे वाटले, तेव्हा त्यांतून हात धुऊन मोकळा झालो.

आकाशवाणीत पंधरा वर्षे नोकरी केली. पण सतत राजीनामा खिशात ठेवून. त्यामुळे ताठ मानेने अंगावरल्या जबाबदाऱ्या पार पाडता आल्या. पत्नी नेहमी सांगायची की, सहा मुलींच्या बापाला एवढी ताठ मान ठेवून चालत नाही. पण ती वाकवावी न लागता सगळ्या मुली सुस्थळी पडल्या. साठीत मी आकाशवाणीतून निवृत्तिवेतनाशिवाय निवृत्त झालो. त्यानंतर चांगली मानाची नोकरी चालून आली होती. पण मी तेव्हा कौटुंबिक जबाबदाऱ्यांतून मोकळा झालो होतो. त्यामुळे ती नाकारून, स्वतःच्या मनाचे छंद पुरवण्याचे मी ठरविले. या गोष्टीला आता दहा वर्षे होत आली आहेत. पण माझे ठीक चालले आहे. अजून नवनवे सुचत असते. लिहूनही होते. मी जणू चिरंजीव आहे अशा थाटात नवनवे साहित्य आणि अन्य गोष्टींचे संकल्प करीत असतो. जुन्यांना उजाळा देत असतो. अजून गुणगुणत असतो. नव्या कविता ओठावर उमलत असतात. उजव्या डोळ्यात मोतीबिंदू झाला आहे. पण सारखे वाचीत असतो. लेखन-वाचनाचा कंटाळा आला की, रमी खेळत बसतो. कधी मुलींशी, तर कधी नातवंडांशीदेखील. कौटुंबिक असो की सार्वजनिक असो, जे काम अंगाला येऊन चिकटेल ते मनापासून करतो आणि त्यात रमून जातो.

मागल्या माझ्या वाढदिवसाला माझे काही स्नेही आले होते. आम्ही कळंगूटच्या किनाऱ्यावर तीन दिवस मोठ्या आनंदात घालवले. निरोप घेताना ते तरुण स्नेही मला म्हणाले, तुमच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाला आम्ही अवश्य येऊ. मी हसत हसत त्यांना म्हणालो, ‘ तोपर्यंत तुमच्या प्रकृत्या नीट सांभाळा ! ’ तेव्हा पिकलेला हशा मी अजून ऐकतो आहे.

मरण ही परमसुखाची निद्रा आहे आणि मृत्यू हा परम सखा आहे अशी माझी धारणा आहे. तरीही तो आकस्मिक यावा अशी माझी इच्छा आहे. वाटते, माझ्या स्नेह्यांनी म्हणावे-काय ! बोरकर गेले ? परवाच तर त्यांनी आमच्याकडे आपल्या काव्यगायनाची बैठक रंगवली होती !

माझ्या तशा खोडी अनेक आहेत. पण त्यांतली सर्वांत महत्त्वाची आहे ती नेहमी नवनवे संकल्प करण्याची. माझे एक स्नेही आहेत. ते सैन्यात होते. आता ब्रिगेडियर म्हणून निवृत्त झाले आहेत. ते उत्तम गायक आहेत. तसेच तयारीने वाजवणारे वादक आहेत. मला हे माहीत होते. पण त्यांनी आपल्या काष्ठशिल्पांचे प्रदर्शन भरवीपर्यंत ते अव्वल दर्जाचे काष्ठशिल्पी आहेत याचा मला दादपत्ता नव्हता.

प्रदर्शनातली त्यांची एकाहून एक बेहतरीन शिल्पे झाडांच्या वेड्या-वाकड्या पाळांमुळांपासून तयार केली आहेत. आणि तीही त्यांचे नैसर्गिक आकार हेरून, त्यांची फारशी काटछाट न करता. हे जेव्हा माझ्या लक्षात आले, तेव्हा माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाही. लगेच सव्वाशे रुपये खर्च करून अशा काष्ठ-कामाला लागणारी सुतारी आवते मी खरेदी केली. मला चित्रकलेचे थोडे अंग आहे. ढगांत, टिकल्यांच्या फरसबंदीत, झाडांच्या फांद्यांत आणि सहज सांडलेल्या पाण्यात मला तऱ्हातऱ्हांच्या आकृती दिसतात. त्यामुळे हे काम मला सहज झेपेल असे वाटले.

एक संकल्प एकदा करून झाला की, तो नेटाने तडीला न्यायचा असतो. हे अवधान मला नसते. त्याला नीट हात घातला नाही तोच, मी दुसरा संकल्प करून बसतो. माझ्या या दुसऱ्या खोडीमुळे पहिला तसाच पडून रहातो. माझ्या काष्ठ-शिल्पांच्या संकल्पाचे अगदी तसेच झाले. एक दिवस, ते करण्यासाठी मी गावी जाऊन मोठ्या शिकस्तीने पाळेमुळे हस्तगत केली. आणि मोठ्या उत्साहाने आवतांची पेटी बाहेर काढली. आणि पहातो तर काय ! गंज येऊन ती मातीमोल झालेली !

माझ्या ह्या असल्या खोडींपायी माझ्या अनेक संकल्पांचे मातेरे झाले. कितीतरी साहित्यसंकल्प अर्धवट पडलेले आहेत. रवींद्रनाथांचा गळा, ते पासष्टीत होते

---

तेव्हाच गेला होता. हे त्यांच्या ध्वनिमुद्रिका ऐकून जेव्हा अक्षरशः माझ्या ध्यानात आले. तेव्हा अक्षरशः माझ्या डोळ्यांत आसवे उतरली. मी लगेच संकल्प करून टाकला की, आता वेळ गमवायचा नाही. आरत्या पाचही भागांतल्या कविता, निदान त्यांतल्या निवडक, ध्वनिमुद्रित करून ठेवायच्या. त्यासाठी अमेरिकेहून येताना मी टेपस् आणि टेपरेकॉर्डर घेऊनही आलो. वस्तुतः आकाशवाणीत माझी पंधरा वर्षे गेलेली. दुसऱ्या कोणावरही न विसंबता रोज एक तासाचे ध्वनिमुद्रण करून टाकणे मला सहज शक्य होते. पण अमेरिकेहून परतून तब्बल एक वर्ष उलटले तरी, माझ्याकडून अजून माझी एकही कविता ध्वनिमुद्रित झालेली नाही. हे लक्षात आले की, मी जणू विधात्याचा अंतच पहात आहे असे मला वाटू लागते. मी आता एका-हत्तरी ओलांडण्याच्या बेतात आहे. गळा केव्हा हातचा जाईल याचा नेम नाही, हे मला चांगले माहीत आहे. तरी देखील माझे संकल्पदौर्बल्य चालूच आहे.

मोठ्या संकल्पांच्या बाबतीतच हे असे घडते असेही नाही. आपल्या कपाटातली पुस्तके नीट शिस्तीत लावणे ही किती साधी गोष्ट. ती केलेली नसली तर, कितीतरी वेळ निष्कारण वाया जातो; एवढेच नव्हे तर, जमलेला लेखनाचा मूडही बिनसतो. मला हे सारे माहीत आहे आणि तरीही हे निकडीचे काम सोपे असूनही वेळच्या-वेळी मला निभत नाही.

भक्तांची कामे विठ्ठल नाना रूपांनी येऊन करीत असतो हे साधुसंतांच्या कथां-वरून मला ऐकून माहीत आहे. माझे अनेक संकल्प धूळ खात पडलेले पाहून तो अनेकदा मला हातभार लावायला आलेला आहे. अजून येतो अशी माझी भावना आहे. गेल्या पंधरवड्यातलीच गोष्ट सांगतो. मला कपाटातली पुस्तके नीट लावायची होती. पण कसले ना कसले निमित्त होऊन हे काम राहून जाई. हे असे चालले असताना, अहमदनगरचा एक तरुण कवी एकाएकी माझ्या घरी आला. म्हणाला, "तुम्हाला पूर्वसूचना न देता आलो. कारण कोवाडला रणजित देसाईंकडे आलो असताना तुम्ही आजारी असल्याचे कळले." मी म्हणालो, "माझी प्रकृती तशी ठणठणीत आहे. पण इतक्या लांबून आलाच आहात तर, चार दिवस थांबा" तो थांबला. तो मला मुलासारखा. त्याची माझ्यावरची निष्ठाही देवावर असावी तशी. त्याने कपाटातल्या माझ्या पुस्तकांची अवकळा पाहिली. आणि चारही कपाटांतली पुस्तके नीट लावून दिली. नंतर त्याच्या लक्षात आले की, अभ्यासिकेच्या एका कोपऱ्यात बांधून ठेवलेल्या वृत्तपत्रांचा जाडजूड भारा आहे. यासंबंधी त्याने विशेष चौकशी करताच मी म्हणालो, "यात माझे छापून आलेले लेख आहेत. त्यांची कात्रणे डकवून टाकण्यासाठी, तो पाहिलास, बाउण्ड करून आणलेला कोऱ्या पानांचा ग्रंथराज!" झाले; दुसऱ्या दिवसापासून तो कात्रणे चिकटवायला बसला. आणि दोन दिवसांत ते काम त्याने उत्तम तऱ्हेने करून टाकले.

विठ्ठल चतुर्भुज थोडाच येतो! तो येतो तो असाच अकस्मात. या तरुण कवी सारखा. हा तरुण कवी निघून गेल्यावर विठ्ठलच माझी दोन निकडीची कामे करून गेला अशी माझी भावना झाली. आणि मी भलताच हळवा झालो. दुसऱ्या दिवशी उगीच मी त्या लावलेल्या पुस्तकांची चाळवाचाळव चालवली. कदाचित त्याच्या हस्तस्पर्शाच्या लोभाने असेल. आणि खरेच तो मला अकस्मात भावला, आणि पावलाही. तो कसा? तर १९७८ सालची डायरी माझ्या हाती येऊन मी ती सहज उघडली, तर तीत खालील मजकूर लिहिलेला होता—

'आज पहाटे पाच-सहाच्या दरम्यान मला एक विस्मयकारक स्वप्न पडले. कुठल्या तरी निमित्ताने मी भास्करराव तांब्यांकडे पोचलो आहे. त्यांच्याशी झालेल्या बोलण्यात, त्यांनी साधनेवर भर दिल्याचे स्मरते, पण ते नेमके काय बोलले ते स्मरत नाही. मग वडांच्या पारंब्या पकडून ते लांब झोके घेत एका झाडापासून दुसरे, दुसऱ्यापासून तिसरे अशी तीन चार झाडे पकडीत गेले. त्याच्यावरून मी जायला निघालो तेव्हा मला म्हणाले, "माझा फार मोठा सत्कार आयोजित केला गेला आहे. मी तिकडे जाऊ शकत नाही. माझ्या वतीने तुम्हीच जा." मी होकार देऊन त्यांचा निरोप घेतला. दहावीस पावले चालून गेल्यावर माझ्या लक्षात आले की, मी त्यांना दंडवत घातला नाही. म्हणून परतलो. ते दारात थांबलेलेच होते. मी त्यांना दीर्घदंड नमस्कार घातला. ते मला म्हणाले, "अजून तुम्हाला चौदा वर्षे आयुष्य आहे. जमेल तितके उरकून घ्या."

ही नोंद पाहिल्यावर मी एकदम चमकलो. झोपेतून गदगदा हलवून उठवल्यावर वाटावे, तसे काही तरी वाटले. गेल्या वर्षी सत्तरी उलटली तेव्हा माझ्या मनाने घेतले होते की, आता मिळतील ते दिवस बोनसचे. जीवनावरची माझी अनुरक्ती तिळमात्र उणी झालेली नाही. तरी देखील, प्रयाणाचे प्रस्थान मी मनाने काढून ठेवले होते. पण त्या गुरुवदेशाने मला काही नव्या जाणिवा दिल्या. साधनेत शैथिल्य येऊ द्यायचे नाही, जमेल तितके तत्परतेने उरकून घ्यायचे आहे. निरवानिरवीचे कारण नाही. गुरुवर्यांनी सांगितलेल्या चौदा वर्षांचा हिशेब मी मनातल्या मनात करून पाहिला. यातली अजून अकरा राहिली आहेत हे लक्षात आले. त्यामुळे अर्धवट राहिलेले संकल्प पुरे करायचे आणि याचबरोबर नवीन संकल्पही करीत रहायचे असे माझ्या मनाने घेतले आहे. नाही तर पुढची अकरा वर्षे, धून लागल्यागत सारायची कशी!

*

मी जेव्हा मोकळा असतो, निर्वेध असतो तेव्हा, भुंग्यासारखा सारखा गुणगुणत असतो. तो आता माझा स्वभावच बनला आहे. तोंडातली ओळ कधी जुनी असते, तर कधी नवी असते. कधी दुसऱ्याची असते, तर कधी माझी स्वतःचीच असते. गुणगुणता गुणगुणता तिच्यावर माझे ध्यान लागते आणि तिच्या अर्थच्छटेचा एक आगळा पैलू मला अचानक जाणवतो.

परवा अगदी असेच झाले. मी माझे एक जुने हिंदी भजन गुणगुणत होतो. त्याचे ध्रुवपद होते– ‘ जो कोइ चितसुध होई । उसको सहज मिलेरे साई ’ हे गीत गुणगुणता गुणगुणता त्यातल्या ‘ एक दिले मुस्कान मिले तो, दस लाख रतन कमाई ’ या ओळीवर येऊन मी ठेचलो. तेव्हा तिच्याकडे एकाएकी माझे ध्यान वेधले गेले. मनात आले, दिलखुलास हास्य आताशा किती दुर्मिळ होत चालले आहे. ते सहजगत्या लाभले तर, दशलक्ष रत्ने एकदम हाती आल्याचा आनंद होतो.

लहानपणी माझ्या गावात अशी मनमोकळी हास्ये किंवा स्मिते मला पावलो-पावली मिळत. विशेषतः गावढ्या कुणब्यांत. त्यांच्यासारखे हसणे पांढरपेशांना जमत नाही. आणि एके काळी जे थोडे त्यांना जमत होते, तेही शहरी वळणामुळे आणि पाश्चात्य विद्येमुळे त्यांच्या मुद्रेवरून मावळले आहे. खोटे खोटे हसणे हे त्यांच्यातच मी जास्त पाहिले आहे. छद्मी हसणे, औपहासिक हसणे, मतलबी हसणे, उदास हसणे, भयप्रद हसणे, संशययुक्त हसणे असे हसण्याचे अनेक विकृत, विविध प्रकार मी त्यांच्यातच अधिक पाहिले आहेत. हे विकृत हास्यप्रकार फार लवकर माझ्या ध्यानात आले. त्याचमुळे फार पूर्वी, ‘ दूधसागरास ’ या माझ्या कवितेत मी म्हणून गेलो आहे– ‘ विष द्याया हसति कुणी । पचवाया हसति कुणी । हास्य अकारण तारक रे, तुझेच सुंदरा. ’

याच्या उलट, निरागस बालकाचे हास्य पहा. ते फाटक्या चिंध्यांत असले आणि चिखलाने माखलेले असले तरी, त्याच्या उत्स्फूर्त, आकस्मिक हास्याने सारा आसमंत

हर्षाने उजळून निघतो. संतपरमहंसाचे हास्य देखील असेच सारे त्रिताप विसरायला लावणारे असते. हसणाऱ्या रामकृष्ण परमहंसांचे चित्रसुद्धा किती प्रसन्नकारी असते! कोणताही हसणारा आदिवासी पहा. तो सुरूप नसला तरी, त्याच्या निर्मळ, विमुक्त हसण्यामुळे त्याच्या मुद्रेवर एक आगळेच सौंदर्य झळाळू लागते. अमेरिकेच्या माझ्या दोन्ही दौऱ्यांत मला लाख मोलाची आणि अविस्मरणीय अशी जर कोणती गोष्ट आढळली असेल, तर ती तेथील निग्रो लोकांचे हास्य. हे लोक इतके सुंदर हसतात की, यांना फारसे रूप नसून देखील ते आपल्याला आकृष्ट करतात. आणि त्यांची जवळून ओळख व्हावी असे आपल्याला वाटू लागते. अशा हास्याचे सौंदर्य काही आगळेच असते. रूपाशी याचा फारसा संबंध नसतो. त्याचा संबंध असतो जेथून ते उगवते त्या निरागस, निष्कपट अंतःकरणाशी. अशा अंतःकरणाची माणसे निर्मळ असतात, आशावादी असतात. जीवनाविषयी त्यांना उत्साह असतो. माणसाच्या चांगुलपणावर त्यांची श्रद्धा असते आणि अन्य कोणत्याही गोष्टीपेक्षा तो त्यांना अधिक प्रिय असतो. अशी माणसे आपल्या सहज हास्याने आपला हर्ष जातील तिथे उधळीत असतात. ज्याला असे हसता येते, त्याच्यासारखा भाग्यवान तोच.

अशा हास्याच्या रूपाने त्याला नंदनवनाचा दरवाजा उघडा झालेला असतो असेच मी म्हणेन. आणि हे नंदनवन कोणते म्हणाल तर, ते मिटून असलेले माणसाचे मन. ते एकीकडून प्रेमाला आसुसलेले असते. आणि दुसरीकडून प्रेम द्यायला आतुरलेले असते. फक्त प्रेम द्यावे कसे आणि घ्यावे कसे याची गोम त्याला कळलेली नसते. निर्मळ, निरागस हास्याची किल्ली ज्याला सापडलेली असते, तो समोर येणाऱ्या प्रत्येक मनाचे दार उघडीत जात असतो. त्याच्या केवळ दर्शनाने, त्याच्या संपर्कात येणाऱ्या मनाचे संशय वा संकोच गळून पडतात आणि ती प्रेमाची देवघेव करू लागतात.

या त्याच्या एकमेव शक्तीमुळे आयुष्याच्या प्रवासात तो कुठे अडत नाही. कुणाचा तरी हात त्याच्या मदतीला येतो आणि बरेवाईट जे काही त्याला सोसावे लागले असेल त्यातून तो स्वतः अंतःसमृद्ध होत असतो. आणि आपल्या संपर्कात आलेल्यांनाही अंतःसमृद्ध करीत असतो.

माणसाला माणसाची जी उपजत ओढ आहे, तिच्यातच त्याच्या अंतःसमृद्धीची गंगोत्री आहे. पण जात, वर्ग, पेशा, भाषा, धर्म, देश अशी असंख्य कुंपणे घालून ही ओढ आपण खंडित तरी करीत असतो किंवा बुजवून तरी टाकीत असतो. आपले आप्तेष्ट पहा. आपल्या जातीबाहेरचे वा प्रांताबाहेरचे सहसा नसतात. आपली घरे पहा. ती आपल्या दर्जाच्या वा वर्गाच्या वाडीत असतील. आपल्याकडचे सण सोहळे पहा. त्यातले निमंत्रित विविध जातींतले, पेशांतले, धर्मांतले क्वचितच असतील. आपले वाचन तपासा, किती वेगवेगळ्या भाषांतले साहित्य आपण वाचतो?

प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पनांमुळे असो, किंवा बौद्धिक आळसामुळे असो, किंवा जीवन जिज्ञासेला मुकल्यामुळे असो, आपण आपल्याच शिंपल्यात मिटून पडलेले असतो. शंभर बिऱ्हाडांच्या इमारतीत वर्षानुवर्षे जरी आपण असलो तरी, शेजाऱ्यांशी आपली जानपछान नसते. हा जो एकाकीपणा आपण कवटाळलेला असतो, तोच बांडगुळाप्रमाणे आपल्याला निरंतर शोषीत असतो. आणि आपल्याला निरानंद बनवीत असतो. आपल्याला हे कळत नाही असे नाही. पण रूढ लोकसंकेत मोडण्याची आपल्याला हिंमत नसते.

अमेरिकेतील लुइव्हिल शहरात मला मुलाकडे चार महिने रहावे लागले तेव्हा, दिवस कसा घालवायचा हे एक मोठेच प्रश्नचिन्ह माझ्यापुढे उभे राहिले. बहुतेक वेळ मी लेखन-वाचनात घालवायचा. वीक एण्ड सोडला तर, मुलगा बहुतेक वेळ आपल्या कामात असायचा. माणसाच्या सहवासासाठी मी आसुसलेला असे. पण भेटायचे कुणाला आणि बोलायचे कुणाशी ? हिंडायला जात होतो. पण झाडे अनोळखी, पाखरे अनोळखी. फुले अनोळखी या अशा अनोळखी जगात मला रानात सापडल्यासारखे व्हायचे. एक बरे होते, वाटेत जवळून जाणारे माणूस स्मितपूर्वक अभिवादन करी. मीही तसेच त्याला प्रत्युत्तर करीत असे.

एक दिवस माझा मुलगा मला म्हणाला, "आज रात्री आठच्या सुमाराला शेजारच्या मॅनिंगस कुटुंबाचे तुम्हांला जेवणाचे बोलावणे आहे." "कोण हे लोक ?" असे विचारताच तो म्हणाला, "माझा त्यांचा काही परिचय नाही. पण फोनवर तुम्हाला घेऊन येण्याबद्दल त्यांनी आग्रहाने सांगितले आहे !" निमंत्रक व्यक्ती कोण असेल याचा अंदाज मला बांधता येईना. पण आम्ही जेव्हा त्यांच्याकडे गेलो, तेव्हा घरची गृहिणी ही अनेकदा रस्त्यात अभिवादन करून जाणारी बाई आहे हे माझ्या ध्यानात आले. त्या जेवणाला तिने मेयरला आणि एका म्युनिसिपल एल्डरमॅनलाही बोलावले होते. आमच्या गप्पा रंगत गेल्या आणि त्यांतून त्या कुटुंबाबरोबरच त्या दोन पाहुण्यांशीही माझा स्नेह जमला. पुढे तो इतका वाढला की, मिसेस मॅनिंगसमुळे अनेकांशी माझ्या ओळखीपाळखी झाल्या. तिथली अनेक प्रेक्षणीय स्थळे, संग्रहालये, जत्रा आणि उत्सव मला पहायला मिळाले. झालेल्या ओळखीतून स्नेह जमले. त्यांतून बरेचसे अमेरिकन जीवन जवळून बघता आले. माणूस सगळीकडे सारखा हे सत्य पुन्हा एकदा प्रत्ययाला आले. ओळखी वाढल्या तशी, व्याख्यानांची निमंत्रणे येऊ लागली.

सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे, एक दिवस मेयरची गाडी मला निमंत्रण घेऊन आली. टाउन हॉलवर गेलो तेव्हा, काही एल्डरमेन मेयरसमवेत माझी वाट बघत बसलेले होते. तेथे कॉफीपान आणि विविध विषयांवरच्या गप्पा झाल्या; आणि मग

मेयरच्या हस्ते लुइव्हिल शहराचे सन्मान्य नागरिकत्व मला बहाल करण्यात आले. आणि तद्दर्शक बिल्ला माझ्या बुशशर्टला लावण्यात आला. त्यांनी दिलेली बरीचशी प्रकाशने, चित्रे आणि नकाशे यांचा भारा घेऊन मी मुलाच्या मुक्कामी आलो तेव्हा, त्याचे काही भारतीय स्नेही गप्पा करीत बसलेले होते. मला उशीर का झाला हे सांगितल्यावर हे सन्मान्य नागरिकत्व किती दुर्लभ आहे याची नीट कल्पना मला त्यांनी दिली. मला असे नागरिकत्व लाभले हा एक योगायोग आहे. पण लुइव्हिलच्या वास्तव्यात मला जो अमाप आणि अकृत्रिम स्नेह लाभला, ती मी फार मोठी कमाई समजतो.

दिले-मुस्कानचे वरदान मला जात्याच तर लाभले नसेल? पण आपले स्वाभाविक हास्य आरशात पाहण्याची शक्यता नसल्यामुळे या प्रश्नाचे उत्तर मला मिळायचे कसे?

*

अमेरिकेला पहिल्यांदाच जाताना मी अमूक दिवशी न्यूयॉर्कला पोचणार आहे आणि माझ्या थोरल्या मुलाकडे राहणार आहे, हे कॅनडातील मोतंरियाल शहरात राहणाऱ्या माझ्या भावाला मी कळवून ठेवले होते. आम्ही मुक्कामाला पोचून चार दिवस झाले नाहीत तोच त्याचा मला फोन आला की, दिल्लीचे माझे एक मीर चंदानी नावाचे जुने स्नेही इथे त्याच्या जवळच उभे आहेत आणि एका तातडीच्या कामासाठी ते माझ्याशी बोलू इच्छितात. त्यांच्याशी बोलल्यावर कळले की, हे अध्यक्ष असलेल्या भारतीय मित्रसंघात १५ ऑगस्टचा सोहळा आहे. त्याचे मुख्य पाहुणे म्हणून भारताचे परराष्ट्रीय वकील टोरोंटोहून येणार होते. पण ऐन वेळी त्यांनी आपली असमर्थता कळवली आहे. ते येणार म्हणून आपण फार मोठा आटाच घातला आहे. परंतु ते परराष्ट्रीय वकील आता येत नसल्यामुळे त्या समारंभाला मी जावे आणि त्यांना त्या संकटातून वाचवावे अशा माझ्या विनवण्या मीरचंदानींनी चालविल्या. माझा निरुपाय झाला आणि मी त्यांना होकार दिला.

दुसऱ्या दिवशीच्या सकाळच्या विमानाने मी निघालो. त्या आधी भावाला फोन केला. तो म्हणाला, 'विमानतळावर गाडी घेऊन मी तुम्हांला घ्यायला येतो.' विमानावर जाताना मी माझा पासपोर्ट दाखवला. पण फाटकातल्या अधिकाऱ्याने तो उघडून देखील पाहिला नाही.

न्यूयॉर्कहून मॉंटरियलचा प्रवास तसा छोटासाच. तो छान झाला. हलक्या बॅगेनिशी मी विमानतळाबाहेर पडायच्या फाटकाशी आलो आणि निळ्या सार्जच्या वेषात उभ्या असलेल्या धिप्पाड अधिकाऱ्याकडे मी माझा पासपोर्ट दिला. त्याने तो उघडला आणि सस्मित मुद्रेने तसाच तो माझ्या पुढे केला. तो पाहून माझ्या छातीत धस्स झाले. कारण तो पासपोर्ट माझ्या पत्नीचा होता. निघण्याच्या घालमेलीत माझ्या पासपोर्ट ऐवजी मी तिचा पासपोर्ट घेऊन निघालो होतो. तोच देवी सरस्वती माझ्या संकटाला धावली. माझ्या तोंडून उद्गार निघाला, " ही बाई नेहमीच अशी माझ्या

पाठी लागलेली असते." माझ्या या उद्गारासरशी तो अधिकारी खळखळून हसला. म्हणाला, "काय घडलं ते माझ्या लक्षात आले. पण माझा निरुपाय आहे. ती, 'चौकशी' अशी पाटी दिसते तिथे जा. तिथली बाई फार चांगली आहे. तिच्याशी बोला." जाऊन पहातो तर, बाई कसली, पोरगीच! कातीव बाहुलीसारखी. इतक्या नाजुक देखण्या मुलीला जाड काचेचा चष्मा लागावा याचे मला वाईट वाटले. तिला अभिवादन करून मी तिच्या कचेरीत शिरलो. ती मला प्रश्न विचारू लागली, "तुमचा व्यवसाय काय?" हा प्रश्न जेव्हा तिने विचारला, तेव्हा मी तिला म्हणालो, "आकाशवाणीचा वाङ्मय संयोजक म्हणून मी निवृत्त झालो आहे. पण मी लेखन करतो. कविता लिहितो. लेखन हा मी जीवनधर्म मानतो. व्यवसाय मानत नाही. पण कायद्याच्या सोयीसाठी लेखनाची नोंद व्यवसाय म्हणून करणे तुम्हाला सोयीचे वाटत असेल तर माझी हरकत नाही. मी कवी आहे हे कळताच, तिचा चेहरा एकदम खुलला. आणि ती म्हणाली, "एका कवीच्या आगमनाने माझ्या या खोलीची प्रतिष्ठा भलतीच वाढली याची मला धन्यता वाटते. तुम्ही कवी आहात, तेव्हा तुमच्या अडचणींचा निरास करण्यासाठी मला काही तरी उपाय काढलाच पाहिजे." मग तिने मला विचारले, "तुम्ही इथे आलात कशासाठी?" मी उत्तर दिले, "इथल्या भारतीय मित्रसंघात मुख्य पाहुणा म्हणून आज माझे व्याख्यान आहे."

"किती वाजता?"

"त्याची मला नीटशी कल्पना नाही." तिने टेबलावरचा दैनिकाचा अंक उचलला आणि म्हणाली, "संध्याकाळी साडे सहाला आहे, तेव्हा पाच वाजता तुम्हांला इकडे येता येणार नाही." मग तिने मला विचारले, "तुम्हांला घ्यायला कुणी आलं आहे का?" मी म्हणालो, "बाहेर माझा भाऊ माझ्यासाठी थांबला आहे." यावर, सोबतीला तिने माणूस देऊन मला म्हटले, "त्यांना घेऊन या." त्याप्रमाणे त्यांना घेऊन येताच तिने माझ्या अडचणीवर तोडगा काढला. माझ्या मुलाला फोन करून अमक्या विमानावर मी तुमच्या आईचा पासपोर्ट पाठवीत आहे. त्याच्याचकडे तुमच्या वडिलांचा पासपोर्ट द्या असा तिने त्याला निरोप दिला. मग ती मला म्हणाली, "आता तुम्ही निर्धास्त झालात. आता सांगा बरं, तुम्ही कशा प्रकारची कविता लिहिता?" मी म्हटले मी सर्व प्रकारच्या कविता लिहितो. ईश्वराची इच्छा असेल तर, मी लिहिलेल्या एकाद्या इंग्रजी कवितेवरून तुम्हांला माझ्या कवितेचा फील कळेल." पुढच्या, आमच्यात झालेल्या बोलण्यावरून ही फ्रेंच युवती ह्यूगो, लामार्तिन, म्यूसे वगैरेंची फ्रेंच कविता वाचलेली रसज्ञ विदुषी असल्याचे मला आढळून आले. तिचे नाव होते, पात्रीसिया मनेसी फुको. तिने धोका पत्करून स्वतःच्या जबाबदारीवर मला जाऊ दिले. जाताना बरोबरची बॅग न घेता तिचा

साभार निरोप घेऊन मी जाऊ लागलो, तेव्हा ती मला म्हणाली, " गजेश्री, तुम्ही एकदा पासपोर्ट विसरलात. आता बॅग विसरता आहात. " यावर मी तिला म्हणालो, " ती मी मुद्दामच ठेवून जात आहे. माझ्यासाठी तुम्ही केवढा धोका घेतलात हे मी जाणतो. तुमची झोपमोड होऊ नये अशी माझी इच्छा आहे. उद्या सकाळी पासपोर्ट न्यायला येईन तेव्हा ही बॅग मी घेऊन जाईन. "

गाडी चालू झाली तरी, चमत्कारासारख्या घडलेल्या या प्रसंगाने आणि त्या युवतीच्या सौजन्याने माझ्यावर पडलेली रम्याद्भुताची मोहिनी उतरली नव्हती. तिच्या विषयीच्या कृतज्ञभावाने हेलावलेले माझे मन त्याला इंग्रजीतून शब्दरूप देऊ लागले. भावाच्या मुक्कामी पोचण्याच्या आतच, माझी कविता तयार झाली. मी त्याला म्हणालो, " मादाम फुकोना फोन लावून सांग की, तिला सवड असली तर, मला तिच्याशी बोलायचे आहे. " फोन केल्यावर तो मला म्हणाला, " तुमच्याशी बोलायला ती उत्सुक आहे. " मी फोन घेतला आणि " माझ्या कवितेचा नमुना तुम्हाला हवा होता ना ? तर आता ऐका. " असे म्हणून ती इंग्रजी कविता फोनवरच तिला ऐकवली. ती दुधातल्या बत्ताश्यासारखी कशी विरघळून गेली हे मला तिच्या उद्गारांतून जाणवले. मग मी तिला म्हणालो, " आपल्या भेटीचे स्मृतिचिन्ह म्हणून भारतीय बनावटीची एखादी वस्तू मी तुम्हाला देऊ इच्छितो. तुम्हाला काय आवडेल ? "

त्यावर तिने दिलेले उत्तर प्रत्येक भारतीय अधिकाऱ्याने कटाक्षाने पाळण्यासारखे आहे. ती म्हणाली, ' तुमची माझी भेट व्यक्ती म्हणून झाली असती तर, मी निःसंकोचपणे माझी आवड तुम्हाला सांगितली असती. पण ती झाली अधिकारी या नात्याने. त्यामुळे मला काहीच घेता येणार नाही याबद्दल मला क्षमा करा. पण ही तुमची कविता तुमच्या हस्ताक्षरात आणि तुमच्या सहीनिशी मला दिलीत तर, त्यामुळे माझा गौरव झाला असे मी समजेन. "

मित्रसंघातले माझे भाषण चांगलेच गाजले. दुसरे दिवशी तिचे ऑफिस गाठताना आम्ही गोंधळलो. योगायोगाने, जे गृहस्थ वाट दाखवायला आले ते तिचे वडीलच निघाले. ते आम्हांला तिच्याकडे घेऊन गेले, तेव्हा तिने त्यांना आमचा परिचय करून दिला आणि कविता वाचण्याचा मला आग्रह केला. ती म्हणताना, त्या बापलेकीचे पाणावलेले डोळे मला अजून दिसतात.

न्यूयॉर्कमध्ये असताना सर्व सुखसोयी आमच्या दिमतीला होत्या. पण घरच्या पत्रांच्या अपेक्षेने आम्ही पोष्टमनची वाट पहात बसत असू. वस्तुतः तशी गरज नव्हती. कॉम्प्लेक्समधील प्रत्येकाच्या नावाची पत्राची पेटी असे. आणि सगळ्या पेट्या खालच्या मजल्यावर क्रमाने लावलेल्या असत. आलेली पत्रे ठराविक वेळी

तो ज्यांच्या त्यांच्या पेटीत टाकून जात असे. पण आम्हांला तेवढा धीर कुठला ! शिवाय पोष्टमनच्या हातून पत्र घेण्याचा आनंद काही निराळाच ! हा पोष्टमन निग्रो होता. बांध्याने भक्कम आणि उंच होता. हसायचा विलक्षण निरागस. सारेच निग्रो असे निरागस आणि मनमोकळे हसतात. त्या अनोळखी जगात त्याचे ते हास्य प्रसन्नता वाटून जाई. कधी कधी लेखन वाचनात गढल्यामुळे माझ्या नेमाला खाडा पडे. पण माझी पत्नी आणि मुलगी यांचा नेम कधी चुकला नाही. तो पोष्टमन पत्रे दिल्यावर एक-दोन गोड शब्द बोलून जाई.

आम्ही दोन दिवसांनी स्वदेशी परतणार असल्यामुळे, मी सामानाची बांधाबांध करण्यात गुंतलो होतो. तोच, आनंद उधळीत, माझी मुलगी हातातली एका डॉलरची नोट दाखवीत मला म्हणाली, "आपली भेट म्हणून आपल्या पोष्टमनने स्वतःच्या सहीनिशी ही मला दिली आहे. मी घेत नव्हते, पण मला त्याचा आग्रह मोडवेना." मी धावत खाली गेलो. पण तो केव्हाच निघून गेला होता. मला टागोरांच्या काबुलीवाल्याची आठवण झाली. त्याची बिचाऱ्याची एकुलती मुलगी दूर त्याच्या गावी असेल, त्यामुळे आपले तुटलेले वात्सल्य त्याने असे माझ्या मुलीवर ओतले असेल असे मला वाटले. त्याच्या या निर्लेप वात्सल्यावर लगेच मी कविता लिहून गेलो. आणि दुसरे दिवशी त्याच्या येण्याची नेमकी वेळ साधून मी ती त्याच्या हाती दिली. तो मला म्हणाला, "जरा वाचाल का ?" मी वाचू लागलो. माझे वाचन संपले तेव्हा, त्याच्या डोळ्यांतून टिपे सांडत होती. हा हसणारा माणूस आनंदाने रडत होता. त्याचे रडणे त्याच्या हसण्यापेक्षाही अधिक देखणे आणि हृदयस्पर्शी होते.

ह्यूस्टनहून आम्ही न्यूयॉर्कला चाललो होतो. दरात कपात मिळते म्हणून रात्रीच्या विमानाने चाललो होतो. विमान सुटून पाचच मिनिटे झाली असतील तोच, पॅसेजमध्ये उभ्या असलेल्या एका देखण्या मुलीने माझ्याकडे पाहून स्मित केले. मीही स्मिताने तिला पावती दिली. मग मला शंका आली. तिने दुसऱ्या एखाद्याला हे अभिवादन केले नसेल ना ? मी मागे वळून पाहिले. मागच्या साऱ्या खुर्च्या रिकाम्या होत्या. ही तरुणी निळ्या फ्रॉकमध्ये होती. चेहरा लांबट-गोल होता. डोळे बदामाच्या आकाराचे आणि काळेभोर होते, अंगकांती केतकी वर्णाची होती. तिच्या अंगावर फ्रॉक ऐवजी साडी असती तर, ती अस्सल भारतीयच वाटली असती. दीडेक मिनिटाने ती माझ्याजवळ आली आणि म्हणाली, "तुमच्या शेजारी बसले तर चालेल का ?" मी म्हणालो, "विमान आपल्या सर्वांचेच आहे." मग ती म्हणाली, "तुम्हांला पाहताच मी एवढी आकृष्ट झाले की, मला तुमच्याजवळ आल्याशिवाय रहावेना." पत्नीला इंग्रजी येत नाही. पण मुलीला ते फार चांगले येते. मी थोडासा अवघडलो. सावरून घेऊन शांतपणाने मी तिला विचारले,

" आकृष्ट कशाबद्दल ? " त्यावर तिने म्हटले, " तुम्ही निश्चित भारतीय आहात. योग्याभोवती असावे तसे, तुमच्या मस्तकाभोवती तेजोवलय आहे. "

" पण ते तुम्हाला दिसू कसे शकले ? "

" मी योगाची साधना करते. "

" कोणता योग ? अष्टांगयोग, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग, लययोग, हठयोग असे आमच्याकडे अनेक योग आहेत. "

ती थोडीशी गांगरली. मग नम्रपणाने म्हणाली, " मी नेमाने ध्यान करते. "

" पण इथल्या विलासी जीवनातून तुम्ही योगाकडे कशा वळलात ? "

" मी आईवडिलांची एकुलती एक मुलगी. न्यूयॉर्कमधील मॅनहॅटन वस्तीत एक आमची खूप उंच, बहुमजली इमारत आहे. ज्या विलासी जीवनात मी वाढले, ते मला साचलेल्या डबक्यासारखे वाटले म्हणून ते सोडून मी हिप्पी पंथात गेले. पण अनुभव आला की, हिप्पी जीवन हे गटारच आहे. मन मेल्यासारखे झाले होते. सारखी ट्रेनमधून दिवस-रात्र हिंडून वेळ घालवीत होते. योगायोगाने, प्रवासात माझ्या एका मावसभावाची गाठ पडली. तो बळेबळे मला बालयोगी महाराजांच्या प्रवचनाला घेऊन गेला. ते ऐकता ऐकता माझ्या उजाड मनात माधुर्याचे अपूर्व फूल उमलले आणि मी त्यांचे शिष्यत्व पत्करले. सध्या त्यांच्या Divine Mission या पाक्षिकाचे संपादन मी करीत असते. " इतके सांगून त्याचा ताजा अंक तिने माझ्या हाती दिला. चाळून पाहतो तो पाक्षिक चांगल्या दर्जाचे दिसले.

मग ती मला म्हणाली, " नोव्हेंबरच्या येत्या नऊ तारखेला, गुरुमहाराजांच्या शिष्यवृन्दाचे ह्यूस्टनला फार मोठे कॉंग्रेगेशन भरणार आहे. तुम्ही यावे अशी माझी तुम्हांला आग्रहाची विनंती आहे. "

मी म्हणालो, " आमच्याकडचे डॉलर्स संपले आहेत. "

" त्याची काळजी नको. तो सगळा खर्च मी करीन. "

" आता परतायला एकच महिना उरला आहे आणि न्यूयॉर्कमधल्या माझ्या मुलाने आमच्यासाठी कोणता कार्यक्रम आखला आहे ते मला माहीत नाही. "

" ठीक आहे. मी तुमच्याशी संपर्क साधीन. " इतके बोलून तिने माझा पत्ता आणि घरचा फोन नंबरही घेतला. आपलाही दिला.

न्यूयॉर्कला पोचल्यावर मी माझ्या कामात गुंतलो. तिला विसरूनही गेलो. सात दिवस उलटले होते. दिवे लागले होते आणि आम्ही पिस्ते खात बसलो होतो.

इतक्यात फोन वाजला. मी म्हटले, " डॉक्टर हॉस्पिटलात आहेत. " उत्तर आले " मला डॉक्टरचे वडील कवी बोरकर हवे आहेत. " " हा बोलतो आहे. " " मी माशी. तुम्हाला विमानात भेटले होते. गुरुमहाराजांची उद्यापासून सात दिवस माझ्याकडे प्रवचने चालणार आहेत. तुम्हांला नेण्यापोचवण्याचे माझ्यावर लागले." मी म्हटले, " मुलाने काय कार्यक्रम ठरवला आहे ते पाहून, तुम्हाला सांगतो. "

अमेरिकेत फोनवरचे बोलणे चांगले खणखणीत ऐकू येते. बोलणे बाईचे आहे हे पत्नीने ओळखले होते. " एवढा वेळ तुमच्या गुळूगुळू काय गोष्टी चालल्या होत्या ? " तिने मिस्किलपणे विचारले. मी साद्यंत सर्व तिला सांगून टाकले तेव्हा ती निर्धाराने म्हणाली, " मुळीच जायचं नाही. या इथल्या चेटकिणी कोणतं चेटूक केव्हा करतील याचा नेम नाही. "

अठरा वर्षाच्या पोराला गुरू मानून नव्वद हजार लोक त्याच्या भजनी लागतात हा प्रकार काय आहे हे मला समजून घ्यायचे होते. पण पत्नीला ते सांगण्याचा धीर मला झाला नाही. जिच्या मनात माझ्याविषयी चुकूनही कधी विकल्प आला नाही तिने ' माशी ' कडे न जाण्याचे मला असे निक्षून का सांगावे ? कुलस्वामिनी शांता-दुर्गाच तिच्या तोंडून बोलली असेल का ? असे माझ्या मनात आले. आणि मी ' माशीला ' कबूल केले असतानाही फोन केला नाही. खोटे बोलणे मला जमण्या-सारखे नव्हते आणि खरे बोलणे पंचाइतीचे होते, पण माझ्याशी इतके चांगले वागलेल्या त्या मुलीला मी फोनदेखील केला नाही याची अजून मला खंत आहे.

*

वर्कहॉलिक हा अमेरिकेत नव्याने प्रचलित झालेला शब्द, आल्कॉलिक या शब्दाच्या धर्तीवर घडवलेला. दोहोंतही एक तिरस्कारदर्शक छटा आहे. जो माफक प्रमाणात आणि चविष्टपणाने मद्य सेवन करतो त्याला कुणी दारुडा म्हणत नाही. दारुडा तो, की ज्याला दारू पिताना काळ, वेळ, प्रसंग आणि सुमार नसतो. वर्क-हॉलिक या शब्दाला सार्थ प्रतिशब्द योजायचा झाला तर, तो आपल्याला घडवावा लागेल. त्यासाठी मला 'कामारडा' हा शब्द सुचतो. जो हाती घेतलेल्या कामात रमतो आणि ते चोखपणे पार पाडतो तो कामसू. पण कामापलीकडे ज्याला अन्य जीवनच नाही म्हणून जो दिवसरात्र मरमर कामच करीत रहातो तो कामारडा. दारुडा आणि कामारडा. दारूने आणि कामाने काहीजण असे पछाडलेले असतात की, त्यांची खरी चव तर ते गमावून बसलेले असतातच, शिवाय जीवनाच्या अन्य सर्व आस्वाद्य गोष्टींचा स्वाद घेण्याची क्षमताच त्यांच्यात राहिलेली नसते. जीवन ही सृष्टिकर्त्याने उदारपणाने आपल्यासमोर मांडलेली एक रसांची मेजवानी आहे याचा त्यांना पत्ताच नसतो. कोणतीही गोष्ट अतिरेकाला नेली की, तिच्यातला रस संपून तिला यांत्रिकता येते आणि ती माणसाचा जीवनानंदच हिरावून घेते.

मद्यसेवनाच्या अतिरेकाने अनेक माणसे आणि त्याचबरोबर त्यांचे सोन्यासारखे संसार बरबाद झालेले आहेत. तसेच अमेरिकेसारख्या अतिप्रगत देशात ते कामाच्या अतिरेकामुळे होत असतात.

या सर्व प्रतिपादनावरून कामाविषयी मला नफरत आहे असा गैरसमज कुणी करून घेऊ नये. हाती घेतलेल्या कामात रमून जाण्यात आणि त्याला कलाकृतीची सुभगता आणण्यात निरतिशय आनंद आहे हे मी जाणतो. असे काम आपल्याला सुंदर आणि समृद्ध बनवीत असते. पण आराम हराम है, हे मला मंजूर नाही. आराम हा कामाचा अर्धविराम असावा आणि त्या आरामात राम असावा. ज्यांना या आरामाचे मर्म समजले आहे, ते आपल्या रिकामटेकडेपणाचे सोने करून जातात.

---

**वर्कहॉलिक**

---

फुरसतीच्या वेळात ते डोंगर-दऱ्यांतून फिरायला जातील, ऋतुनाम्यातील निसर्ग विलसिते कुतूहलाने न्याहाळतील, शांतपणाने पशुपक्ष्यांचे आणि वाहत्या पाण्याचे विविध आवाज आपल्या कानांनी टिपून घेतील, घरी मुलांशी खेळतील, पत्नीशी संसारगप्पा करतील, वडीलधाऱ्यांची ममतेने विचारपूस करतील, शेजाऱ्या पाजाऱ्यांशी सुखसंवाद करतील, आपल्या एखाद्या आवडत्या छंदात रमून जातील, घरच्या मंडळींस एखादी चांगली कथा वा कविता वाचून दाखवतील. जेवतील ते चवीने आणि आरामात जेवतील. मित्राबरोबर एखादा खेळ खेळण्यात दंग होतील आणि एकाकी असले तर, आपले एखादे आवडते गाणे गुणगुणत रहातील. जे आरामात अशा रीतीने राम आणतात, तेच आपल्या कामातही असाच राम आणतात.

आपण थोडी सभोवार दृष्टी फिरवली तर, एक माणूस सोडल्यास अन्य प्राणी कुठे कामाला जुंपलेले दिसत नाहीत पाळीव जनावरांना आपण कामाला जुंपतो. सर्कशीत तर श्वापदांना आणि पक्ष्यांनाही कामे करावी लागतात. पण काम करणे ही काही त्यांची सहज प्रवृत्ती नाही. पशुपक्ष्यांना स्वतःचे भक्ष्य मिळवावे लागते पण त्यासाठी त्यांना वस्त्रे लागत नाहीत. ती त्यांची सोय निसर्गाने त्यांच्या जन्माबरोबरच केलेली असते. पशू कुठेतरी आयता निवारा मिळवतात. पक्षी स्वतःच्या हिकमतीने सोयीस्कर घरटी बांधतात. पण या गरजा भागवण्यासाठी त्यांना फार वेळ मोडावा लागत नाही. त्यामुळे उरलेला सर्व वेळ ते आनंदात घालवू शकतात. आणि घालवतातही. पण माणसाच्या याच गरजा त्यांच्यासारख्या साध्या-सोप्या नसतात. किंबहुना जितक्या त्या अधिक गुंतागुंतीच्या आणि बिकट असतील, तितका तो अधिक सुसंस्कृत आणि सुसभ्य गणला जातो. एका चिनी विचारवंताने लिहिल्याचे स्मरते की, चैनीच्या गरजा बनवणे म्हणजे, सभ्यता ( Civilization ) आणि गरजा दुष्प्राप्य करणे, म्हणजे प्रगती.

अशा सभ्य आणि प्रगत समाजाचा माणूस एकदाचा सदस्य बनून गेला की, या गरजा भागविण्यासाठीच त्याला दिवसाचा बहुतांश वेळ वेचावा लागतो. पुन्हा चैनीच्या गरजा बनवल्यामुळे त्या भागवण्यासाठी आणखी कष्ट करावे लागतात. बरे, असे मरमर काम करून त्या सगळ्या गोष्टी मिळवल्या तरी प्रश्न सुटला असे होत नाही. मुलांचे शिक्षण, मुलींची लग्ने, म्हातारपणाची सोय, दुखण्याबाण्यासाठी लागणारी पुंजी यांची सोय करण्याची निकड असते. विवंचना असते. त्यांच्यापायी असलेल्या सुखांचा स्वाद घ्यायला लागणारा चित्प्रसाद त्यांच्या ठिकाणी नसतो आणि तशी फुरसतही नसते.

ही परिस्थिती युरोप अमेरिकेतच आहे असे नाही; ती आपल्याकडील शहरांतही येऊ लागली आहे. एवढेच नव्हे तर, आपल्या खेड्यापाड्यांनाही व्यापीत चालली

आहे. आणि माणूस वाढत्या गरजांनी जास्त जास्त गांजत चालला आहे. त्या पुरवण्यात त्याची एवढी दमछाक होते की, तो निरानंद होत चालला आहे. या निरानंदतेमुळे कोणत्याच क्षेत्रात तो नवनिर्मिती करताना दिसत नाही. कामापायी त्याला वेळ नाही आणि पार थकून गेल्यामुळे त्याला नवे काही सुचत नाही.

माझ्या लहानपणी गरजा मर्यादित होत्या. दिमाखाला आजच्या सारखी प्रतिष्ठा आलेली नव्हती. लोकांना भरपूर फुरसत होती. स्नेह-जिव्हाळ्याला अवसर होता. स्त्रिया काय, पुरुष काय आपल्या कसल्या तरी आवडत्या छंदात गुंतलेले असत. त्यातून जे निर्माण होई त्याचे तोंड भरून कौतुक केले जाई. मी पणजीत शिकत असताना कम्पालच्या एकाद्या बाकड्यावर एकादा होतकरू चित्रकार समोरचे दृश्य चितारीत असलेला दिसे. चांदण्या रात्री मुलांमुलींचे ताफे दोनापावलच्या टेकडी-वरील सज्जावर मँडोलीन, गिटार आदी तंतुवाद्ये छेडीत गीते 'आळवीत' असलेली दिसत. आज ही प्रवृत्ती मावळत असलेली दिसते. मला ही वस्तुस्थिती फार धोक्याची वाटते.

ज्या सभ्यतेत माणूस निरानंद बनतो, निर्माणक्षमता गमावून बसतो आणि कामाच्या भाराखाली स्नेह-सौहार्दाला पारखा होतो, तिचा पायाच पोखरला जात आहे हे स्पष्टच आहे.

संतांनी 'मागणे लइ नाही'ची भाषा का केली आणि ऋषिमुनींपासून गांधीजीं-पर्यंतच्या आपल्या सर्वच जीवनद्रष्ट्यांनी गरजा कमी करण्यावर भर दिला, हे समजून घेण्याची वेळ आता आली आहे. त्या कमी करून वाचवलेला वेळ संस्कृती विकासाला लावला नाही तर, कलह आणि विद्ध्वंस यांच्या शापातून आपली सुटका होणे अशक्य आहे.

*

ज्या समाजात कार्यक्षम पुरुष बेकार उरतात आणि स्त्रियांना घराची आणि मुला-बाळांची आबाळ करून नोकऱ्या कराव्या लागतात, तो समाज आपले शहाणपण गमावून बसला आहे असे मला नेहमीच वाटत आले आहे. समाजाला स्वास्थ्य आले, मुलांना संरक्षण लाभले, अतिथी अभ्यागताला निवारा मिळाला, ब्रह्मचारी, वानप्रस्थी आणि संन्यासी यांना आधार गवसला आणि संस्कृतीला अधिष्ठान प्राप्त झाले ते घरामुळे. असे हे घर निर्माण केले ते स्त्रीने, हा इतिहासाचा निर्वाळा आहे. ती नसती तर, माकडा-प्रमाणे आम्ही पुरुष आजही अनिकेतच राहिलो असतो. घरसंसार हा खऱ्या अर्थाने स्त्रीचाच. आपल्या चातुर्याने, निष्ठेने, प्रेमशक्तीने आणि श्रमशक्तीने आम्हा पुरुषांना तिने संसाराच्या घाण्याला जुंपले, आणि जिचा आपण अभिमान वागवतो ती संस्कृती उभी केली. स्त्रीने घर सांभाळावे आणि तिच्या संसाराला जे जे काही लागेल ते ते पुरुषाने पराक्रमाने मिळवून तिला पुरवीत रहावे, हा जगाचा दंडक होऊन बसला.

पण कालांतराने आपल्या पराक्रमाची नशा पुरुषाला अशी काही चढत गेली की, स्त्री ही आपली सखी, स्फूर्ती, सचिव आणि धात्री आहे या सत्याचा त्याला विसर पडला. आणि आपण तिचे पोशिंदे आहोत आणि ती आपली दासी आहे अशा तोऱ्यात तो वागू लागला. गुणी आणि सुशील पत्नी ही रत्नवती आहे, आपल्या सुखाची गंगोत्री आहे याचे यत्किंचितही भान त्याला उरले नाही. एवढेच नव्हे तर, आपल्या संसारासाठी ती जे कष्ट उपसते, त्याची यथोचित किंमत पैशात मोजावी लागली तर, आपली अर्ध्याहून मिळकत तेवढ्यातच खर्चून जाईल याचेही भान त्याला राहिले नाही.

पराक्रमाच्या नशेत, त्याचा एवढा अधःपात झाला की, तो तिला पायातली वहाण मानू लागला. आणि तशीच तिला वागवू लागला. स्वतः चटके खाऊन ती त्याच्या-पासून आपला बचाव करीत असते हे त्याने ध्यानी घेतलेच नाही.

---

**न कमावत्या बायकोची कमाई**

---

संस्कारांच्या हजारो वर्षांच्या दडपणामुळे, समाजदंडकांच्या प्रभावामुळे आणि आर्थिक असहायतेमुळे स्त्री अपमान आणि देहदंड सोसूनही घर सांभाळून राहिली, पण तिचा जीवनानंद मावळला, आपले स्वाभाविक सौंदर्य ती गमावून बसली. आतल्या आत धुमसत तरी राहिली; नाही तर, कधी विझून गेली. त्यामुळे पत्नी घरात असूनही पुरुष एकाकी झाला. त्याच्या मुलांना लाभणाऱ्या अमृतसिंचनाला पारखा झाला. त्याच्या जीवनाची उभारीच निघून गेली.

पाश्चिमात्य शिक्षण आणि साहित्य यांच्या अध्ययनाने आपल्यातले जे महाभाग जागृत झाले, त्यांना आपल्याकडील स्त्रियांची अवनत दशा विशेषत्वाने जाणवली. त्यांनी स्त्री शिक्षणाचा आणि स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न हाती घेतला. शिलावत झालेल्या स्त्रीला त्यांचे प्रयत्न उःशापासारखे ठरले. थोड्याच वर्षांत स्त्री पुरुषाइतक्याच तोलाने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पराक्रम करू शकते हे तिने दाखवून दिले. समाज संवर्धनाच्या दृष्टीने ही गोष्ट आवश्यक होती, पण शिक्षण आणि स्वातंत्र्य यांच्या प्राप्तीबरोबर, स्त्री-पुरुष ही परस्परपूरक आहेत ही जाण येण्याऐवजी ती समान आहेत असा अपसमज दृढ होत गेला. त्यातून त्यांच्यात एक अनिष्ट स्पर्धा सुरू झाली. तीच आता घर उखडायला निघाली आहे.

इतके दिवस पुरुष हाच ममपूजेत दंग होता. आता स्त्रीही त्याचीच री ओढू लागली आहे. हे असेच चालू राहिले तर, घर घर रहाणार नाही. ते फक्त भिंतींचे खोके बनेल. यावर काही उपाय आहे का ? यावर मला उपाय दिसतो तो एवढाच की, पुरुषाने आता अधिक समंजस व्हायला शिकले पाहिजे. आपल्यावरचे हजारो वर्षांचे नवरेशाहीचे संस्कार कटाक्षाने पुसून टाकण्याच्या उद्योगाला त्याने लागले पाहिजे. स्त्री ही आपली स्पर्धक नसून ती आपली सखी आणि सहकारिणी आहे ही भूमिका त्याने मोकळ्या मनाने स्वीकारली पाहिजे, आणि तिचे आणि तिच्या श्रमांचे मोलमहत्त्व जाणून तिचा योग्य आदर त्याने ठेवला पाहिजे. त्यांच्यामधला स्नेह जेव्हा अशा आदराने सुश्लिष्ट होईल, तेव्हा त्यांच्यामधल्या स्वाभाविक सख्याला नवी पालवी फुटेल.

मग पुरुष भरपूर मिळवणारा असेल तर, स्त्रीने नोकरी करावी अशी अपेक्षा बाळगणार नाही. स्त्रीही शक्यता आणि पात्रता असूनही घराची आबाळ होऊ नये म्हणून नोकरी पत्करणार नाही. परिस्थितीवश स्त्रीला ती पत्करावी लागली तर, ऑफिसमधून घरी आल्यावर तीही आपल्या सारखी थकलेली असेल हे भान पुरुष ठेवील आणि सैपाकपाणी किंवा घरातील लहानमोठी कामे निपटण्यात तिला मनोभावे मदत करील. आणि तिला प्रसन्न ठेवण्यासाठी पाळावयाची सर्व पथ्ये आस्थेने आणि कटाक्षाने पाळील. जी स्त्री नोकरी करत नाही, ती घरातली किती कामे अगत्याने

आणि कसोशीने निपटते याचे भान ठेवील आणि तिची कदर करील. 'अति परिचयात् अवज्ञा' या वृत्तीमुळे अशा स्त्रीची कमाई किती असते याचे भान आपल्याकडून ठेवले जात नाही.

हल्लीच जनरल इन्शुरन्स कंपनी या इंग्लंडमधल्या प्रख्यात विमा कंपनीने एक अभ्यासपूर्ण असा अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्याचा निष्कर्ष हा आहे की, न कमावती स्त्री घरात दिवसभरातील जी कामे करते त्याची पैशात मोजदाद करायची झाली तर, दर आठवड्याला ती दोनशे चार पौंड किंवा तीनशे ऐंशी डॉलर्स भरते. आपल्याकडच्या रोजगारीचे प्रमाण इंग्लंडच्या मानाने बरेच कमी असले तरी, रुपयात ते आठवड्याला तीनशे ऐंशी रुपयांहून निश्चित अधिक असेल. याप्रमाणे तिची कमाई तिला द्यायची म्हटली तर, आपला पगारही पुरा पडणार नाही. आपल्याला कर्जच काढावे लागेल.

अशी स्त्री घरातली कामेच करते असे नाही. ती नऊ महिने मुले पोटात वागवते, ती पुढे त्यांना स्तन्य देते, त्यांच्या खस्ता काढते. आजारात त्यांच्यासाठी जागरणे करते, त्यांचे धडे घेते, पतीला स्नेह देते, सल्ला देते, त्याची सेवा करते, त्याला रतिसुख देते. या सर्वांची योग्य किंमत करणे ब्रह्मदेवालाही जड जाईल.

पुरुषाने हे सर्व कृतज्ञतेने नीट लक्षात घेतले तर, स्त्रीला सुखी करण्यासाठी तो जीवही गहाण टाकील आणि त्याच्यातली ही वृत्ती एकदा जागी झाली की, संसार सुखी व्हायला उशीर लागणार नाही.

माझा एक नातू पाडगावकरांचा शिष्य आहे. 'एक होता बैल. त्याने चड्डी केली सैल' अशा वात्रटिका तो सहज घडवतो. परवा तो माझ्याकडे आलेला असताना, पाडगावकरांची 'भोलानाथ' कविता आम्हाला म्हणून दाखवीत होता.

'भोलानाथ भोलानाथ सांगना रे एकदा। आठवड्यातून रविवार येईल काय रे तीनदा' हे कडवे त्याने म्हटले. तेव्हा माझ्या मनात आले, याच्यासारख्या मुलांनाच काय आपल्यासारख्या वयस्करांना देखील रोज रविवार येऊ शकला तर हवाच असतो. एकदम मला उमाशंकरभाईंची त्यांच्याच तोंडून तीस वर्षांपूर्वी ऐकलेली त्यांची कविता आठवली. तिचा मुखडाच आहे 'मारे साते वारे रविवार.' ती कविता मी विसरून गेलो आहे. पण तो मुखडा माझ्या स्मरणात घट्ट रुतून बसला.

कवितेची एक गंमत असते. तिचा एखादा चरण कारण नसताना आपल्या जिवाला कायमचा चिकटून बसतो. आणि आयुष्यात केव्हातरी आपल्या सर्व सामर्थ्यानिशी सूर्योदयासारखा एकदम आपल्या मनात प्रगट होतो. मलाही इतक्या वर्षांनी या मुखड्याच्या बाबतीत हाच प्रत्यय आला. आठवड्याचे सातही वार रविवार व्हावे अशी इच्छा आपल्यातल्या प्रत्येकाला होऊ शकेल. तेवढे कशाला, तशी ती आपल्याला केव्हा ना केव्हा होतेच! पण आपले सातही वार रविवार झाले आहेत असे समाधानाने म्हणू शकणारा उमाशंकरभाईंसारखा एखादाच असतो. चित्तस्थैर्य लाभलेला एखादा तुकाराम उद्गारतो, 'उरलो उपकारा पुरता,' किंवा म्हणतो, 'तुका म्हणे मुक्ती परिणिली नोवरी। आता दिवस चारी खेळीमेळी।' त्याला अभिप्रेत असलेली ही मुक्ती ही मृत्युत्तर अवस्था नसून याचि देही भोगण्याची निरभ्र, निरंजन मनोदशा आहे. ही भगवद्कृपेनेच मिळू शकते. म्हणूनच सोहिरोबांनी म्हटले आहे, 'भगवंत कृपा विषयात नसे। अविनाशची देतसे मोक्षदशे॥' चित्ताला अशी अविनाशी मोक्षदशा लाभलेली असल्य शिवाय उगवलेल्या प्रत्येक दिवसाचा रविवार बनवता येत नसतो.

---

## बोनसचे दिवस

---

शाळेतल्या बंदीखान्यात मुले जोवर कोंडली जात नाहीत, तोपर्यंत त्यांचा प्रत्येक दिवस हा त्यांच्या लेखी रविवारच असतो. पुढे ज्ञानाची गोडी लागल्यावर त्यांचा शाळेचा दिवस देखील त्यांना रविवारासारखा वाटू शकतो. आपलेही असेच आहे. संसार हा बन्दीखाना आहे अशी जोवर आपली भावना असते, तोवर खरा रविवार काय तो त्याच्याबाहेर आहे असे आपल्याला वाटत असते. आणि तो मिळावा म्हणून आपण आतल्या आत झुरत असतो. पण संसार ही ज्ञानार्जनाची आनंद साधना आहे हे सत्य जेव्हा आपल्याला अनुभवाने उमगते, तेव्हा 'साते वारे रविवार' हा प्रत्यय आपल्याला पदोपदी येऊ लागतो.

वस्तुतः जीवनाचा आनंद क्षणाक्षणाने आणि कणाकणाने भोगण्यासाठी लागणारे निरागस आणि निरामय मन आपल्याला जन्मतः लाभलेले असते. पण बाह्य जीवनातले कलह आणि अंतःकलह यांच्या अधीन होता होता, जीवनाच्या आनंदभोगाला आपण पारखे होत जातो. पण तशातही अंतर्यामी आपण जागे असलो तर, केव्हा तरी आपल्याला उमगते की, आपण नाना प्रकारच्या तृष्णांची शिकार बनलो आहो. हे सत्य जेव्हा जीवेभावे पटून चुकते, तेव्हा तृष्णांच्या धारा आपोआप खुंटत जातात. हव्याहव्याचा आग्रह संपतो. मुदलातली निरागसता जागी होते. अंतःकलह मिटतो. बाह्यकलह अंगावर येत नाहीत. जीवन हे कृपावंत नटेश्वराचे आनंद–नाट्य आहे हे उपजते. आणि त्याचा आस्वाद घेण्यात आपण रमून जातो.

काव्यशक्तीबरोबर जीवनानंदाची आस्वाद्यता मी जन्मतःच घेऊन आलो. पण जीवनाच्या अंतर्बाह्य कलहात मीही तरुण वयात गुंतत गेलो. त्या पायी कधी सुखावलो, कधी भाजलो, पोळलोही. जे उचित, म्हणजे आपल्या पिंडातले किंवा 'जे अवसरे करोनी प्राप्त,' म्हणजे प्रसंगपरत्वे पतकरावे लागले ते मी जीव ओतून करीत राहिलो. त्यातून काय पदरात पडले याची चिंता मी कधीच केली नाही. त्यामुळे माझ्या तापत्रयाचे आपोआपच तपत्रय बनले. साठी उलटण्याच्या आतच प्रपंचाच्या जबाबदाऱ्या मिटल्या. वेतनाशिवाय निवृत्ती वाट्याला आली. पण मी ती इष्टापत्तीच मानली. सुचेल ते लिहीत राहिलो. अजूनही लिहितोच आहे. जडलेल्या मधुमेहामुळे प्रवासाला पायबंद बसला. मी म्हटले, बरे झाले. क्षेत्रसंन्यासाचे सर्व फायदे आता आयते आपल्या पदरी पडतील.

आणि झाले आहेही तसेच. कुणी गाडी घेऊन आला तरच बाहेर पडतो. एरवी घरीच असतो. सकाळी सूर्योदय पहातो आणि संध्याकाळी सूर्यास्त. दोन्ही वेळा पूर्व पश्चिमेला झळझळणारी पॅनेल्स लागलेली असतात. आकाशातला चित्रकार ती सारखा चितारीत असतो आणि पुसूनही टाकीत असतो. उन्हात पिसोळी भुरभुरतात. त्यांच्यात रमतो, तसाच संध्याकाळी घरात धुडगूस घालणाऱ्या नातवंडांत आणि त्यांच्या सवंगड्यांतही रमतो. सहलीला जाताना चंद्र उगवलेला असतो.

वडांनी रचलेल्या मांडवात काळोख ध्यानस्थ बसलेला असतो. तेव्हा आपोआपच अंतर्मुख होतो. घरी येऊन व्हरांड्यात खुर्ची टाकून बसतो तेव्हा, जवळ-दूरची झाडे उजळत असतात. आग्बादच्या दांडीचा प्रकाशझोत अंगावर पडत असतो. दिगंतातला समुद्राचा चांदवर्खी पट्टा तळपत असतो. जुन्या आठवणी चाळवल्या जातात. त्या गड्द होता होता, ओठावर कवितेच्या ओळी आकारू लागतात. साठी उलटली तेव्हाच, मुद्दल वसूल झाले हे जाणून मी प्रस्थान काढून ठेवले. आता आमंत्रण केव्हाही येऊ शकेल हे पटून चुकल्यामुळे, रागलोभ केव्हाच मिटलेले आहेत. सारे काही स्नेहाने चिंब आहे. आणि उरले दिवस बोनसचे झाल्यामुळे ते रविवार बनले आहेत.

*

मराठी ग्रं... संग्रहालय ठाणे
निबंध ३००६ २४०३८ ३।११।८३
ग्रंथ शाखा (स्थल प्रत)

REFBK-0024038



छाया : जया दडकर